# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

# आंतरराष्ट्रीय संस्थांचा इतिहास

## (History of International Organizations)

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून

**एम. ए. भाग-२ : सत्र-४**

**इतिहास**

Major Mandatory : MM 1

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२५
एम. ए. भाग - २ करिता (आंतरराष्ट्रीय संस्थांचा इतिहास)
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : १,०००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-48427-06-9

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### सल्लागार समिती


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. के. बी पाटील** (सदस्य सचिव)
प्र. संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


■ **अभ्यासमंडळ : इतिहास** ■

अध्यक्ष - **डॉ. चंद्रवदन मोहनराव नाईक**
देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर

- **डॉ. अवनिश आर. पाटील**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. अभयकुमार जगन्नाथ पाटील**
  सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड,
  ता. कराड, जि. सातारा

- **डॉ. श्रीमती आरती बळवंत नाडगौडा**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती कविता अशोक गगराणी**
  द न्यू कॉलेज, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती उर्मिला एन. क्षिरसागर**
  मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली

- **डॉ. जयपाल चंद्रकांत सावंत**
  शंकरराव जगताप आर्टस कॉलेज, वाघोली, ता. सातारा

- **डॉ. संभाजी आनंदा मोरे**
  एम. एच. शिंदे महाविद्यालय, तिसंगी, ता. गगनबावडा,
  जि. कोल्हापूर

- **डॉ. प्रमोदकुमार अंकुश ओलेकर**
  आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा, ता. वाळवा,
  जि. सांगली

- **डॉ. चंद्रकांत संदिपान चव्हाण**
  इतिहास अधिविभाग, वालचंद कॉलेज ऑफ आर्टस अ‍ॅण्ड
  सायन्स, अशोक चौक, सोलापूर

- **डॉ. तेजस मदन घारगे**
  डायरेक्टोरेट ऑफ आर्किओलॉजी अ‍ॅण्ड म्युझियम, संत
  गोर्गे फोर्ट, संत गोर्गे हॉस्पिटल प्रिमाईसेस, फोर्ट, मुंबई

- **डॉ. नंदा पारेकर**
  एव्हरग्रीन होम, टॉवर डी, फेज ४, फ्टॅट नं. २०८,
  राजहंस प्रिंटींग प्रेस समोर, प्रभू हॉस्पिटल रोड,
  नागाळापार्क, कोल्हापूर

- **डॉ. निरंजन कुलकर्णी**
  इतिहास अधिविभाग, मा. श्री. आण्णासाहेब डांगे, आर्टस,
  कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, हातकणंगले, जि. कोल्हापूर

- **श्री. सदानंद कदम**
  शिवराज, १०८२, दक्षिण वसंत नगर, छत्रपती शिवाजीराजे
  मार्ग, सांगली.

# प्रस्तावना

शैक्षणिक वर्ष २००७ पासून शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या वतीने दूरशिक्षण केंद्रामार्फत बहिःस्थ विद्यार्थ्यांना दूरशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तसेच यंदाच्या वर्षापासून म्हणजे २०२४-२५ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारीत अभ्यासक्रम राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने, एम. ए. भाग-२ इतिहास या वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी ''**आंतरराष्ट्रीय संस्थांचा इतिहास**'' या विषयाचे स्वयं अध्ययनासाठी हे पुस्तक सन २०२४-२५ या वर्षात तयार केले. सदर पुस्तकाच्या लेखनासाठी शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पदव्युत्तर विभागात अध्ययन करणाऱ्या अनुभवी व तज्ज्ञ लेखकांकडून या विषयाच्या अभ्यासक्रमानुसार असलेल्या विविध घटकांचे लेखन करून घेण्यात आले आहे. या पुस्तकातील विविध घटक लिहिताना साधी व सोपी भाषा, संकल्पनात्मक स्पष्टता, विषयाच्या आकलनासाठी तक्ते इत्यादींचा वापर केलेला आहे. वाचक व विद्यार्थ्यांना समजेल अशी विषयाची सोपी व सुटसुटीत मांडणी करण्यात आलेली आहे. प्रत्येक घटकाच्या शेवटी स्वयं अध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे दिलेली आहेत. तसेच घटकाच्या शेवटी सरावासाठी स्वाध्याय, पारिभाषिक शब्द, शब्दार्थ व अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची सूची दिलेली आहे.

**आंतरराष्ट्रीय संस्थांचा इतिहास** या स्वयं अध्ययन साहित्यामध्ये संयुक्त राष्ट्रसंघ, करार व संघटना, अलिप्ततावादी चळवळ, इतर महत्त्वाच्या संघटना इ. घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

या पुस्तकामध्ये विविध घटकांच्या विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यामध्ये काही उणिवा असल्यास वाचक व विद्यार्थ्यांनी त्या आमच्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्याचा उपयोग पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित करण्यासाठी निश्चितपणे होईल. हे पुस्तक पदवी, पदव्युत्तर व विविध स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरेल असा आम्हाला विश्वास आहे.

शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण अंतर्गत स्वयं अध्ययन साहित्य निर्मितीसाठी मा. कुलगुरू यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन मोलाचे ठरले. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक, समन्वयक, इतिहास अभ्यास मंडळ अध्यक्ष आणि शिवाजी विद्यापीठ इतिहास विभागप्रमुख डॉ. अवनिश पाटील यांचे सहकार्य लाभले. सदर पुस्तक पूर्ण करण्यासाठी घटक लेखकांनी तसेच पुस्तक प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, दूरशिक्षण विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. या सर्वांच्या मार्गदर्शनाबद्दल व सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार!

■ **संपादक** ■

**प्रा. (डॉ.) स्वाती सरोदे**

वेणुताई चव्हाण कॉलेज कराड, ता. कराड, जि. सातारा

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **डॉ. दत्तात्रय मचाले**<br>इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | १, २, ३ |
| **डॉ. संतोष जेठीथोर**<br>डी. आर. माने आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, कागल,<br>ता. कागल, जि. कोल्हापूर | ४ |

**■ संपादक ■**

**प्रा. (डॉ.) स्वाती सरोदे**

वेणुताई चव्हाण कॉलेज कराड,
ता. कराड, जि. सातारा

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | संयुक्त राष्ट्रसंघ | १ |
| २. | करार व संघटना | ३४ |
| ३. | अलिप्ततावादी चळवळी | ५१ |
| ४. | इतर महत्त्वाच्या संघटना | ६७ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२४-२५ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक १
# संयुक्त राष्ट्रसंघ
(United Nations Organisation-UNO)

**अनुक्रमणिका**


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ संयुक्त राष्ट्रसंघाची उद्दिष्टे (Objectives of UNO)

१.२.२ संयुक्त राष्ट्रसंघाचे स्वरूप (Nature of UNO)

१.२.३ संयुक्त राष्ट्रसंघाचे कार्य (Work of UNO)

१.३ संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या यशापयशाचे मूल्यमापन

१.४ स्वयं-अध्ययन प्रश्न

१.५ सरावासाठी स्वाध्याय

१.६ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


## १.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला,

१. संयुक्त राष्ट्रसंघाच्या स्थापनेची पार्श्वभूमी, त्याची उद्दिष्टे स्पष्ट करता येतील.

२. संयुक्त राष्ट्रसंघाचे स्वरूप, त्यातील विविध समित्या, त्यांची कामे आणि जबाबदाऱ्या याचा विस्तृत आढावा घेता येईल.

३. जागतिक पातळीवर संयुक्त राष्ट्रसंघाचे कार्य आणि त्याचे यशापयश याचा अभ्यास करता येईल.

४. एकूणच आजपर्यंत जागतिक पातळीवरील प्रत्येक राष्ट्रा-राष्ट्रांमधील तंटे शांततापूर्ण मार्गाने सोडविण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने केलेल्या प्रयत्नांचा आढावा घेता येईल.

## १.१ प्रास्ताविक

विसावे शतक हे अनेक दृष्टीने महत्त्वाचे शतक मानले जाते. या शतकात जगाच्या इतिहासात अनेक घडामोडी घडल्या. या शतकाच्या पूर्वार्धात पहिले जागतिक महायुध्द झाले. या पहिल्या महायुद्धात जगाला प्रचंड मोठ्या मनुष्यहानी आणि वित्तहानीला सामोरे जावे लागले. पुढे पहिल्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय

पातळीवर शांतता प्रस्थापित करण्यासाठी राष्ट्रसंघाची निर्मिती करण्यात आली. पराभूत राष्ट्रांवर जेत्या राष्ट्रांनी उगवलेला सूड, बड्या राष्ट्रांचा अतिम्हात्त्वाकांक्षीपणा व स्वार्थी धोरण यामुळे एक प्रकारे जगाला अशांततेच्या खाईतच लोटले गेले. जेत्या राष्ट्रांच्या दृष्टिकोनामुळे राष्ट्रसंघाच्या तत्त्वामध्येच व्दितीय महायुद्धाची बीजे रोवली होती, असे म्हणता येईल.

पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर अवघ्या वीस वर्षांतच जगाला दुसऱ्या महायुद्धाला सामोरे जावे लागले. पहिल्या महायुद्धातील तहनाम्याने पराभूत राष्ट्रांना मिळालेली अपमानास्पद वागणूक, आर्थिक समस्या, जेत्या राष्ट्रांमधील वाढता साम्राज्यवाद आणि फुटीर वृत्ती, नि:शस्त्रीकरण योजनेला आलेले अपयश यातून दुसऱ्या महायुद्धाला तोंड फुटले. दुसऱ्या महायुद्धानंतर पुन्हा संहारक अशा युद्धाची परिस्थिती उद्भवू नये यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाची निर्मिती करण्यात आली. ज्या चुका पहिल्या महायुद्धानंतर स्थापलेल्या राष्ट्रसंघाच्या स्थापनेबाबत झाल्या होत्या त्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या स्थापनेवेळी टाळण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्याचबरोबर जागतिक पातळीवर शांतता टिकवून ठेवण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघामार्फत प्रयत्न करण्यात आले. याच दृष्टीने संयुक्त राष्ट्रसंघाची रचना करण्यात आली. याच संयुक्त राष्ट्रसंघाचे स्वरूप, त्याची रचना आणि त्याचे कार्य याचा आढावा प्रस्तुत प्रकरणात आपण घेणार आहोत.

## १.२ विषय विवेचन

**संयुक्त राष्ट्रसंघ निर्मितीचे बीज**

संपूर्ण जग दोन महायुद्धांत होरपळून निघाले होते. पहिल्या महायुद्धानंतर युद्धे टाळावीत म्हणून राष्ट्रसंघाची (League of Nations) सन १९२० मध्ये स्थापना झाली. परंतु राष्ट्राराष्ट्रांमधील संघर्ष टाळण्यास राष्ट्रसंघास आलेले अपयश हे दुसऱ्या महायुद्धाच्या अनेक कारणांपैकी एक प्रमुख कारण ठरले. दुसऱ्या महायुद्धाची दाहकता पहिल्या महायुद्धापेक्षा कितीतरी पटीने अधिक होती. नव्या भयानक संहारक शस्त्रास्त्रांमुळे व आधुनिक युद्धतंत्रामुळे हे युद्ध कल्पनातीत विनाशकारी ठरले. दुसऱ्या महायुद्धाची दाहकता व व्यापकता जसजशी वाढत होती तसतसा युद्धे टाळण्याचा विचार लोकशाहीवादी राष्ट्रांच्या नेत्यांच्या, दोस्त राष्ट्रांतील नेत्यांच्या मनात घोळू लागला.

दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेचा युद्धप्रवेश होण्यापूर्वीच अटलांटिक महासागरातील न्यू फाउंडलंडच्या किनाऱ्यानजीक अमेरिकन राष्ट्राध्यक्ष फ्रँकलिन रूझवेल्ट व इंग्लंडचे पंतप्रधान विन्स्टन चर्चिल या दोन राष्ट्रप्रमुखांमध्ये ९ ते १२ ऑगस्ट, १९४१ पर्यंत झालेल्या बैठकीनंतर १४ ऑगस्ट, १९४१ रोजी 'अटलांटिक चार्टर' घोषित करण्यात आला. अंतिम विजयाच्या दृष्टीने जास्तीत जास्त राष्ट्रांची व त्या राष्ट्रांमधील जनतेची सहानुभूती व पाठिंबा प्राप्त करून घेण्याच्या उद्देशाने, तसेच युद्धोत्तर जगाची व्यवस्था व स्वरूप याबाबतचे इंग्लंड व अमेरिकेचे आदर्श, तत्त्वे व कल्पना 'अटलांटिक चार्टर' मध्ये घोषित करण्यात आल्या. अटलांटिक चार्टरने आंतरराष्ट्रीय सहकार्य व शांतता यांचा आदर्श जगापुढे ठेवला.

अटलांटिक चार्टर जाहीर झाल्यानंतर १ जानेवारी, १९४२ रोजी अमेरिका, रशिया, इंग्लंड, चीन, फ्रान्स या दोस्तांच्या आघाडीने ही सनद स्वीकारली. लवकरच इतर २२ राष्ट्रांनी तिला मान्यता दिली. त्यानंतर २४ ऑक्टोबर, १९४५ रोजी ५० राष्ट्रांनी संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेवर स्वाक्षऱ्या करून संयुक्त राष्ट्रसंघाची अधिकृत स्थापना केली.

२४ ऑक्टोबर हा संयुक्त राष्ट्रसंघटना दिन समजण्यात येऊ लागला. प्रारंभीच्या काळात संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सभासदांची संख्या ५० होती ती आतापर्यंत वाढत १९४ पर्यंत जाऊन पोहोचली. संयुक्त राष्ट्रसंघटनेची सनद ही बरीच विस्तृत व तपशीलवार आहे व त्यात संघटनेचे उद्दिष्ट स्पष्ट केलेले आहे. सनदेचे १९ भाग असून १११ कलमे त्यात अंतर्भूत करण्यात आलेली आहेत. ह्या सनदेच्या सुरुवातीसच उद्दिष्टांची जी घोषणा करण्यात आली आहे ती पुढीलप्रमाणे आहे, ''आम्ही संयुक्त राष्ट्रसंघातील लोक, यांनी एकाच पिढीत दोन महायुद्धे व त्यातून घडणारा विनाश पाहिला व भावी पिढ्यांना अशा प्रकारचा विनाश पहावा लागू नये म्हणून युद्ध पुन्हा होऊ द्यावयाचे नाही असा दृढनिश्चय करतो. मानवाचे मुलभूत हक्क, मानवी जीविताचे मूल्य, स्त्री-पुरुष समानता, लहान-मोठ्या राष्ट्रांतील समानता ह्यावर आमची दृढ श्रद्धा आहे हे आम्ही पुन्हा जाहीर करतो. आंतरराष्ट्रीय करार, तह आणि इतर करारमदार यांचा मान ठेवला जाईल अशी परिस्थिती जगात निर्माण करणे हे आम्ही आमचे कर्तव्य समजतो. सामाजिक प्रगती व्हावी, जीवनमान वाढावे, व्यक्तिस्वातंत्र्याचा विकास व्हावा अशी आमची धारणा आहे. हे सर्व उद्देश साध्य होण्यासाठी परमसहिष्णुता दाखविण्याचा, चांगले शेजारी या नात्याने एकमेकांशी शांततेने वागण्याचा, जागतिक शांतता व सुरक्षितता टिकविण्याकरिता सर्व प्रयत्न करण्याचा, सामुदायिक हिताकरिता फक्त लष्करी बळ वापरण्याचा, सर्व लोकांची आर्थिक व सामाजिक उन्नती साधण्याकरिता आंतरराष्ट्रीय संघटनांचा उपयोग करण्याचा आम्ही दृढनिश्चय करीत आहोत. ह्या निर्धारानुसार आमच्या प्रत्येकाच्या सरकारने सॅनफ्रान्सिको येथे जमलेल्या आमच्या प्रतिनिधींच्यामार्फत संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सनदेला मान्यता दिली आहे. या लेखानुसार संयुक्त राष्ट्रसंघटना नावाची एक आंतरराष्ट्रीय संघटना आम्ही निर्माण करीत आहोत.''

संयुक्त राष्ट्रसंघ हे पहिल्या महायुद्धानंतर स्थापन झालेल्या राष्ट्रसंघाचे (League of Nations) पुनरुज्जीवित किंवा सुधारित रूप होते, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. प्रा. गुडरिच म्हणतात की, ''नवीनतम कल्पना आणि तंत्रज्ञान यांच्या शोधावर प्रगती अवलंबून असते. भूतकाळात ज्या कल्पना व तंत्रज्ञान यांचे उपयोजन करताना अत्यंत उपयोगी ठरल्या आहेत आणि बदलत्या जगाच्या गरजा लक्षात घेऊन त्यांच्यात योग्य असे बदल करण्याची क्षमता व्यवहारवादी मुत्सद्द्यांमध्ये असणे आवश्यक असते.''

### १.२.१ संयुक्त राष्ट्रसंघाची उद्दिष्टे व तत्त्वे

संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सनदेच्या पहिल्या प्रकरणात संघटनेची उद्दिष्टे व तत्त्वे विशद करण्यात आलेली आहेत. पहिल्या प्रकरणातील पहिल्या कलमात संघटनेची उद्दिष्टे स्पष्ट करण्यात आली आहेत.

१. आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता कायम राखणे. जागतिक शांततेस धोका उत्पन्न करणाऱ्या आक्रमक राष्ट्रांविरुद्ध परिणामकारक सामूदायिक कारवाई करणे. अशा प्रकारच्या कारवाईत शांतताभंग होणार

नाही याबाबत दक्षता घेणे, परंतु तरीही शांतताभंग होण्यासारखी परिस्थिती निर्माण झाल्यास त्या परिस्थितीवर सामूदायिकरीत्या मात करून सर्व प्रकारचे आंतरराष्ट्रीय वाद शांततेच्या मार्गाने व न्याय्य तत्त्वांवर मिटविण्याचा प्रयत्न करणे. शक्यतोवर आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे सर्व वाद व संघर्ष वाटाघाटींच्या माध्यमातून सोडवून जागतिक शांतता व सुरक्षितता कायम टिकविणे.

२. राष्ट्राराष्ट्रांमध्ये मित्रत्वाची भावना वाढीस लागेल, मैत्रीपूर्ण सलोख्याचे संबंध प्रस्थापित होतील याबाबत प्रयत्नशील राहणे. परस्परांच्या न्याय्य, समान हक्कांचा आदर राखून तसेच राष्ट्रीय स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाशी इमान ठेवून राष्ट्राराष्ट्रांमध्ये मित्रत्वाचे संबंध वाढीस लावून, त्यातून जागतिक शांततेच्या कार्याला बळकटी प्राप्त करून देणे.

३. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि मानवी हिताच्या समस्या सोडविण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य संपादन करणे. वंश, लिंग, भाषा, धर्म अशा कारणांनी माणसामाणसात कोणताही भेदभाव न करता सर्वांना मूलभूत स्वातंत्र्याची हमी मिळवून देऊन मानवी हक्कांची जपणूक व सन्मान करणे. मूलभूत स्वातंत्र्य आणि मानवी हक्कांबद्दलचा आदरभाव वाढीस लावणे.

४. ही उद्दिष्टे प्रत्यक्ष कृतीत आणण्यासाठी आणि निरनिराळ्या राष्ट्रांच्या कृती व धोरणे यांमध्ये सुसंवाद निर्माण करण्यासाठी मध्यवर्ती आंतरराष्ट्रीय संघटना या नात्याने कार्य करणे.

पहिल्या प्रकरणातील दुसऱ्या कलमात सभासदांच्या व संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या कार्यासाठी सात तत्त्वे मान्य करण्यात आली आहेत.

१. संयुक्त राष्ट्रसंघटना ही सर्व सभासद राष्ट्रांच्या सार्वभौम समतेच्या तत्त्वावर आधारलेली आहे. याचाच अर्थ सभासद राष्ट्र छोटे असो किंवा मोठे, प्रगत असो किंवा अप्रगत सर्व सभासद राष्ट्रांचे सार्वभौमत्व समान आहे.

२. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सनदेत नमूद करण्यात आलेल्या सर्व कर्तव्यांचे व बंधनांचे प्रामाणिकपणे पालन सर्व सभासद राष्ट्रांनी काटेकोरपणे करणे अत्यावश्यक आहे. सर्व सभासद राष्ट्रांनी अत्यंत प्रामाणिकपणे अशी कर्तव्यदक्षता दाखविल्यास सर्व सभासदांना सनदेत नमूद हक्कांचा व अन्य सोयींचा लाभ घेता येईल.

३. सर्व सभासद राष्ट्रांनी आपापसातील वाद व संघर्ष शांततामय मार्गाने वाटाघाटींच्या माध्यमातून सोडवावेत. सामोपचाराच्या पद्धतीचा अवलंब करून कोणत्याही परिस्थितीत आंतरराष्ट्रीय शांतता, सुरक्षितता आणि न्याय यांना बाधा पोहोचणार नाही याची काळजी सर्व सभासद राष्ट्रांनी घ्यावी.

४. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या तत्त्वांना विघातक व विसंगत ठरेल अशी कुठलीही कृती आंतरराष्ट्रीय राजकारणात सभासद राष्ट्रांनी करू नये. कोणत्याही राष्ट्राची प्रादेशिक एकात्मता, सार्वभौमत्व अथवा राजकीय स्वातंत्र्य याविरुद्ध सभासद राष्ट्राने लष्करी सामर्थ्याचा वापर करणे अथवा युद्धाची धमकी देणे या दोन्ही मार्गाचा अवलंब करू नये.

५. संयुक्त राष्ट्रसंघटनेचे प्रत्येक सभासद राष्ट्र राष्ट्रसंघटनेच्या सनदशीर कारवाईत सर्व प्रकारचे अपेक्षित सहकार्य देईल आणि ज्या राष्ट्राविरुद्ध संयुक्त राष्ट्रसंघटनेस कारवाई करणे भाग पडले असेल अशा राष्ट्राला कोणत्याही प्रकारची मदत करणार नाही.

६. ज्या राष्ट्रांनी संयुक्त राष्ट्रसंघटनेचे सभासदत्व स्वीकारले नाही अशा राष्ट्रांनाही जागतिक शांतता व सुरक्षितता कायम राखण्याच्या दृष्टीने संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेतील तत्त्वांचा शक्य तेथे अवलंब करण्यास प्रवृत्त करण्याचा संघटना प्रयत्न करील.

७. सभासद राष्ट्रांच्या अंतर्गत व्यवहारात (Domestic Jurisdiction) संयुक्त राष्ट्रसंघटना ढवळाढवळ करणार नाही.

## १.२.१ संयुक्त राष्ट्रसंघाचे स्वरूप

### संयुक्त राष्ट्रसंघाचे सदस्यत्व

इ. स. १९४५ मध्ये भरलेल्या सॅन फ्रान्सिस्को परिषदेला उपस्थित असलेली सर्व राष्ट्र आणि १ जानेवारी, १९४२ रोजी अमेरिकेच्या पुढाकाराने भरलेल्या वॉशिंग्टन परिषदेमध्ये ज्या राष्ट्रांनी संयुक्त राष्ट्र घोषणापत्रावर सह्या केल्या होत्या, अशा सर्व राष्ट्रांना संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या संस्थापक सभासदत्वाचा (Original Membership) हक्क प्राप्त झाला. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या अशा संस्थापक सभासदांची संख्या ५१ आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेच्या चौथ्या कलमानुसार सनदेत नमूद केलेल्या अटी मान्य असणाऱ्या सर्व शांतताप्रिय राष्ट्रांना संयुक्त राष्ट्रसंघाचे सभासदत्व खुले आहे. सनदेत नमूद केलेल्या जबाबदाऱ्या पार पाडण्याची इच्छा व क्षमता सभासद होऊ इच्छिणाऱ्या राष्ट्रामध्ये आहे अशी सुरक्षा परिषदेतील पाच कायम सदस्य राष्ट्रांची खात्री झाली की, संबंधित राष्ट्राच्या सदस्यत्वाबाबत सुरक्षा परिषद महासभेकडे शिफारस करते आणि प्रस्तुत प्रस्तावाला महासभेतील कमीत कमी २/३ सदस्यांची मंजुरी मिळाल्यास त्या राष्ट्राला संयुक्त राष्ट्रसंघाचे सदस्यत्व मिळू शकते.

**संयुक्त राष्ट्रसंघाची रचना :** संयुक्त राष्ट्रसंघाची उद्दिष्टे व ध्येये साध्य होण्याकरिता सहा प्रमुख घटक संस्था निर्माण करण्यात आल्या.

१) महासभा (General Assembly)

२) सुरक्षा समिती (Security Council)

३) आर्थिक आणि सामाजिक समिती (Economic Social Council)

४) विश्वस्त समिती (Trusteeship Council)

५) आंतरराष्ट्रीय न्यायालय (International Court of Justice)

६) सचिवालय (The Secretariat)

**१. महासभा** (General Assembly)

संयुक्त राष्ट्रसंघाच्या ज्या सभेस 'जगाची आमसभा' म्हटले जाते ते संयुक्त राष्ट्रसंघाचे सर्वांत महत्त्वाचे आणि सर्वांत मोठे अंग आहे. इतर सर्व समित्यांची ती जननीच म्हटली आहे. या महासभेमध्ये सर्व सभासद राष्ट्रांचे प्रतिनिधी असतात. प्रत्येक सभासद राष्ट्रास स्वतःचे जास्तीतजास्त पाच प्रतिनिधी महासभेवर पाठवता येतात. अर्थात, ५ प्रतिनिधींखेरीज ५ पर्यायी प्रतिनिधी, तज्ज्ञ व तत्सम दर्जाचे प्रतिनिधीही शिष्टमंडळास आवश्यक वाटतील तेवढे पाठवता येतात. मात्र प्रत्येक सभासद राष्ट्रास मत एकच असते. प्रतिनिधींची नियुक्ती सभासद राष्ट्रास आपल्या मर्जीप्रमाणे करता येते. सभासद राष्ट्रांच्या प्रतिनिधींना आपल्या सरकारच्या सूचनाबरहुकूम कार्य करता येते. या अर्थाने महासभा म्हणजे एक राजनैतिक परिषदच असे म्हटले जाते.

**महासभेच्या समित्या :** महासभेसमोर येणाऱ्या विविध प्रश्नांवर सर्वांना पुरेसे लक्ष देणे शक्य नसल्याने, सोईसाठी सभेतील सदस्यांच्या विविध समित्या तयार केल्या आहेत.

**सहा प्रमुख समित्या :** (१) राजकीय व सुरक्षाविषयक समिती (Political and Security Committee), (२) आर्थिक व वित्तीय (Economic and Financial Committee), (३) सामाजिक, मानवीय व सांस्कृतिक समिती (Committee on Social, Humanitarian and Cultural Matters), (४) विश्वस्त समिती (Trust- eeship Committee), (५) प्रशासकीय व अर्थसंकल्पविषयक समिती (Administrative and Budgetary Committee), (६) कायदा समिती (Legal Committee).

**इतर समित्या :** दोन कामकाजविषयक समित्या (१) हंगामी विषय नियामक समिती. (२) राजनैतिक दस्तऐवज समिती.

**दोन स्थायी समित्या** (१) प्रशासकीय व अर्थसंकल्पविषयक प्रश्नांची समिती (२) योगदान समिती (Committee on Contributions) या दोन समित्या कायम स्वरूपाच्या असून महासभेच्या अधिवेशन काळात व अधिवेशन नसलेल्या काळातही कार्यरत असतात.

या समित्यांशिवाय आवश्यक वाटतील तेव्हा व तेवढ्या हंगामी (Advoc) समित्या नियुक्त केल्या जातात. दरवर्षी साधारणपणे दहा-बारा हंगामी समित्या नियुक्त केल्या जातात.

**महासभेची कामे व अधिकार :**

सुरक्षा परिषदेच्या तात्पुरत्या (अस्थायी) सभासदांची निवड करणे, सुरक्षा परिषदेच्या शिफारशीवरून सचिवालयाच्या महासचिवाची नेमणूक करणे, आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या १५ न्यायाधीशांची निवड करणे, आर्थिक आणि सामाजिक मंडळाचे सभासद आणि विश्वस्त सभेचे सभासद यांची निवड करण्याचे काम महासभा करते.

संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या कार्यकक्षेत मोडणाऱ्या सर्व प्रकारच्या प्रश्नांवर चर्चा आणि विचारविनिमय करणे, सदस्य राष्ट्रांना आणि राष्ट्रसंघटनेच्या घटक संस्थांना आवश्यक सूचना देणे आणि आंतरराष्ट्रीय शांततेला व सुरक्षिततेला धोका निर्माण करणाऱ्या प्रश्नांकडे सुरक्षा परिषदेचे लक्ष वेधण्याचे काम महासभा करते. आंतरराष्ट्रीय न्यायालयाव्यतिरिक्त संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्व घटक संस्था आपले अहवाल महासभेला सादर करतात. महासभेमध्ये त्या अहवालांवर सविस्तर चर्चा करून आवश्यक सूचना व शिफारशी करण्याचे कार्य महासभा करते. संयुक्त राष्ट्रसंघटनेचे अंदाजपत्रक महासभा मंजूर करते आणि सभासद राष्ट्राची आर्थिक कुवत लक्षात घेऊन त्या राष्ट्राची वर्गणी निश्चित करते.

संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सनदेतील कलमांच्या दुरूस्तीबाबतचे अधिकार महासभेला आहेत, मात्र अशा प्रकारच्या दुरूस्तीसाठी विशेष बहुमताची आवश्यकता असते. कोणत्याही विवाद्य कायदाविषयक प्रश्नावर महासभा आंतरराष्ट्रीय न्यायालयाचा सल्ला विचारू शकते. महासभा हे संयुक्त राष्ट्रसंघटनेचे मुख्य अंग असल्यामुळे राष्ट्रसंघटनेच्या अन्य सर्व घटक संस्थांवर महासभा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या देखरेख ठेवते. आवश्यकता भासल्यास सदस्य राष्ट्राचे सदस्यत्व स्थगित करणे, रद्द करणे किंवा निलंबित करणे हे कार्यही महासभा करते.

**शांततेसाठी एकता ठराव** (Uniting for Peace Resolution)

संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना मुख्यत्वे जगाला युद्धाच्या भयानकतेपासून वाचवून आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता प्रस्थापित करण्यासाठी झाली आहे. परंतु हा मूलभूत उद्देश बाजूस ठेवून, दुसऱ्या महायुद्धानंतर उदयास आलेल्या अमेरिका व सोव्हिएट युनियन या दोन महासत्तांनी (Super Powers) आपल्या प्रतिष्ठेसाठी शीतयुद्ध सुरू करून जागतिक परिस्थितीत तणाव निर्माण केला. विसाव्या शतकाच्या सहाव्या व सातव्या दशकात शीतयुद्ध पराकोटीच्या तीव्रतेस पोहोचले होते. अशा परिस्थितीत जगातील तिसरी सत्ता म्हणून अलिप्त राष्ट्रांच्या चळवळीने (Non-Aligned Movement) महासत्तांवर दबाव आणण्याचा थोडाफार प्रयत्न केला, परंतु त्याला फारसे यश आले नाही.

यूनोच्या सनदेने आंतरराष्ट्रीय शांततेस धोका निर्माण झाल्यास त्यावर उपाययोजना करण्याचे सर्वाधिकार सुरक्षा मंडळास बहाल केले आहेत. परंतु १९५० साली उत्तर कोरिया व दक्षिण कोरिया यांच्यात युद्ध जुंपण्याचा धोका निर्माण झाला असताना सुरक्षा मंडळात तेथे संयुक्त राष्ट्रसंघाची फौज पाठविण्याचा प्रस्ताव आला होता. या प्रस्तावाला सोव्हिएट रशियाने नकाराधिकार वापरल्याने पेचप्रसंग उद्भवला. यातून मार्ग काढण्यासाठी अमेरिकेने यूनोच्या महासभेपुढे 'शांततेसाठी एकता ठराव' (Uniting for Peace Resolution) मांडला. या ठरावाला सोव्हिएट रशियाने कडाडून विरोध केला. तरीही महासभेने हा ठराव ३ नोव्हेंबर, १९५० रोजी मोठ्या बहुमताने मंजूर केला. या ठरावातील महत्त्वाचे मुद्दे असे होते –

१. आंतरराष्ट्रीय शांततेच्या प्रश्नावर सुरक्षा मंडळ नकाराधिकारामुळे निर्णय घेऊ शकत नसेल तर हा प्रश्न थेट महासभेकडे सोपवावा.

२. आवश्यक वाटल्यास महासभेचे तातडीचे अधिवेशन बोलाविण्यात यावे.

३. यूनोच्या लष्करी दलात सामील करण्यासाठी सभासद राष्ट्रांनी खास यूनो शस्त्रदल ठेवावे.

४. नवीन शांतता निरीक्षण मंडळ (Peace Observation Commission) स्थापन करण्यात यावे.

५. लष्करी तज्ज्ञांचा एक गट नियुक्त करण्यात यावा.

६. सामुदायिक उपाययोजना समिती (Collective Measures Committee) नियुक्त करण्यात यावी.

शांतता एकता ठरावान्वये आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता प्रस्थापित करण्याची अंतिम जबाबदारी यूनोच्या महासभेवरच आहे हे सिद्ध झाले. आंतरराष्ट्रीय शांततेचा ठराव महासभेने २/३ बहुमताने संमत केल्यास नकाराधिकार असलेले सुरक्षा मंडळदेखील अडवणूक करू शकणार नाही.

यानंतर पुढील काळातही सुरक्षा मंडळाकडून आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता प्रस्थापित करण्याची जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडत नसल्याच्या कारणावरून महासभेची आणीबाणी अधिवेशने बोलावण्यात आली. थोडक्यात, 'शांततेसाठी एकता ठराव' ही तरतूद यूनोच्या सनदेचाच एक भाग बनली. तरीही शांततेसाठी एकता ठरावातील आणीबाणी अधिवेशनाशिवाय इतर तरतुदींचा वापर करण्यात आला नाही. त्यामुळे हा ठरावही काही प्रमाणात निष्प्रभ झाल्याचे दिसून येते.

**महासभेच्या अधिवेशनाचा कालावधी**

यूनोच्या महासभेचे अधिवेशन वर्षातून किमान एकदा बोलाविण्याची तरतूद सनदेत करण्यात आली आहे. हे अधिवेशन दरवर्षी साधारणपणे सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात बोलाविण्यात येते व सुमारे एक महिना चालते. आवश्यक वाटल्यास खास अधिवेशन किंवा आणीबाणी-अधिवेशन देखील बोलाविण्याची सनदेत दुरुस्ती करून तरतूद करण्यात आली आहे. आपल्या कामकाजासंबंधीचे नियम महासभाच ठरवीत असते. प्रत्येक अधिवेशनासाठी अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड महासभा करते. प्रत्येक सभासद राष्ट्राचे एकच मत असते व महत्त्वाच्या प्रश्नांचा निर्णय हा उपस्थित असून मतदान केलेल्या किमान दोन-तृतीयांश सभासदांच्या बहुमताने घेण्यात येतो.

२. **सुरक्षा समिती** (Security Council)

अमेरिका, सोव्हिएट रशिया, इंग्लंड, फ्रान्स व राष्ट्रवादी चीन (फोर्मोसा) हे सुरक्षा परिषदेचे ५ कायम सभासद आणि अन्य १० अस्थायी सभासद मिळून सुरक्षा परिषदेमध्ये एकूण १५ सभासद असतात. अस्थायी सभासदांची निवड २ वर्षे मुदतीसाठी महासभेकडून होते. अस्थायी सभासदांची निवड करताना त्या राष्ट्रांनी संयुक्त राष्ट्रसंघाच्या कार्यात केलेले योगदान व निरनिराळ्या भौगोलिक क्षेत्रांना द्यावयाचे प्रतिनिधित्व हे मुद्दे विचारात घेतले जातात. सुरुवातीला संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या मूळ सनदेनुसार सुरक्षा परिषदेमध्ये ५ कायम सभासद आणि ६ अस्थायी सभासद मिळून एकूण ११ सभासद अशी तरतूद होती. तथापि डिसेंबर, १९६३ मध्ये महासभेने केलेल्या घटनादुरूस्तीनुसार अस्थायी सभासदांची संख्या १० करण्यात आली. प्रस्तुत घटनादुरूस्ती ३१ ऑगस्ट, १९६५ पासून अंमलात आली. पश्चिम युरोप, पूर्व युरोप व मध्यपूर्व यांना प्रत्येकी

एक प्रतिनिधी, लॅटिन अमेरिकेला २ प्रतिनिधी, आफ्रिकेला ३ प्रतिनिधी आणि आशियाला २ प्रतिनिधी असे एकूण १० अस्थायी सभासद सुरक्षा परिषदेमध्ये असतात.

सन १९४९ मध्ये चीनमध्ये साम्यवादी क्रांती झाली. साम्यवादी क्रांतीनंतर चीनमध्ये स्थापन झालेल्या कम्युनिस्ट सरकारला अमेरिकेच्या नेतृत्वाखालील पाश्चात्त्य राष्ट्रांनी संयुक्त राष्ट्रसंघटनेचे सभासदत्व मिळू दिले नाही. त्यामुळे सुरक्षा परिषदेतील कायम सभासदत्व राष्ट्रवादी चीनकडे (फोर्मोसा) कायम राहिले. २६ ऑक्टोबर, १९७१ रोजी कम्युनिस्ट चीनला संयुक्त राष्ट्रसंघटनेचे सभासदत्व आणि सुरक्षा परिषदेचे कायम सभासवत्व प्राप्त झाले. अस्थायी सभासद या नात्याने भारताची आतापर्यंत ४ वेळा सुरक्षा परिषदेवर निवड झाली आहे.

सुरक्षा परिषद ही संयुक्त राष्ट्रसंघटनेची कार्यकारिणी असून आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता टिकविण्याच्या दृष्टीने ती अत्यंत महत्त्वपूर्ण यंत्रणा आहे. आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता राखणे, प्रसंग पडल्यास आक्रमक राष्ट्राविरुद्ध सामूहिक दंडयोजनेचा वापर करणे ही सुरक्षा परिषदेची प्रमुख जबाबदारी आहे. संयुक्त राष्ट्रसंघटनेचे कोणतेही सभासद राष्ट्र जागतिक शांततेस धोका निर्माण करणाऱ्या प्रश्नाकडे सुरक्षा परिषदेचे लक्ष वेधू शकते. खुद्द स्वतःच्या अखत्यारीत सुरक्षा परिषद अशा शांतताभंग करणाऱ्या गंभीर प्रश्नावर चर्चा घडवून निर्णय घेऊ शकते. महासभा अथवा महासचिव महत्त्वाच्या प्रश्नाकडे सुरक्षा परिषदेचे लक्ष वेधू शकतात. इतकेच नव्हे तर संयुक्त राष्ट्रसंघटनेचे सभासद नसलेले राष्ट्रही अशा धोकादायक प्रश्नाकडे सुरक्षा परिषदेचे लक्ष वेधू शकते. सुरक्षा परिषदेची १५ दिवसातून एकदा बैठक भरते. जागतिक शांततेस धोका निर्माण झाल्यास विशेष बैठक केव्हाही भरू शकते. ज्या राष्ट्राविषयी सुरक्षा परिषदेमध्ये चर्चा चालू आहे, ते संबंधित राष्ट्र आपली बाजू मांडण्यासाठी परिषदेच्या बैठकीस हजर राहू शकते, चर्चेत भाग घेऊ शकते, तथापि मतदान करू शकत नाही.

सुरक्षा परिषदेमध्ये सामान्य कामकाजाच्या विषयांबाबत १५ सभासदांपैकी ९ सभासदांच्या बहुमताने निर्णय घेतला जातो. विशेष महत्त्वाच्या विषयांच्या बाबतीत ९ अनुकूल सभासदांमध्ये ५ कायम सभासद असल्याशिवाय निर्णय होऊ शकत नाही. याचाच अर्थ अत्यंत महत्त्वपूर्ण विषयांच्या बाबतीत कायम सभासदांपैकी एकाचेही नकारार्थी मत असेल तर निर्णय होऊ शकत नाही. यालाच कायम सभासदाचा नकाराधिकार (veto) म्हणतात. एखाद्या कायम सभासदाने मतदानात भाग घेतला नाही अथवा तटस्थता स्वीकारली, तर तो नकाराधिकार मानला जात नाही. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेच्या दुरूस्तीसाठी सुरक्षा परिषदेतील ५ कायम सभासद राष्ट्रांची मान्यता अनिवार्य आहे. त्याशिवाय त्या दुरूस्तीला कायद्याचे स्वरूप प्राप्त होऊ शकत नाही. सुरक्षा परिषदेच्या शिफारशीनुसार महासभा महासचिवाची नेमणूक करते.

**आर्थिक व सामाजिक समिती** (Economic and Social Council)

यूनोच्या आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता या उद्दिष्टांच्या बरोबरीने, आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत आर्थिक व सामाजिक सहकार्य असावे या उद्दिष्टासाठी आर्थिक व सामाजिक मंडळाची स्थापना करण्यात आली आहे.

यूनो सनदेच्या ५५ व्या कलमात राष्ट्राराष्ट्रांत शांततापूर्ण व मैत्रिपूर्ण सहकार्य निर्माण होऊन स्थैर्य, समान हक्क आणि स्वयंनिर्णय यांना उत्तेजन देण्यासाठी मंडळाची संकल्पना स्पष्ट केली आहेत.

**उद्दिष्टे :**

१. उच्च राहणीमान, पूर्ण रोजगार, आर्थिक व सामाजिक प्रगती आणि विकास.

२. आंतरराष्ट्रीय आर्थिक, सामाजिक, आरोग्यविषयक समस्या सोडवणे. तसेच आंतरराष्ट्रीय संस्कृती व शैक्षणिक सहकार्य यास उत्तेजन देणे.

३. वंश, लिंग, भाषा यांचा भेदभाव न करता मानवी हक्क व मूलभूत स्वातंत्र्य यांचे पालन करणे व त्याविषयी आदर ठेवणे.

**रचना :**

संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेकडून आर्थिक व सामाजिक मंडळांच्या सभासदांची तीन वर्षांसाठी निवड केली जाते. त्यातील १/३ सभासद दरवर्षी निवृत्त केले जातात व तितक्याच सभासदांची निवड महासभेकडून केली जाते. निवृत्त सभासद पुनर्निवडीस पात्र असतो. या मंडळाची सभासद संख्या सुरुवातीस १८ होती, परंतु १९६५ साली ही संख्या २७ पर्यंत वाढविण्यात आली. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे युद्धोत्तर काळात आशिया-आफ्रिका खंडात स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांना यूनोत प्रवेश देण्यात आला हे होय.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेमध्ये विभागवार प्रतिनिधींची निवड करण्याची तरतूद नसूनही प्रथा म्हणून पुढील विभागातून सभासदांची निवड केली जाते. आशिया-आफ्रिका खंडांतील देश १२ सभासद, पूर्व युरोपीय देश ३ सभासद, लॅटिन अमेरिकेतील देश ५ सभासद, पश्चिम युरोप, अमेरिका व कॅनडा ७ सभासद असे एकूण २७ सभासद निवडले जातात. आतापर्यंत, मंडळाच्या एकूण सभासदांपैकी सुमारे २/३ सभासद विकसनशील राष्ट्रांचे निवडल्याचे दिसून येते.

आर्थिक व सामाजिक मंडळाची बैठक वर्षातून किमान २ वेळा भरते. आर्थिक व सामाजिक मंडळाने कामाच्या सोईसाठी दळणवळण व दूरसंचार समिती, आंतरराष्ट्रीय वस्तू व्यापार समिती, मानवी हक्क समिती, नशा वस्तू समिती शिवाय युरोप, आशिया व अतिपूर्व, लॅटिन अमेरिका आणि आफ्रिका या विभागांसाठी चार प्रादेशिक समित्या नियुक्त केल्या आहेत.

**अधिकार व कामे**

संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेत ६२ ते ६६ कलमांमध्ये नोंदलेल्या आर्थिक व सामाजिक मंडळांच्या अधिकाराचे व कामाचे स्वरूप मुख्यतः अभ्यासगटाच्या चर्चा, अहवाल, शिफारशी आणि आर्थिक व सामाजिक क्षेत्रांमध्ये चालू असलेल्या कार्यात समन्वय साधणे असे आहे. या मंडळास कोणतेही अंमलबजावणीविषयक अधिकार देण्यात आलेले नाहीत. मंडळाच्या कामाची सोईनुसार तपशीलवार नोंद पुढीलप्रमाणे आहे.

**१. अभ्यास व अहवाल :** आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आरोग्य या क्षेत्रांत आंतरराष्ट्रीय पातळीवर अभ्यासगट नियुक्त करून, त्याचे अहवाल व शिफारशी महासभा, यूनोची सभासद राष्ट्रे व यूनोच्या विशेष घटकांकडे विचारार्थ पाठवणे.

**२. चर्चा व शिफारशी :** मानवी हक्क व मूलभूत स्वातंत्र्ये या अत्यंत महत्त्वाच्या विषयांवर सखोल चर्चा करून, त्यांचे योग्य असे रक्षण करण्यासाठी 'नियमावली' (Convention) तयार करणे व ती यूनोच्या महासभेकडे अंतिम मंजुरीसाठी पाठवण्याचे, महत्त्वाचे कार्य आर्थिक व सामाजिक मंडळांवर सोपविण्यात आले आहे.

**३. विशेष घटकांच्या कामांमध्ये समन्वय :** संयुक्त राष्ट्रसंघाने आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षित या आपल्या उद्दिष्टांवर दुसरे महत्त्वाचे उद्दिष्ट मानवतावादी भूमिकेतून सर्वंकष विकास घडवून आणणे, हे ठेवले आहे. तिसऱ्या महायुद्धाचा धोका टळल्यानंतर यूनोला विधायक स्वरूपात काम करता यावे यासाठी यूनोने अनेक खास संघटना निर्माण केल्या आहेत.

आर्थिक व सामाजिक मंडळ आपले काम पार पाडण्यासाठी कार्यकारी आयोग व प्रादेशिक आयोग नियुक्त करीत असते. (१) सांख्यिकी आयोग (२) सामाजिक आयोग (३) लोकसंख्या आयोग (४) मानवी हक्क आयोग (५) महिला दर्जा आयोग (६) आंतरराष्ट्रीय वस्तू व्यापार आयोग (७) अमली पदार्थ आयोग असे सात कार्यकारी आयोग असून, महासभा विशिष्ट कामासाठी अतिरिक्त आयोगांची नियुक्ती करीत असते. आर्थिक व सामाजिक मंडळाने चार प्रादेशिक आयोग नियुक्त केले आहेत. (१) युरोपीय आर्थिक आयोग (ECE) (२) आशियाई व पूर्व आशियाई आर्थिक आयोग (ECAFE) (३) लॅटिन अमेरिका आर्थिक आयोग (ECLA) (४) आफ्रिकीय आर्थिक आयोग या आयोगाचे कामकाज, त्या त्या प्रादेशिक विभागाचे खास प्रश्न असतात हे लक्षात घेऊन चालत असते.

**विश्वस्त समिती** (Trusteeship Council)

विश्वस्त समितीमध्ये सुरक्षा परिषदेचे पाच कायम सभासद, विश्वस्त प्रदेशांचा कारभार पाहणाऱ्या राष्ट्रांचे सभासद आणि महासभेकडून निवडले गेलेले अन्य सभासद मिळून एकूण १४ सभासद असतात. पूर्वी राष्ट्रसंघाच्या मॅण्डेट पद्धतीखाली असलेले प्रदेश, दुसऱ्या महायुद्धानंतर अक्षराष्ट्रांच्या सार्वभौमत्वाखालून मुक्त झालेले अविकसित प्रदेश आणि स्वेच्छेने संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या नियंत्रणाखाली दिले गेलेले प्रदेश हे विश्वस्त प्रदेश होत. विश्वस्त प्रदेशातील जनतेचा राजकीय, आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकास घडवून आणून कालांतराने त्यांना स्वातंत्र्य व स्वयंशासन देण्याच्या दृष्टीने त्यांची आवश्यक प्रगती व उन्नती घडविणे हे विश्वस्त मंडळाचे मूलभूत कार्य होय.

विश्वस्त प्रदेशामध्ये प्रशासन करणाऱ्या विश्वस्त राष्ट्राने त्या प्रदेशाबाबत सादर केलेल्या अहवालाचा साधकबाधक विचार करून आवश्यक टीकाटिप्पणीसह तो अहवाल महासभेला सादर करणे, विश्वस्त प्रदेशात प्रत्यक्ष दौरा करून तेथील परिस्थितीची पाहणी व चौकशी करणे, संबंधित विश्वस्त राष्ट्राला

प्रशासनाबाबत आवश्यक सूचना देणे आणि विश्वस्त करारानुसार आवश्यक कारवाई करणे आदी कामे विश्वस्त मंडळाला करावी लागतात. विश्वस्त यंत्रणेखाली असलेले बहुतेक प्रदेश आता मुक्त झाले असून त्यांना सार्वभौम राष्ट्रांचा दर्जा प्राप्त झाला आहे. त्यापैकी बहुतेक राष्ट्रांनी संयुक्त राष्ट्रसंघटनेचे सभासदत्व स्वीकारले आहे.

याशिवाय संयुक्त राष्ट्रसंघाशी संलग्न असलेल्या काही आंतरराष्ट्रीय यंत्रणा विविध क्षेत्रात कार्यरत आहेत.

१. आंतरराष्ट्रीय कामगार संघटना (ILO)

२. अन्न आणि शेतकी संघटना (FAO)

३. जागतिक आरोग्य संघटना (WHO)

४. जागतिक बँक (IBRD)

५. शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटना (UNESCO)

६. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF)

७. संयुक्त राष्ट्रांचा बालक निधी (UNICEF)

८. संयुक्त राष्ट्रांची व्यापार विकास परिषद (UNCTAD)

**५. आंतरराष्ट्रीय न्यायालय : (International Court of Justice)**

आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार, न्यायदान करणारे आंतरराष्ट्रीय न्यायालय हे यूनोचे एक महत्त्वाचे अंग मानले जाते. स्थायी आंतरराष्ट्रीय न्यायालयाने तयार केलेले अधिनियम (Statutes) यूनोच्या आंतरराष्ट्रीय न्यायालयाने स्वीकृत केले आहेत. या न्यायालयाचे कार्यक्षेत्र जगातील यूनोची सभासद नसलेली राष्ट्रे इतके व्यापक आहे. यूनोचे सभासद नसलेल्या राष्ट्राने आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे अधिनियम स्वीकृत केले असल्यास त्या राष्ट्रास न्यायदान प्रक्रियेतील पक्ष म्हणून स्थान असू शकते. यूनोची महासभा अशा सभासद राष्ट्रास मान्यता देते व न्यायदान प्रक्रियेसाठी येणाऱ्या खर्चाचा वाटा अशा सभासद राष्ट्राने द्यावा असे महासभा बंधन घालते.

**रचना :** आंतरराष्ट्रीय न्यायालयात १५ न्यायाधीश असून त्यांची निवड यूनोच्या सभासद राष्टांतून ९ वर्षांकरिता केली जाते. या न्यायालयावर न्यायाधीश म्हणून ज्यांची निवड करावयाची असते अशी व्यक्ती निष्णात विधिज्ञ, उच्च प्रतीचे नैतिक अधिष्ठान असलेली व सर्वोच्च न्यायालयीन पात्रता असलेली असावी लागते. यूनोचे सभासद असलेल्या कोणत्याही राष्ट्रातील व्यक्ती या न्यायालयाच्या निवडीस पात्र असते. एका देशातून एकापेक्षा जास्त न्यायाधीशांची निवड केली जात नाही किंवा एकाच प्रादेशिक विभागाचे वर्चस्व न्यायाधीश निवडीवर असता कामा नये अशीही खबरदारी घेतली जाते.

न्यायाधीशाच्या निवडीची प्रक्रिया प्रत्यक्ष निवडणुकीपूर्वी तीन महिने सुरू होते. पहिल्या हेग परिषदेनुसार (१८९९) स्थापित केलेल्या स्थायी लवाद न्यायालयास (Permanent Court of Arbitration) पात्र असलेल्या न्यायाधीशांची नावे सुचविण्यासाठी यूनोच्या सरचिटणिसाकडून कळवले जाते. अशी नावे सभासद राष्ट्रांकडून सुचविली जात नसून यूनोने निश्चित केलेल्या राष्ट्रांच्या गटातून सुचविली जातात. संबंधित गटातील राष्ट्रांच्या सर्वोच्च न्यायालयीन यंत्रणेच्या सल्ल्याने राष्ट्रांच्या गटातून जास्तीतजास्त ४ न्यायाधीशांची नावे, सरचिटणिसाकडून महासभेकडे जातात. त्यानंतर महासभा व सुरक्षा मंडळ स्वतंत्रपणे बहुमताने न्यायाधीशांची निवड करतात. दोन्हीकडे बहुमत प्राप्त झालेल्या उमेदवारांची न्यायाधीश म्हणून नियुक्ती केली जाते. दोन्हीकडे बहुमत प्राप्त न झालेल्या उमेदवारांची निवड करण्यासाठी पुन्हा महासभा व सुरक्षा मंडळ यांच्या प्रतिनिधींच्या संयुक्त बैठकीत बहुमताने न्यायाधीशाची निवड होते.

न्यायाधीशांची मुदत ९ वर्षे असते व ते पुनर्निवडीस पात्र असतात. दर तीन वर्षांत पाच न्यायाधीश निवृत्त होतात. आंतरराष्ट्रीय न्यायालयातील न्यायाधीश आपल्या स्वतःच्या राष्ट्राचे प्रतिनिधित्व करीत नसून ते आंतरराष्ट्रीय न्यायसंस्थेचे प्रतिनिधित्व करतात. अधिकारग्रहण करण्यापूर्वी न्यायाधीशांना निष्पक्षपातीपणा व प्रामाणिकपणाची शपथ घ्यावी लागते. न्यायाधीशांना कोणतेही राजकीय, प्रशासकीय वा व्यावसायिक स्वरूपाचे अन्य काम स्वीकारता येत नाही. तसेच एखाद्या प्रकरणामध्ये पूर्वी वकील, सल्लागार वा अन्य प्रकारे एखादा न्यायाधीश संबंधित असेल तर अशा प्रकरणातील न्यायालयीन प्रक्रियेमध्ये त्यास भाग घेता येत नाही.

आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या अध्यक्षाची व उपाध्यक्षाची निवड न्यायाधीशच करतात. न्यायाधीशांना पूर्णतः राजनैतिक संरक्षण असते. न्यायालयाची मुख्य कचेरी हेग (हॉलंड) येथे असून, कचेरीत रजिस्ट्रार व इतर अधिकारी असतात. पूर्ण पीठासाठी गणपूर्तीस ९ न्यायाधीशांची उपस्थिती आवश्यक मानली जाते. न्यायालयाचे निर्णय बहुमताने घेतले जातात. निर्णय प्रक्रियेत समसमान मते पडल्यासच न्यायालयाचे अध्यक्ष आपले मत देतात.

**न्यायालयाचे अधिकार क्षेत्र :** ज्या राष्ट्रांनी आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे अधिनियम (Statutes) स्वीकृत केले आहेत, ती सर्व राष्ट्रे आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या कक्षेत येतात. संबंधित राष्ट्रांनी आपापसातील वाद प्रकरणे न्यायालयात मांडावीत आणि न्यायालयाने दिलेला निर्णय मान्य केलाच पाहिजे असे त्यांच्यावर बंधन आहे. एखादे प्रकरण आपल्या कक्षेत येते किंवा नाही याचा निर्णय न्यायालयानेच स्वतः घेतला पाहिजे. ज्या राष्ट्राने न्यायालयाचे अधिनियम स्वीकृत केलेले नाहीत, असे राष्ट्रही, जर न्यायदान प्रक्रियेशी त्याचा संबंध येत असेल, आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या कक्षेत येते व अशा राष्ट्रास न्यायालयाचा निर्णय मान्य करण्यास सुरक्षा मंडळ भाग पाडू शकते. न्यायालयीन खर्चाचा वाटाही अशा राष्ट्राने देणे आवश्यक समजले जाते.

**न्यायालयाचे कायदेकानून :** न्यायालयाचे कामकाज आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार चालते. आंतरराष्ट्रीय कायद्यामध्ये, प्रस्थापित आंतरराष्ट्रीय संकेत (Conventions), आंतरराष्ट्रीय प्रथा, प्रगत राष्ट्रांची न्यायालयीन तत्त्वे, न्यायालयीन निर्णय, निष्णात कायदे पंडितांनी व्यक्त केलेले विचार यांचा समावेश होतो. आंतरराष्ट्रीय न्यायालयाने पूर्वी दिलेले निर्णय पुढे बंधनकारक नसतात.

**सल्लास्वरूपात मत देणे :** यूनोची महासभा, सुरक्षा मंडळ आणि यूनोच्या अनेक घटकांनी एखाद्या कायदेशीर बाबीवर मत मागितल्यास आंतरराष्ट्रीय न्यायालय सल्लास्वरूपात आपले मत व्यक्त करते. अर्थात न्यायालयाकडे असे मत मागितल्यासच मत दिले जाते. न्यायालयाने दिलेले मत वा सल्ला यूनोच्या संबंधित घटकाने मानलेच पाहिजे, असे बंधन नाही.

**न्यायालयीन निर्णयाची अंमलबजावणी**

आंतरराष्ट्रीय न्यायालयाकडे आपल्या निर्णयाची अंमलबजावणी करणारी स्वतःची अशी यंत्रणा नाही, परंतु संबंधित राष्ट्रे अशा निर्णयाचा आदर करून त्याची अंमलबजावणी स्वतःहून करतात. याचे कारण, यूनोच्या सनदेनुसार आंतरराष्ट्रीय न्यायालय स्थापन झाल्याने, सनदेचे पालन करणे सभासद राष्ट्रांवर बंधनकारक असल्याने न्यायालयीन निर्णय, संबंधित राष्ट्राच्या विरुद्ध असूनही पाळावेच लागतात.

**आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे महत्त्व**

न्यायालयाच्या स्थापनेनंतर काही वर्षे न्यायालयाकडे फारशी प्रकरणे येत नसत, परंतु नंतर समुद्रात मासेमारीचा हक्क, सभासद राष्ट्रांचे आर्थिक हक्क, परकीय नागरिकांचा वकिलातीत आश्रय, हवाई क्षेत्रांचा भंग इत्यादी प्रकरणे न्यायालयासमोर आली आणि न्यायालयाने यामेवात चांगली कामगिरी बजावली.

आंतरराष्ट्रीय न्यायालयाने बऱ्याचशा प्रमाणात न्यायदान केले असले तरी न्यायालय, सर्वसाधारणपणे, दोन्ही पक्ष न्यायालयाचा निर्णय मान्य करायला तयार असतील तरच अशी प्रकरणे न्यायदानासाठी स्वीकारली आहेत. बऱ्याच राष्ट्रांची अशी प्रवृत्तीच आहे की, वादग्रस्त प्रश्नांचा निकाल न्यायालयातून मिळविण्यापेक्षा राजकीय तोडग्यातून मिळवावा. आंतरराष्ट्रीय कायद्यातील संदिग्धता व अनिश्चितता, प्रत्यक्ष आंतरराष्ट्रीय कायद्याशी संबंधित असलेल्या प्रकरणांचा निर्णयही समाधानकारक मिळत नाही, असे सभासद पक्ष, राष्ट्रांना वाटते.

**सचिवालय** (Secretariat)

संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सर्व विभागांचे प्रशासकीय कार्य पार पाडण्यासाठी सचिवालय स्थापन झाले असून ते संयुक्त राष्ट्रसंघाचे सातत्याने काम करीत असलेले कायम स्वरूपाचे कार्यालय आहे. महासचिव (Secretary General) हा सचिवालयाचा मुख्य प्रशासक होय. सुरक्षा परिषदेच्या शिफारशींवरून महासभा ५ वर्षांच्या कार्यकालासाठी महासचिवाची नियुक्ती करते. सचिवालयातील अन्य अधिकारीवर्गाची निवड महासचिव करतो. महासचिवाच्या हाताखालील सर्व अधिकारी आपल्या कामाबद्दल महासचिवास जबाबदार असतात. महासभेने घालून दिलेल्या नियमानुसार महासचिव आपल्या हाताखालील अधिकाऱ्यांची निवड करताना निरनिराळ्या राष्ट्रांना व भौगोलिकदृष्ट्या विविध क्षेत्रांना प्रतिनिधित्व देण्याची दक्षता बाळगतो. कार्यक्षमता, वैयक्तिक पात्रता आणि चारित्र्य यावर ही निवड अवलंबून असते. सचिवालयातील अधिकारीवर्गाची आणि महासचिवाची निष्ठा त्यांच्या राष्ट्राप्रती नव्हे तर संयुक्त राष्ट्रसंघाप्रती असते.

संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या अधिकारक्षेत्रात येणाऱ्या प्रश्नांबाबत आवश्यक ती तांत्रिक माहिती गोळा करून महासभा आणि सुरक्षा परिषद यांना पुरविण्याची जबाबदारी सचिवालयाची आहे. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सदस्य राष्ट्रांमध्ये झालेल्या कराराची नोंद सचिवालयाकडे ठेवावी लागते. सचिवालयात अशी नोंद केल्याशिवाय कोणतेही तह अथवा करारमदार सभासद राष्ट्रांवर बंधनकारक होत नाही. सचिवालयात नोंदविण्यात आलेले सदस्य राष्ट्रांमधील सर्व तह आणि करारमदार संयुक्त राष्ट्रसंघटनेमार्फत प्रकाशित केले जातात.

महासभा आणि सुरक्षा परिषद यांचे सचिवालय या नात्याने महासभेच्या आणि सुरक्षा परिषदेच्या ठरावांची अंमलबजावणी करणे आणि त्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्याचे कार्य सचिवालय करते. महासभेच्या आणि सुरक्षा परिषदेच्या कामांच्या संदर्भात बैठका बोलाविणे, बैठकांची व्यवस्था करणे, कार्यक्रमपत्रिका तयार करणे, अहवाल तयार करणे, संयुक्त राष्ट्रसंघटनेचे अंदाजपत्रक तयार करणे, सभासद राष्ट्रांची वर्गणी वसूल करणे आदी कामे सचिवालयाला करावी लागतात.

आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या वादात गुंतलेल्या संबंधित राष्ट्रांमधील तणाव ओसरावा व त्या राष्ट्रांनी शांततामय वाटाघाटींच्या मार्गांनी आपापसातील संघर्ष मिटविण्याचा प्रयत्न करावा यासाठी महासचिव प्रयत्नशील असतो. कोणत्याही कारणाने आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेस धोका निर्माण होईल असे वाटल्यास महासचिव त्या प्रश्नांकडे सुरक्षा परिषदेचे लक्ष वेधतो. महासभा, सुरक्षा परिषद, आर्थिक व सामाजिक मंडळ, विश्वस्त मंडळ या घटक संस्थांचा प्रमुख प्रशासकीय अधिकारी या नात्याने महासचिव काम करतो. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या विविध घटक संस्थांनी संमत केलेल्या ठरावांची अंमलबजावणी करण्याचे कार्य महासचिवाला करावे लागते. जागतिक वातावरणातील संघर्ष व तणाव कमी करण्यासाठी जातीने पुढाकार घेऊन मध्यस्थी करण्याचे अत्यंत कौशल्यपूर्ण राजनैतिक कार्य महासचिवाला करावे लागत असल्यामुळे साहजिकच राजकीयदृष्ट्या तटस्थ, निःस्पृह, निर्भीड आणि प्रभावशाली व्यक्तीची महासचिवपदासाठी निवड केली जाते. शक्यतोवर तटस्थ देशांच्या नागरिकांमधून महासचिवाची निवड करण्यात येते. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या महासचिवपदी आतापावेतो ट्रिग्वे ली (नॉर्वे), दाग हॅमरस्क्जोल्ड (स्वीडन), ऊथांट (ब्रह्मदेश), कुर्त वाल्डहाईम (ऑस्ट्रिया), जेवियर पेरेस डी क्युलर (पेरु), डॉ. बोट्रोस नोट्रोस घाली (इजिप्त), कोफी अन्नान (घाना), बन कि-मून (दक्षिण कोरिया), यांनी कार्य केले आहे. सन २०१७ पासून अँटोनियो गुटेरेस (पोर्तुगाल) संयुक्त राष्ट्रसंघटनेचे महासचिव या नात्याने कार्य करीत आहेत.

### १.२.३ संयुक्त राष्ट्रसंघटनेचे कार्य

I) **राजकीय क्षेत्रातील कार्य**

१. **ग्रीस :**

महायुद्धोत्तर काळात ग्रीसमधील प्रस्थापित सरकारविरुद्ध सातत्याने बंडे सुरू होती. या बंडांचा बीमोड करण्यासाठी ग्रीसच्या सरकारने ब्रिटिश फौजांची मदत घेतली आणि ग्रीसच्या शेजारील युगोस्लाव्हिया,

अल्बानिया व बल्गेरिया ही साम्यवादी राष्ट्रे ग्रीसमधील बंडखोरांना चिथावणी देत आहेत व सर्व प्रकारची मदतही करीत आहेत अशी तक्रार महासभेकडे केली. त्याचबरोबर सोव्हिएट रशियानेही ग्रीसमधील इंग्लंडच्या हस्तक्षेपाकडे सुरक्षा परिषदेचे लक्ष वेधले. ग्रीसमधील परिस्थितीची पाहणी करण्यासाठी महासभेने नेमलेल्या चौकशी मंडळाने बहुमताने ग्रीस सरकारने केलेल्या आरोपास दुजोरा दिला. या दरम्यान ट्रूमन तत्त्वानुसार अमेरिकेने ग्रीस आणि तुर्कस्थान यांना लष्करी व आर्थिक मदत पाठविण्याचे जाहीर केले. ग्रीसमध्ये झालेल्या यादवी युद्धात अखेरीस बंडखोरांचा पराभव झाल्यामुळे प्रश्न संपला, परंतु ग्रीसमध्ये कायम स्वरूपाची शांतता मात्र निर्माण होऊ शकली नाही.

**२. काश्मीर :**

भारतीय स्वातंत्र्याच्या वेळी काश्मीरचा महाराजा हरिसिंग हा हिंदू तर ९० टक्क्यांहून अधिक प्रजा मुस्लिम अशी काश्मीर संस्थानातील परिस्थिती होती. काश्मीरमधील जनतेने स्वयंनिर्णयाच्या तत्त्वानूसार भारतात की पाकिस्तानात सामील व्हावयाचे हा निर्णय घेण्यापूर्वी महाराजा हरिसिंगाने भारत व पाकिस्तान सरकारशी करार करून 'जैसे थे' परिस्थिती कायम टिकविली होती. आक्रमक पाकिस्तानने काश्मीरच्या खोऱ्यात घुसखोर घुसविले. या घुसखोरांना पिटाळून लावण्यासाठी भारताची कायदेशीर मदत घेता यावी म्हणून हरिसिंगाने भारतामध्ये काश्मीरचे विलीनीकरण केले. भारतीय फौजांनी घुसखोरांचे आक्रमण पिटाळून लावले. जानेवारी १९४८ मध्ये काश्मीरवरील पाकिस्तानी आक्रमणाचा प्रश्न भारताने सुरक्षा परिषदेपुढे उपस्थित केला. १३ ऑगस्ट, १९४८ रोजी सुरक्षा परिषदेने ठराव करून भारत आणि पाकिस्तान या दोन राष्ट्रांमध्ये शस्त्रसंधी घडवून आणली आणि १ जानेवारी, १९४९ पासून शस्त्रसंधी करार अंमलात आला. शस्त्रसंधी झाली त्यावेळी काश्मीर खोऱ्याचा २/३ प्रदेश भारताच्या ताब्यात होता आणि उरलेला १/३ काश्मीर खोऱ्याचा प्रदेश पाकव्याप्त होता.

एप्रिल १९४८ मध्ये सुरक्षा परिषदेने नेमलेल्या मंडळाने काश्मीरचा प्रश्न कायमचा सोडविण्याच्या दृष्टीने काश्मीरमध्ये स्वतंत्र व तटस्थ यंत्रणेद्वारे सार्वमत घ्यावे असे सुचविले. तथापि अशा प्रकारचे सार्वमत घेण्यासाठी पाकव्याप्त प्रदेशातून पाकिस्तानी फौजा मागे घेण्यास पाकिस्तान कधीच तयार झाले नाही. एप्रिल १९४८ पासून ते एप्रिल १९५१ पर्यंत संयुक्त राष्ट्रसंघटनेने नेमलेल्या शिष्टमंडळांना काश्मीरचा प्रश्न सोडविण्यात अपयश आले. फेब्रुवारी १९५४ मध्ये काश्मीरच्या लोकनियुक्त घटना समितीने काश्मीरच्या भारतातील विलीनीकरणावर अंतिम शिक्कामोर्तब केले. सन १९५४ मध्ये पाकिस्तानने सिएटोचे सभासदत्व स्वीकारल्यानंतर पाकिस्तानचे मित्र असलेल्या पाश्चिमात्य राष्ट्रांनी काश्मीर प्रश्न पुन्हा सुरक्षा परिषदेसमोर आणण्याचा आटोकाट प्रयत्न केला, परंतु सोव्हिएट रशियाने नकाराधिकाराचा वापर करून त्यांचा प्रयत्न हाणून पाडला.

ऑगस्ट १९६५ मध्ये पाकिस्तानने युद्धबंदी रेषेपलीकडे पुन्हा एकदा घुसखोर घुसविले आणि अत्यंत बेदरकारपणे आंतरराष्ट्रीय सीमेचा भंग करून सप्टेंबरमध्ये छांब-जौरिया भागात प्रच्छन्न आक्रमण केले. प्रत्युत्तर म्हणून भारतानेही लाहोर प्रदेशात भारतीय सेना घुसविल्या. पाकिस्तानचा याही आक्रमक युद्धात

पराभव झाला आणि लष्करी सामर्थ्यांच्या जोरावर काश्मीर जिंकण्याचा प्रयत्न फसला. २२ सप्टेंबर, १९६५ रोजी सुरक्षा परिषदेने ठराव करून युद्धबंदी केली.

दोन वेळा लष्करी सामर्थ्यांच्या जोरावर काश्मीर हस्तगत करण्याचा पाकिस्तानचा प्रयत फसला. तरीही काश्मीर प्रश्न संपल्याचे पाकिस्तान मान्य करीत नाही आणि अधूनमधून सार्वमताचे तुणतुणे वाजविण्याचे त्याचे काम नेटाने सुरू असते. पाकिस्तानच्या या प्रयत्नाला पाश्चात्य राष्ट्रांनी अप्रत्यक्ष पाठिंबा दिला असला, तरी रशियानेही कायम भारताची बाजू घेतली. सन १९६५ च्या युद्धानंतर भारताची काश्मीरबाबतची भूमिका अधिक ताठर व खंबीर बनली. भारताच्या दृष्टीने सन १९६५ नंतर सार्वमताचा प्रश्न निकालात निघाला असून काश्मीर हा भारतीय संघराज्याचा अविभाज्य भाग आहे, ही भारताची ठाम भूमिका आहे. खरा प्रश्न आहे तो पाकव्याप्त काश्मीर मुक्त करण्याचा. मुस्लिम बहुसंख्यांक असलेल्या काश्मीर या घटकराज्याचे भारतीय संघराज्यातील अस्तित्व हे भारताच्या निधर्मी धोरणाचे प्रतीक आहे.

बांगला देश मुक्तीच्या वेळी सन १९७१ मध्ये पुन्हा तिसऱ्यांदा भारत-पाकिस्तान युद्धाला तोंड फुटले. ३ डिसेंबर, १९७१ रोजी पंजाब आणि काश्मीरमधील सात मोठ्या शहरांवर व विमानतळांवर तुफानी बॉम्बहल्ले करून पाकिस्तानने भारताविरुद्ध युद्धाचे रणशिंग फुंकले. भारताला एकाच वेळी पूर्व आणि पश्चिम या दोन आघाड्यांवर झुंजणे क्रमप्राप्त होते. ३ डिसेंबरच्या रात्री पूर्व पाकिस्तानात घुसलेल्या भारतीय लष्कराने मुक्तिवाहिनीच्या सहकार्याने आणि भारतीय नौदल व वायुदल यांच्या समयोचित सहकार्याने अवघ्या सात दिवसात १० डिसेंबरपर्यंत ढाक्यापर्यंतचा प्रदेश काबीज केला. भारतीय वायुसेनेने ढाक्यानजीकचे विमानतळ अचूक बॉम्बहल्ले करून उद्ध्वस्त केले, तर भारतीय नौदलाने समुद्रकिनाऱ्यालगतच्या प्रदेशावर आपले नियंत्रण प्रस्थापित केले.

१५ डिसेंबर, १९७१ रोजी पश्चिम आघाडीवर झालेल्या रणगाड्यांच्या भीषण युद्धात भारताने पाकिस्तानचे ४५ रणगाडे निकामी केले. भारतीय नौदलाने पाकिस्तानच्या कराची बंदरावर तोफांची जबरदस्त मारगिरी केली. कराची बंदरातील पेट्रोलच्या साठ्यांनी पेट घेतला आणि त्यानंतर कित्येक दिवस ते बहुमोल पेट्रोल जळत होते.

अमेरिकन राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन उघड उघड पाकिस्तानला अनुकूल होता. सन १९७१ चे भारत-पाक युद्ध पेटण्यापूर्वी निक्सन सरकारने पाकिस्तान सरकारला एक कोटी डॉलर्सची शस्त्रास्त्रे पुरविली होती आणि युद्ध सुरू झाल्यानंतर भारतावर दडपण आणण्याच्या उद्देशाने अमेरिकेने आपले सातवे आरमार बंगालच्या उपसागरानजीक आणले. ९ ऑगस्ट, १९७१ रोजी झालेल्या भारत आणि सोव्हिएट रशिया यांच्यातील मैत्री व सहकार्याच्या करारानुसार अमेरिकन आरमाराला शह देण्यासाठी सोव्हिएट रशियाने आपले आरमार हिंदीमहासागरात आणून उभे केले. जागतिक महासत्ता असलेल्या सोव्हिएट रशियाशी संघर्ष टाळण्यासाठी अमेरिकन आरमाराला निमुटपणे माघारी जावे लागले. समुद्रमार्गे पलायन करण्याचा मार्ग बंद झाल्यामुळे पूर्व पाकिस्तानातील पाकी लष्कराची गोची झाली.

१६ डिसेंबर, १९७१ रोजी ढाक्याच्या रेसकोर्स मैदानावर पाकिस्तानच्या सेनापतीने, जनरल नियाझीने भारतीय सेनापती, जनरल अरोरा यांच्यासमोर संपूर्ण शरणागती पत्करली. १६ डिसेंबरच्या रात्री पंतप्रधान इंदिरा गांधींनी एकतर्फी युद्धबंदीची घोषणा केली. नाइलाजाने याह्या खानांनी युद्धबंदी मान्य केली आणि १७ डिसेंबर, १९७१ रोजी तिसरे भारत-पाक युद्ध थांबले.

सन १९८७ पासून काश्मीरमध्ये सशस्त्र दहशतवादी घुसवून काश्मीरमध्ये अस्थिरता निर्माण करण्याचा, काश्मीर उद्ध्वस्त करण्याचा आटोकाट प्रयत्न पाकिस्तानने नेटाने चालविला आहे. या दहशतवाद्यांना लष्करी प्रशिक्षण देणारी अनेक केंद्रे पाकिस्तानमध्ये कार्यरत आहेत. शीतयुद्धाच्या संदर्भातील अफगाण प्रश्नात सोव्हिएट रशियावर कुरघोडी करण्याच्या उद्देशाने पाकिस्तानच्या माध्यमातून अमेरिका व सौदी अरेबिया अफगाणिस्थानात जो पैसा व अत्याधुनिक पद्धतीची शस्त्रास्त्रे ओतीत होती, त्यातील बराचसा हिस्सा पाकिस्तानात मुरत होता. तीच अत्याधुनिक शस्त्रास्त्रे घेऊन पाकिस्तानचे आतंकवादी काश्मीर खोऱ्यात धुमाकूळ घालीत आहेत; युनोच्या व्यासपीठावर पाकिस्तानच्या ह्या दहशतवादी कुटिल कारवायांना भारताने वारंवार तोंड फोडले आहे.

पाकिस्तानात नवाझ शरीफ यांचे सरकार सत्तारूढ झाल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यात सलोख्याचे संबंध प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने प्रयत्न झाले. पंतप्रधान अटलविहारी वाजपेयी यांच्या पुढाकाराने २० फेब्रुवारी, १९९९ रोजी दिल्ली-लाहोर बससेवा सुरू झाली. स्वतः वाजपेयी नवाझ शरीफ यांच्या भेटीसाठी दिल्ली-लाहोर बसने लाहोरला गेले. वाजपेयी-शरीफ भेटीअंती 'लाहोर जाहीरनामा' प्रसिद्ध करण्यात आला. तथापि भारत-पाक शांततेस विरोध असलेल्या पाकिस्तानी लष्करप्रमुख जनरल परवेज मुशर्रफ यांच्या खोडसाळपणातून काश्मीर प्रश्नावरून कारगीलच्या रणभूमीवर २६ मे, १९९९ ते १७ जुलै, १९९९ या दरम्यान चौथे भारत-पाक युद्ध झाले आणि भारताने पाकिस्तानला झोडपून काढले. कारगील युद्धातील पराभवाचे खापर नवाझ शरीफ यांच्या डोक्यावर फोडून जनरल परवेज मुशर्रफ यांनी लष्करी बळावर १२ ऑक्टोबर, १९९९ रोजी शरीफ सरकार पदच्युत करून पाकिस्तानची सत्तासूत्रे आपल्या हाती घेतली. जुलै २००१ मध्ये काश्मीर प्रश्नाच्या संदर्भात झालेल्या आग्रा शिखर परिषदेत जनरल परवेज मुशर्रफच्या दुराग्रही धोरणामुळे परिषदेचे सूप वाजले.

ऑक्टोबर २००२ मध्ये काश्मीरमध्ये खुल्या वातावरणात घेण्यात आलेल्या सार्वत्रिक निवडणुकात ४५ टक्क्यांहूनही अधिक मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजाविला आणि काश्मीरमध्ये अस्थिरता, अशांतता, दहशत निर्माण करण्याच्या पाकिस्तानच्या खोडसाळ प्रयत्नांना खो घातला. ३ नोव्हेंबर, २००२ रोजी मुफ्ती मोहंमद सईद यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस-पीपल्स डेमॉक्रॅटिक पक्ष यांच्या आघाडीचे सरकार काश्मीरमध्ये सत्तारूढ होऊन पीपल्स डेमॉक्रेटिक पक्षाचे प्रमुख मुफ्ती मोहंमद सईद मुख्यमंत्री बनले. आघाडी सरकार प्रस्थापित करतांना ठरल्याप्रमाणे अडीच वर्षानंतर सन २००५ च्या मध्यापासून काँग्रेसचे गुलाम नबी आझाद काश्मीरचे मुख्यमंत्री बनले.

११ सप्टेंबर, २००१ रोजी 'वर्ल्ड ट्रेड सेंटर'वर झालेल्या दहशतवादी हल्ल्यासाठी पाकिस्तानमधून अर्थसहाय्य झाल्याचे अमेरिकेला समजल्यापासून अमेरिकेच्या प्रेमाला व औदार्याला काही प्रमाणात ओहोटी लागली असून काश्मीर प्रश्नाबाबत सातत्याने पाकिस्तानची बाजू उचलून धरणाऱ्या अमेरिकेने अलीकडील काळात पाकिस्तानबाबत हात आखडता घेण्याची व थोडी कठोर भूमिका स्वीकारली आहे. तरीही अमेरिकेच्या मध्यपूर्वेतील/पश्चिम आशियातील राजकारणात पाकिस्तानला महत्त्वपूर्ण व कळीचे स्थान प्राप्त झालेले आहे, ही गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे. १९४८, १९६५, १९७१ आणि १९९९ या चारही युद्धांमध्ये सातत्याने भारताकडून मार खाऊनही, पाकिस्तानची खोड जिरली नाही. भारताच्या दृष्टीने निकालात निघालेला 'काश्मीरचा प्रश्न' पाकिस्तान १९४८ सालापासून तो आजतागायत उगाळीत, चिघळीत बसला आहे. केवळ पाकिस्तानच्या आडमुठेपणामुळे, प्रादेशिक विस्ताराच्या लालसेमुळे अधूनमधून काश्मीर प्रश्नाचे तुणतुणे वाजत असते. वास्तविक पाहता भारताच्या दृष्टीने काश्मीर प्रश्न सन १९५३ मध्येच निकालात निघाला असून काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे. भारतीय भूप्रदेश आहे; प्रश्न आहे तो पाकव्याप्त काश्मीरचा भूप्रदेश व चीनने बेकायदेशीररीत्या गिळंकृत केलेला काश्मीरचा ३७,५५५ चौरस किलोमीटर भूप्रदेश मुक्त करण्याचा.

### ३. हैदराबाद :

सप्टेंबर १९४८ मध्ये भारत सरकारने जनतेच्या संरक्षणासाठी आणि निझामावरील रझाकारांचा प्रभाव कमी करण्यासाठी हैदराबादमध्ये पोलीस कारवाई केली. १७ सप्टेंबर, १९४८ रोजी रझाकारांच्या प्रभुत्वाखालील निझाम सरकार शरण आले आणि हैदराबाद संस्थानाचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण झाले. हैदराबादने सुरक्षा परिषदेकडे तक्रार करून भारताने आपल्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप केल्याचा आरोप केला. पाकिस्तानने हैदराबादला उत्स्फूर्त जोरदार पाठिंबा दिला. हैदराबाद हे स्वतंत्र राष्ट्र नसून भारतीय संघराज्याचे घटक राज्य असल्यामुळे सुरक्षा परिषदेमध्ये हैदराबाद प्रश्नावर चर्चा होऊ शकत नाही, अशी भूमिका भारताने घेतली. २० सप्टेंबर, १९४९ रोजी सुरक्षा परिषदेमध्ये हैदराबाद प्रश्नावर चर्चा झाली, परंतु कोणताही निर्णय घेतला गेला नाही. केवळ पोकळ चर्चेवर समाधान मानून पाकिस्तानला चरफडत बसावे लागले. यानंतर संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या व्यासपीठावर हैदराबाद प्रश्न उपस्थित करण्याचे पाकिस्तानने केलेले प्रयत्न असफल ठरले.

### ४. इराण :

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात इराणच्या भूमीवर असलेल्या दोस्त राष्ट्रांच्या व रशियाच्या सेना युद्धसमाप्तीनंतर मागे घ्यावयाच्या होत्या. दोस्त राष्ट्रांच्या सेना माघारी गेल्या, तरी करारानुसार ठरल्याप्रमाणे १ मार्च, १९४६ रोजी रशियाने आपली सेना माघारी घेतली नाही. एवढेच नव्हे तर रशियन सेना इराणच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करू लागली. इराणमधील अझरबैजान या ठिकाणी असलेल्या बंडखोर सरकारला रशियन सेना मदत करतात असा आरोप करून रशियन सेनेचा प्रश्न इराणने सुरक्षा परिषदेपुढे दाखल केला. मे १९४६ मध्ये सोव्हिएट रशियाने आपली सेना मागे घेतल्यामुळे प्रस्तुत प्रश्न निकालात निघाला.

**५. इंडोनेशिया :**

दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस जपानने इंडोनेशियातून माघार घेतल्यानंतर इंडोनेशियातील राष्ट्रवादी नेत्यांनी इंडोनेशियाचे स्वातंत्र्य जाहीर करून गणराज्याची स्थापना केली. इंडोनेशिया पूर्वी डचांची वसाहत असल्यामुळे हॉलंडने लष्करी कारवाई करून इंडोनेशियात पुन्हा आपले सरकार स्थापन करण्याचा प्रयत्न केला. मार्च १९४७ मध्ये हॉलंड आणि इंडोनेशिया यांच्यात करार होऊन इंडोनेशियाच्या गणराज्यास मान्यता देण्याचे हॉलंडने मान्य केले. परंतु कराराची अंमलबजावणी होत असताना पुन्हा संघर्ष उद्भवून हॉलंडने इंडोनेशियात पुन्हा आपली सत्ता प्रस्थापित करण्याच्या हेतूने लष्करी कारवाई सुरू केली. इंडोनेशियाने हॉलंडच्या लष्करी आक्रमणाविरुद्ध सुरक्षा परिषदेकडे तक्रार केली. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांनी इंडोनेशियाच्या प्रश्नाकडे सुरक्षा परिषदेचे लक्ष वेधले. हॉलंडने हा आपला अंतर्गत मामला आहे, या मुद्यावर सुरक्षा परिषदेच्या कारवाईस आक्षेप घेतला. तथापि हॉलंडच्या आक्षेपाची दखल न घेता इंडोनेशियाचा प्रश्न उभय पक्षांनी शांततापूर्ण वाटाघाटींच्या मार्गाने सोडवावा अशी सूचना केली आणि शस्त्रसंधी घडून आली. इंडोनेशियात कायम शांतता प्रस्थापित करण्यासाठी सुरक्षा परिषदेने नियुक्त केलेल्या मध्यस्थ मंडळात इंडोनेशियाच्या वतीने ऑस्ट्रेलियाचा, हॉलंडच्या वतीने बेल्जियमचा आणि त्रयस्थ या नात्याने अमेरिकेचा अशा तीन प्रतिनिधींचा समावेश करण्यात आला. मध्यस्थ मंडळाच्या प्रयत्नाने जानेवारी १९४८ मध्ये इंडोनेशिया व हॉलंड यांनी १८ कलमी शांतता योजनेचा स्वीकार केला. तथापि हीही योजना फिसकटून पुन्हा संघर्षास तोंड फुटले. सुरक्षा परिषदेने त्वरित हालचाली करून शस्त्रसंधीचा आदेश दिया आणि मध्यस्थ मंडळाचे संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या नियंत्रण मंडळात रूपांतर करण्यात आले. इंडोनेशियाच्या गणराज्याला मान्यता देण्याचा हॉलंडला आदेश देण्यात आला. अखेरीस हॉलंडने इंडोनेशियाच्या सार्वभौमत्वास मान्यता दिल्यामुळे इंडोनेशियाच्या स्वातंत्र्याचा प्रश्न शांततामय मार्गाने सोडविण्यात संयुक्त राष्ट्रसंघटनेला (युनो) यश प्राप्त झाले.

**६. सीरिया–लेबॅनॉन :**

फेब्रुवारी १९४६ मध्ये सीरिया आणि लेबनॉन या दोन राष्ट्रांनी सुरक्षा परिषदेकडे तक्रार करून आपल्या राष्ट्रांमध्ये असलेल्या ब्रिटिश आणि फ्रेंच फौजांच्या अस्तित्वामुळे आपल्या सार्वभौमत्वास धोका निर्माण झाला आहे असे कळविले. सुरक्षा परिषदेमधील चर्चेच्या प्रसंगी अमेरिकेने इंग्लंडची बाजू घेऊन असा ठराव मांडला की, शक्यतोवर लवकरात लवकर लेबेनॉनमधून ब्रिटिश फौजा मागे घेतल्या जातील. अमेरिकेच्या ठरावावर व्हेटोचा वापर करून सीरिया व लेबॅनॉनमधून ब्रिटिश व फ्रेंच फौजा त्वरित मागे घेण्यात याव्यात असा ठराव रशियाने मांडला. दोन्ही ठराव सुरक्षा परिषदेमध्ये संमत होऊ शकले नाहीत. तथापि सुरक्षा परिषदेतील चर्चेचा परिणाम होऊन अवघ्या दोन महिन्यांच्या अवधीत फ्रान्सने सीरियातून आणि इंग्लंडने लेबॅनॉनमधून आपल्या फौजा माघारी घेतल्यामुळे वाद मिटला.

**७. झेकोस्लोव्हाकिया :**

सन १९४८ मध्ये झेकोस्लोव्हाकियात कम्युनिस्ट क्रांती घडून आली. या कम्युनिस्ट क्रांतीमागे रशियाचा हस्तक्षेप आहे अशी तक्रार झेकोस्लोव्हाकियाच्या पदच्युत सरकारने सुरक्षा परिषदेकडे केली. सोव्हिएट

रशियाने आरोपाचा इन्कार करून झेकोस्लोव्हाकियातील प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करण्यासाठी चौकशी मंडळ नेमण्याचा पाश्चात्य राष्ट्रांचा ठराव व्हेटोचा वापर करून फेटाळून लावला. सोव्हिएट रशियाच्या आशीर्वादाने झेकोस्लोव्हाकियात सत्तारूढ झालेल्या कम्युनिस्ट सरकारच्या अंतर्गत कारभारात पाश्चात्त्य राष्ट्रांना हस्तक्षेप करता येऊ नये अशी रशियाची ठाम व सतर्क भूमिका होती. सन १९६८ मध्ये झेकोस्लोव्हाकियातील उजव्या विचारसरणीच्या विद्यमान कम्युनिस्ट सरकारने झेकोस्लोव्हाकियात उदारमतवादी सुधारणा घडवून आणल्या. प्रस्तुत सुधारणा कम्युनिस्ट तत्त्वप्रणालीशी विसंगत आहेत अशी भूमिका घेऊन वॉर्सा करारात सहभागी असलेल्या रशिया, पोलंड, हंगेरी, पूर्व जर्मनी आणि बल्गेरिया या राष्ट्रांनी झेकोस्लोव्हाकियात आपल्या फौजा घुसवून लष्करी हस्तक्षेप केला. २२ ऑगस्ट, १९६८ रोजी रशियाच्या झेकोस्लोव्हाकियातील लष्करी हस्तक्षेपाचा प्रश्न सुरक्षा परिषदेपुढे उपस्थित करण्यात आला. झेकोस्लोव्हाकियातील अंतर्गत हस्तक्षेपाबाबत सुरक्षा परिषदेमध्ये चर्चा होऊ न देण्याचा रशियाचा प्रयत्न फसला. तथापि सोव्हिएट रशियाची निर्भर्त्सना करून झेकोस्लोव्हाकियातून कम्युनिस्ट फौजा माघारी घ्यावयास सांगणारा इंग्लंड, अमेरिका, फ्रान्ससहित अन्य सात पाश्चात्त्य राष्ट्रांनी मांडलेला ठराव आपल्या व्हेटोचा वापर करून रशियाने धुडकावून लावला. युनो हतबल झाली. दरम्यान रशिया व झेकोस्लोव्हाकिया यांच्यामध्ये करार होऊन पश्चिम जर्मनी व ऑस्ट्रिया या राष्ट्रांशी संलग्न असलेला झेक सीमाप्रदेश वगळता उर्वरित झेकोस्लोव्हाकियातून रशियाने कम्युनिस्ट फौजा काढून घेतल्या. झेक जनतेचे संरक्षण करण्यात युनो असमर्थ ठरली. प्रस्तुत घटनेचा अर्थ इतकाच की, छोट्या राष्ट्रांवर कारवाई करण्यात संयुक्त राष्ट्रसंघटना यशस्वी होऊ शकते, परंतु बड्या राष्ट्रांवर तिची मात्रा चालत नाही.

**बर्लिनची कोंडी :**

दुसऱ्या महायुद्धानंतर जर्मनीचे विभाजन होऊन पूर्व जर्मनीवर सोव्हिएट रशियाचे तर पश्चिम जर्मनीवर अमेरिका, इंग्लंड व फ्रान्सचे नियंत्रण प्रस्थापित झाले. त्याचप्रमाणे बर्लिन शहराचेही विभाजन होऊन पूर्व बर्लिनवर रशियाचे तर पश्चिम बर्लिनवर अमेरिका, इंग्लंड व फ्रान्सचे नियंत्रण प्रस्थापित झाले. बर्लिन शहर पूर्व जर्मनीत असल्यामुळे पाश्चात्यांच्या नियंत्रणाखालील बर्लिन शहराच्या भागात जाण्यासाठी रशियाच्या नियंत्रणाखालील पूर्व जर्मनीच्या खुष्कीच्या मार्गाने जावे लागे. १९४८ मध्ये चलनाच्या प्रश्नावरून वाद निर्माण झाल्यामुळे रशियाने पाश्चात्य राष्ट्रांना त्यांच्या नियंत्रणाखालील बर्लिन शहराच्या विभागात जाण्यासाठी स्वतःच्या नियंत्रणाखालील पूर्व जर्मनीचा खुष्कीचा मार्ग वापरण्यावर बंदी घातली. परिणामी आपल्या नियंत्रणाखालील बर्लिन शहराला आवश्यक वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी पाश्चात्त्य राष्ट्रांना मोठ्या प्रमाणावर हवाई मार्गाचा वापर करावा लागला. बर्लिनच्या या कोंडीमुळे जागतिक शांततेस धोका निर्माण होऊ शकतो, या भूमिकेतून पाश्चात्त्य राष्ट्रांनी बर्लिन प्रश्नाकडे सुरक्षा परिषदेचे लक्ष वेधले. बड्या सत्तांमधील या संघर्षात समाधानकारक तोडगा सुचविण्याबाबत सुरक्षा परिषदेला अपयश आले. कालांतराने रशियाने स्वतःहून ही कोंडी उठविली आणि पाश्चात्त्य राष्ट्रांबरोबर सर्व संबंधित प्रश्नांची सामोपचाराच्या मार्गाने चर्चा करण्याचे ठरविल्यामुळे प्रस्तुत वाद संपुष्टात आला.

**९. स्पेन :**

दुसऱ्या महायुद्धात स्पेनने प्रत्यक्ष युद्धात भाग घेतला नसला, तरीही जर्मनी-इटली या अक्षगटातील राष्ट्रांना मदत केली होती. सन १९४५ च्या सॅन फ्रेन्सिस्को परिषदेमध्ये स्पेनला संयुक्त राष्ट्रसंघटनेचे सभासदत्व देऊ नये असा ठराव दोस्त राष्ट्रांनी संमत केला आणि पॉटस्डॅम परिषदेने प्रस्तुत ठरावास मंजुरी दिली. संयुक्त राष्ट्रसंघटना स्थापन झाल्यानंतर स्पेनने सभासदत्वासाठी केलेला अर्ज नामंजूर करण्यात आला. एप्रिल १९४६ मध्ये स्पेनमधील जनरल फ्रँकोची हुकूमशाही राजवट आंतरराष्ट्रीय शांततेस धोका निर्माण करणारी आहे अशी तक्रार पाश्चात्त्य राष्ट्रांनी सुरक्षा परिषदेकडे करून जनरल फ्रँकोची हुकूमशाही राजवट नष्ट करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघटनेने प्रयत्न करावेत असे सुचविले. शीतयुद्धाचे गार झोंबरे वारे वाहू लागताच पाश्चात्त्य राष्ट्रांची स्पेनबाबतची भूमिका बदलली. फ्रँको सरकारचा सोव्हिएट रशियाला असलेला कडवा विरोध लक्षात घेऊन पाश्चात्त्य राष्ट्रांनी स्पेनला उत्तेजन देण्याचे धोरण अंगीकारले. सन १९४८ मध्ये अमेरिकेने मार्शल योजनेच्या अंतर्गत स्पेनला मदत देण्याचे धोरण घोषित केले. स्पेनच्या अनुमतीने सन १९५१-५३ मध्ये स्पेनमध्ये अमेरिकन लष्करी तळ स्थापन करण्यात आले. आंतरराष्ट्रीय राजकारणातील बदललेली परिस्थिती लक्षात घेऊन स्पेनला असलेला पाश्चात्य राष्ट्रांचा विरोध कालांतराने नाहीसा झाला आणि १४ डिसेंबर, १९५५ रोजी स्पेनला संयुक्त राष्ट्रसंघटनेचे सभासदत्व प्राप्त झाले.

**१०. कोरिया :**

सन १९१० पासून कोरिया जपानच्या नियंत्रणाखाली होता. दुसऱ्या महायुद्धात जपानचा पराभव झाल्यानंतर कोरियाची ३८ अक्षांशावर फाळणी झाली. तात्पुरत्या व्यवस्थेनुसार उत्तर कोरियात रशियन सेना तर दक्षिण कोरियात अमेरिकन सेना होती. कालांतराने कोरियाचे एकीकरण करून कोरियात सार्वभौम सरकार स्थापन करण्याचे युनोने अनेकदा प्रयत्न केले, परंतु त्या प्रयत्नांना यश येऊ शकले नाही. जुलै १९४९ मध्ये कोरियातून रशियन आणि अमेरिकन सेना मागे घेण्यात आल्या. संयुक्त राष्ट्रसंघटनेने स्थापन केलेल्या चौकशी मंडळाच्या शिफारशीनुसार दक्षिण कोरियात स्थापन करण्यात आलेल्या गणराज्याला ३१ राष्ट्रांनी मान्यता दिली.

२५ जून, १९५० रोजी रशियन तज्ज्ञ लष्करी अधिकाऱ्यांनी प्रशिक्षण दिलेल्या उत्तर कोरियाच्या सुसज्ज सैन्याने ३८ अक्षांश रेषा ओलांडून दक्षिण कोरियाच्या गणराज्यावर एकाएकी आक्रमण केले. अमेरिकेने कोरियाचा प्रश्न सुरक्षा परिषदेमध्ये उपस्थित केला. सुरक्षा परिषदेमध्ये उत्तर कोरियाच्या आक्रमणाची गंभीर दखल घेण्यात आली आणि शस्त्रसंधी करून उत्तर कोरियाने ३८ अक्षांशापलीकडे आपल्या सेना माघारी न्याव्यात असा आदेश देण्यात आला. या आदेशांची अंमलबजावणी योग्य रीतीने होते की नाही हे पाहण्यासाठी एक मंडळ नेमण्यात आले. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सर्व सभासद राष्ट्रांना उत्तर कोरियास कोणत्याही प्रकारे मदत न करण्याचे आणि युनोने नियुक्त केलेल्या मंडळास योग्य सहकार्य देण्याचे आवाहन करण्यात आले.

कोरियाच्या प्रश्नामुळे संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सामूहिक सुरक्षितता यंत्रणेस खऱ्या अर्थाने आव्हान मिळाले. सन १९४९ च्या अखेरीस चीनमध्ये कम्युनिस्ट क्रांती घडून आल्यानंतर कम्युनिस्ट चीनला संयुक्त राष्ट्रसंघटनेचे सभासदत्व आणि सुरक्षा परिषदेमध्ये कायम सभासदाची जागा मिळावी अशी रशियाची आग्रही मागणी होती. पाश्चात्त्य राष्ट्रांनी रशियाची मागणी फेटाळून लावून राष्ट्रवादी चीनलाच (फोर्मोसा) सभासदत्व दिल्यामुळे सात्त्विक संतापाने रशियाने सुरक्षा परिषदेवर बहिष्कार टाकला होता. त्यामुळेच सुरक्षा परिषदेत कोरियाचा प्रश्न चर्चेला आला असताना व प्रस्तुत प्रश्नाच्या निराकरणार्थ लष्करी कारवाई करताना रशियाच्या अनुपस्थितीमुळे रशिया आपल्या व्हेटोचा वापर करू शकला नाही आणि लष्करी कारवाई करणे शक्य झाले. २५ जून १९५० रोजी संयुक्त राष्ट्रसंघटनेने संमत केलेल्या ठरावास धूप न घालता उत्तर कोरियाने आक्रमण अधिक प्रखर केले. २५ जून, ते ७ जुलै या काळात सुरक्षा परिषदेने तीन ठराव संमत करून लष्करी कारवाईची योजना आखली. ७ जुलै, १९५० रोजी संमत झालेल्या तिसऱ्या ठरावानुसार संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या ध्वजाखाली १५ सभासद राष्ट्रांची ३ लाख ५० हजार सेना अमेरिकन जनरल मॅकार्थरच्या नेतृत्वाखाली कोरियाच्या भूमीवर उतरली आणि या संयुक्त सैन्याने ऑक्टोबर १९५० मध्ये उत्तर कोरियाचे आक्रमण मोडून काढण्यात संपूर्ण यश संपादन केले.

दक्षिण कोरिया मुक्त करून उत्तर कोरियाच्या सैन्याचा पाठलाग करीत मॅकऑर्थरच्या नेतृत्वाखालील संयुक्त सेना उत्तर कोरियात शिरल्यानंतर नवा लष्करी पेचप्रसंग निर्माण झाला. उत्तर कोरियाच्या मदतीसाठी चीन आणि सोव्हिएट रशियाने आपले स्वयंसेवक पाठविल्यामुळे संयुक्त सेना अडचणीत आल्या. अखेरीस रशियाच्या सूचनेनुसार पेच सोडविण्यासाठी कोरियातील कासाँग या ठिकाणी ८ जुलै, १९५१ रोजी बैठक घेण्यात आली. या बैठकीत युद्धकैद्यांचा प्रश्न सोडविण्यावरून मतभेद झाल्यामुळे बोलणी फिसकटली. सरतेशेवटी २७ जुलै, १९५३ रोजी शस्त्रसंधी करार होऊन ३८ अक्षांशावर उत्तर आणि दक्षिण कोरियांच्या सीमा निश्चित करण्यात आल्या.

**११. सुवेझ**

सुवेझ कालव्याच्या बांधणीमध्ये ब्रिटिशांचे व फ्रेंचांचे हितसंबंध गुंतलेले होते. त्याचप्रमाणे सुवेझ कॅनॉल कंपनीमध्ये त्यांचे मोठ्या प्रमाणावर भागभांडवल गुंतले होते. सन १९३६ मध्ये इंग्लंड आणि इजिप्त यांच्यात झालेल्या करारानुसार सुवेझ कालव्याच्या प्रदेशात ब्रिटिश सेना ठेवण्यास इजिप्तने मंजुरी दिली होती. तथापि ब्रिटिश सेनेच्या अस्तित्वामुळे इजिप्तच्या शांततेस धोका निर्माण झाला आहे असा आरोप करून सन १९४७ मध्ये इजिप्तने ब्रिटिश सेनेच्या इजिप्तमधील अस्तित्वाबाबत सुरक्षा परिषदेकडे हरकत दाखल केली. प्रस्तुत प्रश्नाबाबत सुरक्षा परिषदेमध्ये आवश्यक बहुमत न मिळाल्यामुळे काहीही निर्णय होऊ शकला नाही, परंतु तेव्हापासून इंग्लंड आणि इजिप्त यांच्या संबंधात तणाव निर्माण झाला. सन १९५५ मध्ये इजिप्तमध्ये क्रांती होऊन अधिकारारूढ झालेल्या नासर सरकारने २६ जुलै, १९५६ रोजी सुवेझ कालव्याचे राष्ट्रीयीकरण करण्याचा ऐतिहासिक निर्णय घोषित केला. सुवेझ कालव्याच्या राष्ट्रीयीकरणामुळे इंग्लंड आणि फ्रान्स यांच्या आर्थिक हितसंबंधांना धोका निर्माण झाला. या संदर्भात इलंड आणि फ्रान्स यांच्याबरोबरची इजिप्तची बोलणी फिसकटल्यामुळे आपले आर्थिक हितसंबंध जपण्यासाठी इंग्लंड आणि फ्रान्सने सुवेझ कालव्याचा प्रश्न सुरक्षा

परिषदेपुढे दाखल केला. दरम्यानच्या काळात इस्त्राएलने इजिप्तवर हल्ला चढविला. याचा फायदा उठवून इस्त्राएलच्या पाठोपाठ इंग्लंड व फ्रान्सनेही इजिप्तवर हल्ला चढविला. या आणीबाणीच्या प्रसंगी महासभेची तातडीची बैठक बोलावण्यात आली आणि महासभेने तात्काळ युद्धबंदी करण्याचा आदेश दिला. जागतिक लोकमत इंग्लंड आणि फ्रान्सच्या विरोधात गेले. सुरक्षा परिषदेत सुवेझ प्रश्नाबाबत अमेरिकेनेही त्यांना साथ दिली नाही. परिणामी संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या आदेशानुसार ब्रिटिश आणि फ्रेंच फौजांनी माघार घेतली. युद्धबंदीची योग्य प्रकारे अंमलबजावणी व्हावी, म्हणून संयुक्त राष्ट्रसंघटनेने भारतासह दहा देशांच्या सेनांची आणीबाणीची फौज तयार केली. या संयुक्त फौजेने इजिप्तमध्ये शांतता प्रस्थापित करण्याचे अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य उत्तम रीतीने पार पाडले. जर यावेळी इंग्लंड आणि फ्रान्सने माघार घेतली नसती, तर सोव्हिएट रशियाचा हस्तक्षेप निश्चित होता. तसे झाले असते, तर युद्धक्षेत्र अधिक व्यापक झाले असते.

**१२. सायप्रस :**

पूर्व भूमध्यसमुद्रातील सायप्रस या बेटावरील ६ लाख लोकसंख्येपैकी ८०% लोक ग्रीक आणि १७-१८% लोक तुर्की होते. धर्मभेदामुळे आणि वंशभेदामुळे सायप्रस बेटातील ग्रीक आणि तुर्की जनतेमध्ये सामंजस्य कधीच नांदले नाही. ८०% ग्रीक जनतेने सायप्रसचे ग्रीसबरोबर विलीनीकरण करण्यात यावे, अशी जोरदार मागणी करताच १७-१८% तुर्की जनतेने त्या मागणीला कडाडून विरोध केला. परिणामी १९६५ मध्ये सायप्रसमध्ये ग्रीक आणि तुर्की जनतेमध्ये भीषण दंगली उसळल्या. सायप्रस या चिमुकल्या बेटाचे अत्यंत मोक्याचे स्थान लक्षात घेऊन युरोपीय बड्या सत्तांनी सायप्रसमध्ये अप्रत्यक्ष दडपणे आणावयास सुरुवात केली. त्यावेळी महासभेने ठराव करून अन्य राष्ट्रांनी सायप्रसच्या प्रश्नात हस्तक्षेप करू नये अशी सूचना दिली. सायप्रसचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने सन १९६६ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघटनेने मध्यस्थी करण्याचा प्रयत्न सुरू केला. संयुक्त राष्ट्रसंघटना, अमेरिका आणि नाटो गटातील एक राष्ट्र असे तीन प्रतिनिधींचे मध्यस्थ मंडळ स्थापन करण्यात आले.

सायप्रसचा प्रश्न सोडविण्यात मध्यस्थ मंडळाला तात्पुरते यश मिळाले. सायप्रसमधून ग्रीस आणि तुर्कस्थान यांनी आपल्या सेना काढून घ्याव्यात, सायप्रसमध्ये अंतर्गत शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी केवळ ५००० पोलिसांचे दल ठेवण्यात येऊन उर्वरित लष्कराचे निर्लष्करीकरण करण्यात यावे, सायप्रसच्या स्वातंत्र्याची आणि प्रादेशिक एकात्मतेची हमी संयुक्त राष्ट्रसंघटनेने द्यावी, सायप्रसमधील ग्रीक व तुर्की जनतेने शांततामय मार्गांनी आपापसात विचारविनिमय करून सायप्रसचे भवितव्य निश्चित करावे, आदी सूचना मध्यस्थ मंडळाने केल्या. मध्यस्थ मंडळाच्या सूचना मान्य झाल्यामुळे सायप्रसमधील संघर्ष तात्पुरता मिटला. ग्रीक आणि तुर्की जनतेमधील असंतोष धुमसत राहिला आणि सन १९७४-७५ मध्ये त्याचा पुन्हा स्फोट झाला. ग्रीसधार्जिण्या लष्करी गटांनी उठाव करून लोकमताच्या निर्विवाद पाठिंब्यावर बहुमताने अध्यक्ष म्हणून निवडून आलेल्या आर्चबिशप मॅकॅरिऑस यांना पदच्युत केले. कालांतराने जागतिक दडपणामुळे आर्चबिशप मॅकॅरिऑस पुन्हा अध्यक्षपदावर सत्तारूढ झाले, तथापि सायप्रसमधील ग्रीक-तुर्की जनतेतील संघर्ष अद्यापही शमला नाही.

## १३. पॅलेस्टाईन :

मध्यपूर्वेतील पॅलेस्टाईन हा देश विश्वस्त प्रदेश या नात्याने इंग्लंडच्या नियंत्रणाखाली होता. पॅलेस्टाईनमधील जेरुसलेम हे शहर ख्रिश्चन, ज्यू आणि अरब या तिनी जमातींचे पवित्र स्थान असल्यामुळे जेरुसलेम शहराला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. ज्यू आणि अरब या भिन्नधर्मीय जमातींमधील सातत्याने चालू असलेल्या संघर्षामुळे दुसऱ्या महायुद्धानंतर पॅलेस्टाईन या देशाचे भवितव्य हा वादग्रस्त व गुंतागुंतीचा प्रश्न बनला होता. २८ एप्रिल १९४७ रोजी महासभेमध्ये पॅलेस्टाईनच्या प्रश्नावर गंभीर व सविस्तर चर्चा झाल्यानंतर पॅलेस्टाईन प्रश्नाचा सांगोपांग अभ्यास करण्यासाठी महासभेने एका खास समितीची नियुक्ती केली. या समितीने ३१ ऑगस्ट १९४७ रोजी पॅलेस्टाईनबाबतचा आपला अहवाल महासभेला सादर केला. या समितीच्या शिफारशींनुसार पॅलेस्टाईनची फाळणी करून अरब आणि ज्यू यांची दोन राज्ये स्थापन करून आर्थिक व्यवहारांच्या दृष्टीने त्यांचे संघराज्य बनवावे अशी योजना सुचविली होती. जेरुसलेम या पवित्र शहराचे नियंत्रण आंतरराष्ट्रीय विश्वस्त मंडळाकडे सोपविण्यात यावे, कारण हे शहर तीन धर्मीयांचे पवित्र श्रद्धास्थान आहे आणि या शहराबाबतची जबाबदारी खुद्द संयुक्त राष्ट्रसंघटनेने उचलावी अशी समितीची शिफारस होती. पॅलेस्टाईनच्या फाळणीची योजना नोव्हेंबर १९४७ मध्ये महासभेने स्वीकारली. विश्वस्त राष्ट्र या नात्याने इंग्लंडची पॅलेस्टाईनबाबतची जबाबदारी १४ मे, १९४८ रोजी संपणार होती आणि पॅलेस्टाईनमधून ब्रिटिश सेना माघारी घेण्यात येणार होत्या. पॅलेस्टाईनचा प्रश्न शांततापूर्ण मार्गाने हाताळण्यासाठी महासभेने संयुक्त राष्ट्रसंघटनेचा मध्यस्थ म्हणून काऊंट बर्नाडोट याची नियुक्ती केली.

१५ मे, १९४८ रोजी 'इस्त्राएल' या ज्यूंच्या स्वतंत्र सार्वभौम राष्ट्राची स्थापना झाली. अरबांनी इस्त्राएल या राष्ट्राला मान्यता न देता इस्त्राएलवर लष्करी आक्रमण केले. ज्यू आणि अरब या दोन जमातींमध्ये तात्पुरती शस्त्रसंधी घडवून आणण्यात सुरक्षा परिषदेला यश मिळाले, परंतु ज्यू-अरब यांच्यातील संघर्ष सुरूच राहिला. परिणामी १९ ऑगस्ट, १९४८ रोजी सुरक्षा परिषदेची तातडीची बैठक बोलाविण्यात येऊन पुन्हा शस्त्रसंधी झाली. १७ सप्टेंबरला संयुक्त राष्ट्रसंघटनेचा पॅलेस्टाईनमधील मध्यस्थ काऊंट बर्नाडोट याचा खून झाल्यामुळे त्या जागी राल्फ बूंच याची मध्यस्थ म्हणून नियुक्ती झाली. जुलै १९४९ मध्ये पॅलेस्टाईन प्रदेशात तात्पुरती शांतता प्रस्थापित करण्यात संयुक्त राष्ट्रसंघटनेला यश मिळाले, परंतु इस्त्राएल आणि अन्य अरब राष्ट्रांच्या सीमा निश्चित झाल्या नाहीत अथवा उभय पक्षांमध्ये शांतता करारही झाले नाहीत. अरब आणि ज्यू यांच्यात वाद निर्माण झाल्यास त्यांचा निवाडा करण्यासाठी एका शस्त्रसंधी मंडळाची नेमणूक करण्यात आली. जेरुसलेम शहर आंतरराष्ट्रीय नियंत्रणाखाली ठेवण्याची सूचना मान्य झाली नाही. परिणामी जेरुसलेम शहराचा नवीन भाग इस्त्राएलच्या ताब्यात राहिला आणि जुने जेरुसलेम शहर जॉर्डनकडे राहिले.

नवनिर्मित इस्त्राएल हे राष्ट्र केवळ ८ हजार चौरस मैलांचे असून त्याच्या निर्मितीनंतर त्या भागातून जवळपास आठ लाख अरब निर्वासित होऊन निरनिराळ्या अरब राष्ट्रांत गेले, तर जगभर विखुरलेले ज्यू इस्त्राएलमध्ये येऊन स्थायिक झाले.

२३ मे, १९६७ रोजी इजिप्तने अकाबाची सामुद्रधुनी बंद करून इस्त्राएलचा समुद्री मार्ग बंद केला. प्रत्युत्तर म्हणून ५ जूनला इस्त्राएलने गाझा पट्टी, सिनाई वाळवंट, जॉर्डन आणि सीरिया यांच्यावर अकस्मात आक्रमण केले. ९ जूनला सुरक्षा परिषदेने मंजूर केलेला शस्त्रसंधीचा ठराव इस्त्राएलने आणि अरब राष्ट्रांनी स्वीकारला. सन १९६७ च्या या युद्धामध्ये अरब राष्ट्रांचा पराभव होऊन अरबांचा बराचसा महत्त्वपूर्ण प्रदेश इस्त्राएलने व्यापला. पॅलेस्टाईन प्रश्नावरून आतापावेतो अरब राष्ट्रांचा इस्त्राएलबरोबर चार वेळा उघड उघड संघर्ष झाला, परंतु पॅलेस्टाईन प्रश्नात तोड शोधून काढण्यात संयुक्त राष्ट्रसंघटनेला अद्यापही यश मिळाले नाही.

**कांगो :**

आकारमानाने भारताच्या पाऊणपट असलेल्या कांगोमध्ये बेल्जियनांची वसाहत होती. १ जुलै, १९६० रोजी या वसाहतीस बेल्जियन सरकारने स्वातंत्र्य बहाल केले. कांगो हा देश अनेक प्रकारच्या वनस्पतींनी व तांबे, मँगनीज, सोने इत्यादी धातूंनी समृद्ध आहे. हिऱ्यांच्या खाणींमुळे व युरेनियम, कोबाल्ट यांच्या साठ्यांमुळे कांगोला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. आपल्या ताब्यात असेपर्यंत बेल्जियनांनी या प्रदेशातून खोऱ्याने पैसा ओढला, पण तेथील लोकांसाठी काहीही केले नाही. त्यांनी कांगोला स्वातंत्र्य दिले, त्यावेळी एवढ्या मोठ्या वसाहतीमध्ये मूठभर एतद्देशीय काय ते सुशिक्षित होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अल्पावधीतच अध्यक्ष कासावुबू आणि पंतप्रधान पॅट्रिस लुमुंबा यांच्यामध्ये संघर्ष निर्माण झाला. कासावुबूने लुमुंबास पदच्युत करून सरकारचे सर्व अधिकार कर्नल मोबुतू या सेनाधिकाऱ्यावर सोपविले. लुमुंबाने संयुक्त राष्ट्रसंघटनेकडे धाव घेतली. कासावूबूने आपला प्रतिनिधी संयुक्त राष्ट्रसंघटनेकडे पाठवला. कासावुबूच्या प्रतिनिधीस मान्यता मिळून शांतता प्रस्थापित करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या फौजा कांगोमध्ये आल्या. सोव्हिएट रशिया, भारत, घाना, माली व इतर काही आफ्रिकन राष्ट्र ही लुमुंबाच्या बाजूची होती, तर पाश्चिमात्य राष्ट्रांचा कल कासावुबूकडे होता. या यादवी युद्धामध्ये लुमुंबा फेब्रुवारी १९६१ मध्ये शत्रूच्या हाती पडला व त्याचा त्यांनी क्रूरपणे वध केला. लुमुंबाचा काटा दूर झाला, तरी त्यामुळे अध्यक्ष कासावुबूचा प्रश्न पूर्णपणे सुटला नाही. कांगोमधील खनिज संपत्तीने सर्वात समृद्ध प्रदेश असलेल्या कटांगामध्ये कटांगाचा अध्यक्ष मोसे शोंबे याने कांगोमधून फुटून निघण्यासाठी उग्र चळवळ सुरू केली होती. शोंबेच्या फुटीर चळवळीस कटांगामध्ये हितसंबंध गुंतलेल्या पाश्चिमात्य भांडवलदारांचा आणि बेल्जियन सेनाधिकाऱ्यांचा पाठिंबा होता. कटांगाला पाश्चात्त्य राष्ट्रांकडून अद्ययावत शस्त्रास्त्रेही मिळाली होती. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या वतीने अपुऱ्या शस्त्रांनी लढण्याची जबाबदारी मुख्यतः भारतावर पडली व ही जबाबदारी भारतीय सेनेने उत्तम प्रकारे पार पाडली. शोंबेने कधी प्रत्यक्ष युद्ध करून, तर कधी राजकीय डावपेच लढवून असा बराच काळ लढा चालवला. तथापि १९६२ च्या शेवटी त्याला आपले भवितव्य कळून चुकले. त्याने संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या मार्फत कांगोच्या अध्यक्षाशी सामोपचाराची बोलणी सुरू केली. कांगो व तत्सम देशांचे प्रश्न केवळ युरोपीय साम्राज्यवादाच्या पीछेहाटीने सुटले नाहीत. किंबहुना साम्राज्यवाद संपल्यानंतरच त्यांच्या खऱ्या प्रश्नांना तोंड फुटले. सन १९९७ मध्येही कांगोला ७ महिने चाललेल्या यादवी युद्धास तोंड द्यावे लागले. सन १९६५ पासून १९९७ पर्यंत अध्यक्षपदावर असलेल्या जनरल मोबुद्ध सेसे सेको याला मे १९९७

मध्ये सत्तात्याग करावा लागला, बंडखोरांचा नेता लॉरेंस्ट काबिला ह्याने सर्व सत्ता आपल्या हाती घेऊन स्वतःला अध्यक्ष म्हणून घोषित केले.

### II) अराजकीय क्षेत्रातील कार्य

संयुक्त राष्ट्रसंघाने राजकीय क्षेत्राबरोबरच अराजकीय क्षेत्रातही महत्त्वपूर्ण कार्य केले. त्याचाच भाग म्हणून संयुक्त राष्ट्रसंघाने सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात भरीव अशी कामगिरी केली. प्रत्येक देशातील नागरिकांना समान मुलभूत हक्क मिळावेत म्हणून 'मानवी हक्क आयोगाची' स्थापना करण्यात आली. संयुक्त राष्ट्र संघातील महासभा, आर्थिक व सामाजिक मंडळ, विश्वस्त समितीमध्ये मानवी हक्क व अधिकारासंबंधी चर्चा घडवून आणली. इ.स. १९५० पासून १० डिसेंबर हा दिवस 'मानवाधिकार दिन' म्हणून जगभर साजरा केला जावू लागला. दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर पुनर्वसन, युद्धोत्तर पुनर्रचना करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने विविध कार्यक्रम राबविले.

अविकसित राष्ट्रांमधील निरक्षरता, दारिद्र्य, बेरोजगारी यासारख्या समस्या मिटविण्यासाठी, त्यावर आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चा घडवून आणण्यासाठी विविध अभ्यास गट निर्माण करून या समस्यांच्या निराकरणासाठी उपाययोजना केल्या. लोकसंख्यावाढ, आर्थिक पुनर्रचना, प्रदेशनिहाय समस्या याबद्दल आढावा घेवून त्याची आकडेवारी संकलित करून ती प्रसिध्द करण्यात आली. आर्थिक समस्येच्या निराकरणासाठी आंतरराष्ट्रीय बँकेची व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची स्थापना करून अविकसित राष्ट्रांना मदत देण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता, मुक्त वातावरणात सार्वत्रिक निवडणूक,अवर्षण, दारिद्र्य, कुपोषण इ. क्षेत्रात संयुक्त राष्ट्रसंघाने उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे.

## १.३ संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या यशापयाचे मूल्यमापन

### १. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्य :

संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या स्थापनेपासून आजतागायत संयुक्त राष्ट्रसंघटनेने जागतिक पातळीवर आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व मानवतावादी क्षेत्रात स्पृहणीय कार्य केले आहे. १) दुसऱ्या महायुद्धामध्ये अनेक देशात निर्माण झालेले निर्वासितांचे प्रश्न समाधानकारकपणे सोडविण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघटनेने उभारलेल्या खास यंत्रणेने निर्वासितांच्या पुनर्वसनाचे कार्य उत्तम रीतीने पार पाडले. २) युद्धामुळे ज्या युरोपियन राष्ट्रांच्या अर्थव्यवस्था मोडकळीस आल्या होत्या, त्यांना जागतिक बँकेद्वारा कर्जपुरवठा करून त्यांच्या पुनर्वसनाचे व विकासाचे प्रयत्न केले. ३) आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची स्थापना करून जागतिक चलनव्यवस्थेला स्थैर्य व सहकार्य प्राप्त करून दिले. ४) अविकसित राष्ट्रांना कृषिव्यवसायाच्या विकासासाठी तांत्रिक मदत पुरविली आणि जगातील दुष्काळग्रस्त विभागांना अन्नधान्याचा पुरवठा केला. ५) आरोग्यविषयक किमान उद्दिष्टे गाठण्यासाठी अविकसित राष्ट्रांना जागतिक आरोग्य संघटनेद्वारा तांत्रिक माहिती व अन्य मदत पुरविली. ६) शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटनेद्वारा (युनेस्को) आशिया, आफ्रिका व लॅटिन अमेरिका खंडातील अविकसित व मागासलेल्या राष्ट्रांमध्ये आणि जगातील विकसित

राष्ट्रांमध्ये शैक्षणिक, वैज्ञानिक व सांस्कृतिक क्षेत्रात परस्परसहकार्याची भावना अत्यंत कौशल्याने व समर्थपणे रुजविली आणि फुलविली. अमेरिकन परराष्ट्रसचिव जॉन फॉस्टर डलेस याच्या मते, संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या शैक्षणिक, वैज्ञानिक व सांस्कृतिक क्षेत्रातील कामगिरीमुळे जागतिक शांतता टिकण्यास मदत झाली. ७) मागासलेल्या देशातील लहान मुलांच्या आरोग्यासाठी आणि त्यांच्या विकासासाठी आंतरराष्ट्रीय बालक निधीद्वारा तांत्रिक माहिती व अन्य मदत पुरविली. ८) विकसित, विकसनशील आणि अविकसित राष्ट्रांमधील व्यापार वाढावा यादृष्टीने सातत्याने प्रयत्न केले. ९) मानवी हक्कांची सनद मान्य करून संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सभासद राष्ट्रांनी व अन्य राष्ट्रांनीही आपल्या जनतेला हे हक्क द्यावेत यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केलेत. १०) विश्वस्त राष्ट्रांना त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या जबाबदारीची वेळोवेळी जाणीव करून दिली. विश्वस्त राष्ट्रांच्या नियंत्रणाखालील विश्वस्त प्रदेशाच्या प्रशासनाकडे व विकासाकडे काळजीपूर्वक लक्ष पुरवून योग्य वेळी विश्वस्त प्रदेशांना स्वायत्तता मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले.

**२. राजकीय क्षेत्र :**

ग्रीस, इराण, सीरिया, लेबॅनॉन, पोलंड, इंडोनेशिया आदी राष्ट्रांबाबतच्या वादग्रस्त प्रश्नांच्या सोडवणुकीमध्ये संयुक्त राष्ट्रसंघटनेला यश मिळाले. कारण या वादग्रस्त प्रश्नांमध्ये बड्या राष्ट्रांचे महत्त्वाचे हितसंबंध गुंतलेले नव्हते. ज्या आंतरराष्ट्रीय संघर्षामध्ये मोठ्या राष्ट्रांचे प्रत्यक्ष हितसंबंध गुंतले होते, त्या संघर्षांच्या बाबतीत संयुक्त राष्ट्रसंघटनेला खऱ्या अर्थाने यश मिळू शकले नाही. ज्या आंतरराष्ट्रीय प्रश्नांमध्ये संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सामूहिक सुरक्षिततेच्या यंत्रणेस उघड उघड आव्हान मिळाले, असे प्रश्न मोठ्या राष्ट्रांनी संघटनेबाहेर परस्परात वाटाघाटी करून, देवाण-घेवाण करून परस्पर सहकार्याने सोडविले. इंडोचायना, व्होडेशिया, पॅलेस्टाईन, कांगो यासारखे प्रश्न सोडविण्यात संयुक्त राष्ट्रसंघटनेला यश मिळाले, असे विधान करणे धाडसाचे ठरेल. इंडोचायनाच्या संदर्भात संयुक्त राष्ट्रसंघटनेने नियुक्त केलेले आंतरराष्ट्रीय नियंत्रण मंडळ विशेष कार्य करू शकले नाही, ही वस्तुस्थिती आहे. व्हिएटनाममधून अमेरिकेने घेतलेली माघार ही संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या निर्णयामुळे झाली नाही. अमेरिकेच्या बदललेल्या धोरणामुळे कम्युनिस्ट चीनला संयुक्त राष्ट्रसंघटनेत प्रवेश मिळणे शक्य झाले आणि कम्युनिस्ट चीनच्या संदर्भातील अमेरिकेच्या बदललेल्या धोरणामुळे व्हिएटनामचा प्रश्न सोडविण्यास मदत झाली, पश्चिम आशियातील अरब-इस्त्राएल संघर्षात अमेरिका, रशिया आदी बड्या राष्ट्रांचे मूलभूत हितसंबंध गुंतलेले असल्यामुळे या बड्या राष्ट्रांमध्ये एकमत झाल्याशिवाय अरब-इस्त्राएल संघर्षाची सोडवणूक समाधानकारकरीत्या होणे अवघड आहे.

**३. शस्त्रास्त्र कपात :**

जमिनीवर अण्वस्त्रांचे प्रयोग करू नयेत अशा स्वरूपाचा करार सन १९६२-६३ मध्ये करण्यात आला आणि या कराराला अमेरिका, रशिया, इंग्लंड या मोठ्या राष्ट्रांनी मान्यता दिली, परंतु फ्रान्स आणि चीन या मोठ्या राष्ट्रांनी प्रस्तुत करारास मान्यता न दिल्यामुळे जगाच्या मस्तकावर अण्वस्त्रांचा धोका कायम आहे. सर्व अण्वस्त्रधारी बड्या राष्ट्रांच्या समझोत्याशिवाय अण्वस्त्रांबाबतची शस्त्रकपात यशस्वी होणार नाही. महासत्तांनी त्यांच्याजवळ असलेल्या अण्वस्त्रांपैकी ५०% अस्त्रांचा जरी वापर केला, तरी १०० कोटी माणसे

तात्काळ मृत्युमुखी पडतील व तेवढेच जन्मभराकरिता कायमचे अपंग बनतील, असा धोक्याचा इशारा जागतिक आरोग्य संघटनेने सन १९८४ मध्ये भरलेल्या एका परिषदेत दिला.

### ४. मानवी हक्क :

संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या घटनेत नमूद केल्याप्रमाणे १० डिसेंबर, १९४८ रोजी मानवी हक्कांची घोषणा करण्यात आली. या घोषणेप्रमाणे सर्व सदस्य राष्ट्रांनी आपल्या देशातील नागरिकांना मूलभूत हक्क द्यावेत आणि त्या हक्कांचे संरक्षण करावे अशी अपेक्षा आहे. तथापि दक्षिण आफ्रिका आणि ऱ्होडेशिया या राष्ट्रांनी मूलभूत मानवी हक्कांची सातत्याने पायमल्ली चालविली असून आपले परंपरागत वर्णविद्वेषाचे धोरण अद्यापही चालू ठेवले आहे. या बाबतीत संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या व्यासपीठावरून दक्षिण आफ्रिका आणि ऱ्होडेशिया यांचा निषेध करण्याव्यतिरिक्त संयुक्त राष्ट्रसंघटनेला काहीही करता आले नाही.

### ५. संयुक्त राष्ट्रसंघटनेचे आर्थिक सामर्थ्य :

संयुक्त राष्ट्रसंघटना ही जगातील १८५ छोट्या-मोठ्या, विकसित-अविकसित, प्रबळ-दुर्बळ राष्ट्रांची केवळ एक आंतरराष्ट्रीय संघटना आहे, सार्वभौम सरकार नव्हे. साहजिकच कोणत्याही सार्वभौम राष्ट्राप्रमाणे आपल्या नागरिकांवर कर बसविणे, त्यांच्याकडून कर्ज घेणे अथवा निधी उभारणे, हे हक्क संयुक्त राष्ट्रसंघटनेस नाहीत. सभासद राष्ट्रांनी दिलेल्या वर्गणीवर संयुक्त राष्ट्रसंघटनेचा संपूर्ण खर्च चालतो. ही वर्गणीही सभासद राष्ट्रे वेळेवर देत नसल्यामुळे आर्थिकदृष्ट्या संयुक्त राष्ट्रसंघटना दुर्बल बनली आहे.

### ६. दंडशक्तीचा अभाव :

सार्वभौम राष्ट्रांच्या समतेच्या मूलभूत तत्त्वावर संयुक्त्त राष्ट्रसंघटनेची उभारणी झाली असल्यामुळे ज्या गोष्टींना सार्वभौम राष्ट्रांची मान्यता नाही, अशा गोष्टी करणे संयुक्त राष्ट्रसंघटनेला कदापी शक्य नाही. स्वतः सार्वभौम असलेल्या आपल्या सदस्य राष्ट्रांच्या बाबतीत कायदे करून त्यांची सक्तीने अंमलबजावणी करण्याची सार्वभौम दंडशक्ती संयुक्त राष्ट्रसंघटनेकडे नाही. परिणामी संयुक्त राष्ट्रसंघटनेला आपले निर्णय व निवाडे स्वतःच्याच सभासद राष्ट्रांवर लादता येत नाहीत आणि त्यांची अंमलबजावणी करता येणेही शक्य होत नाही. दंडसत्ता ही लष्करी बळावर अवलंबून असते आणि अशी दंडसत्ता-लष्करी बळ संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या पाठीशी नसल्यामुळे संयुक्त राष्ट्रसंघटनेकडून दिले जाणारे आदेश धुडकावून लावण्याची प्रवृत्ती सभासद राष्ट्रांमध्ये, विशेषतः प्रबळ मोठ्या राष्ट्रांमध्ये आढळते. सभासद राष्ट्रांच्या बेदरकार, बेजबाबदार वागणुकीबद्दल त्या राष्ट्रांना शिक्षा करण्याचे सामर्थ्य अंगी नसल्यामुळे अशा प्रसंगी संयुक्त राष्ट्रसंघटना हतबल होते. यामुळेच आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या निवाड्यांना कायद्याचे स्वरूप प्राप्त होत नाही.

### ७. सामूहिक सुरक्षिततेची यंत्रणा

संयुक्त राष्ट्रसंघटनेजवळ स्वतःची प्रबळ लष्करी यंत्रणा नसल्यामुळे सनदेतील सामूहिक सुरक्षिततेच्या तरतुदींवर तिला अवलंबून रहावे लागते. सामूहिक सुरक्षिततेची लष्करी कारवाई करण्यासाठी सुरक्षा परिषदेमध्ये पाच कायम सभासद राष्ट्रांचे एकमत होणे अत्यावश्यक असते. पाच मोठ्या कायम राष्ट्रांचे

एकमत होणे ही जवळपास अत्यंत अवघड गोष्ट आहे. विशेषतः संबंधित प्रश्नात सुरक्षा परिषदेतील कायम सभासदांपैकी एखाद्या मोठ्या राष्ट्राचे हितसंबंध गुंतले असतील, तर ते राष्ट्र आपल्या नकाराधिकाराचा वापर करून सामूहिक सुरक्षिततेची कारवाई अशक्य करून टाकते. जागतिक शांततेस धोका उत्पन्न करणारे प्रश्न उद्भवले असतानाही सामूहिक सुरक्षिततेची यंत्रणा प्रभावीरीत्या कार्य करू शकली नाही, हे संयुक्त राष्ट्रसंघटनेचे अपयश आहे.

**८. व्हेटोचा गैरवापर :**

जगात शांतता टिकविण्याची खरी जबाबदारी मोठ्या सत्तांची असल्यामुळे सुरक्षा परिषदेमध्ये पाच मोठ्या सत्तांना कायम सभासदत्व आणि व्हेटोचा अधिकार देण्यात आला. व्हेटोचा अधिकार अपवादात्मक परिस्थितीत वापरला जाईल अशी अपेक्षा होती. तसे झाले नाही. सर्व मोठ्या सत्तांनी स्वतःच्या हितसंबंधांच्या रक्षणार्थ व्हेटोचा सर्रास वापर केला. दुसऱ्या महायुद्धानंतर जगाची विभागणी साम्यवादी राष्ट्रांचा गट आणि मुक्त लोकशाहीवादी राष्ट्रांचा गट अशा दोन गटांत झाली. या दोन गटांतील तत्त्वज्ञानात्मक भेदांमुळे, मतभेदांमुळे, परस्परांवर कुरघोडी करण्याच्या राजकारणामुळे जगात सातत्याने शीतयुद्धाचे वातावरण अस्तित्वात राहिले. परिणामी सुरक्षा परिषदेमध्ये परस्परांवर मात करण्यासाठी दोन्ही गट आपल्या व्हेटोचा सर्रास वापर करू लागले. व्हेटोच्या या अधिकारामुळे संयुक्त राष्ट्रसंघटना प्रबळ होण्याऐवजी अधिक दुर्बळ झाली आहे.

**९. प्रबळ राष्ट्रवाद :**

पामर आणि पार्किन्स म्हणतात, ''युनोच्या अपयशाची मुळे कडवा राष्ट्रवाद, व्यापक सार्वभौमत्व, राष्ट्र-राज्याचे खूळ आणि मानव वंशातील विकृती यांच्यात खोलवर रुजलेली आहेत.'' जागतिक शांततेसाठी स्वतःच्या राष्ट्रीय हितसंबंधांना दुय्यम स्वरूप देणे आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढविणे या गोष्टींची जागतिक समाज निर्माण करण्यासाठी आवश्यकता आहे. प्रत्यक्षात बहुतेक राष्ट्रांमध्ये असलेल्या प्रबळ राष्ट्रवादी भावनेमुळे आंतरराष्ट्रीय सहकार्याची वृत्ती व एकात्मतेची भावना निर्माण होणे अवघड झाले आहे. अमेरिका, इंग्लंड यासारखी पुरोगामी विचारांची राष्ट्रेही आपल्या वसाहतींच्या नियंत्रणाच्या बाबतीत अंतर्गत कार्यक्षेत्राच्या नावाखाली संयुक्त राष्ट्रसंघटनेकडून हस्तक्षेप होऊ नये याबाबत कायम जागरूक असतात. नव्याने स्वतंत्र झालेली राष्ट्रे अविकसित आणि दुर्बळ असली, तरी त्यांच्यात प्रखर राष्ट्रवादाची भावना आढळते. आपल्या राष्ट्रीयत्वावर आक्रमण करणाऱ्या कोणत्याही प्रयत्नास नवस्वतंत्र राष्ट्रे कडाडून विरोध करतात. संयुक्त राष्ट्रसंघटनेने सुचविलेला कार्यक्रम जर एखाद्या राष्ट्राच्या हितसंबंधांच्या विरोधात असेल अथवा त्या राष्ट्राच्या हिताला पोषक नसेल, तर अशा कार्यक्रमाला एकतर विरोध तरी होतो किंवा अपेक्षित सहकार्य लाभत नाही.

**१०. मर्यादित यश :**

संयुक्त राष्ट्रसंघटना जागतिक शांतता व सुरक्षितता राखण्याच्या तिच्या मूलभूत कार्यात पूर्णपणे अयशस्वी ठरल्यामुळे आता तिची आवश्यकता नाही, असे म्हणता येणार नाही. आज जगातील सर्व मोठ्या

सत्तांसह १९४ सार्वभौम राष्ट्रे संयुक्त राष्ट्रसंघटनेची सभासद राष्ट्रे असल्यामुळे ही आंतरराष्ट्रीय संघटना 'जागतिक व्यासपीठ' बनली आहे. कायम परस्परविरोधी पवित्र्यात असणारी राष्ट्रे या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर खुली चर्चा करू शकत आहेत, जागतिक लोकमत बनविण्यासाठी युनोच्या व्यासपीठाचा वापर करीत आहेत.

संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या वर्धापनदिनी २४ ऑक्टोबर, १९७० रोजी महासचिव ऊथांट यांनी अत्यंत मोजक्या शब्दांत संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या कार्याचे मूल्यमापन केले, ''संयुक्त राष्ट्रसंघटना ही एक अशी मानवतेची संसद आहे की, जिच्या व्यासपीठावर दुष्कृत्ये, अन्याय आणि मानवाच्या आकांक्षा मांडल्या जातात. या संघटनेने स्थानिक संघर्षाचे रूपांतर जागतिक युद्धात होऊ देण्याचे टाळले आहे. या संघटनेने १०० कोटी जनतेला स्वातंत्र्य मिळवून दिले. सर्व प्रकारचा वसाहतवाद, जातिभेद, वंशभेद यांचा तीव्र शब्दात निषेध करून ही संघटना या भेदभावांविरुद्ध खंबीरपणे झगडली आहे. असे असले तरीही संयुक्त राष्ट्रसंघटनेला अद्यापही अधिक उत्तम काम करावयाचे आहे.''

संयुक्त राष्ट्रसंघटना जागतिक शांततेसाठी उपयुक्त ठरावयाची असेल, तर सर्व छोट्या-मोठ्या राष्ट्रांनी, मोठ्या सत्तांनी आणि महासत्तांनीही संयुक्त राष्ट्रसंघटनेकडे सन्मानपूर्वक पहावे, आपापसात उद्भवणाऱ्या वादांच्या, संघर्षाच्या निराकरणासाठी विश्वासाने त्या संघटनेकडे जावे आणि संघटनेचे निर्णय मान्य करावेत. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या तत्त्वांशी आणि आदर्शाशी सभासद राष्ट्रांनी निष्ठा राखल्याशिवाय ही संघटना यशस्वी होणार नाही.

संयुक्त राष्ट्रसंघटनेसाठी स्वतःची प्राणाहुती दिलेल्या महासचिव दाग हॅमरस्कजोल्ड यांनी प्रस्तुत संघटनेबाबत काढलेले उद्‌गार चिंतनीय व लक्षणीय आहेत. दाग हॅमरस्कजोल्ड म्हणतात, ''श्रद्धा, विश्वास आणि परस्पर सहकार्य या तत्त्वांवर संयुक्त राष्ट्रसंघटनेची उभारणी झाली आहे. शांततेसाठी सहजीवन ही कल्पना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी या तत्त्वांचा प्रत्यक्ष आचार व्हावयास हवा. अन्यथा कोणतीही आंतरराष्ट्रीय संघटना अपयशी ठरेल आणि जग विनाशाच्या खाईत ओढले जाईल.''

शांततामय मार्गांनी वाटाघाटीच्या, चर्चेच्या माध्यमातून सर्व प्रकारच्या प्रश्नांची, वादांची, संघर्षांची सोडवणूक करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या जागतिक व्यासपीठाचा उपयोग करून घेणे ही गोष्ट जागतिक शांतता व सुरक्षितता कायम टिकविण्याच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे. विशेषतः आजच्या अणुयुगात जागतिक शांतता व सुरक्षितता टिकविण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या जागतिक व्यासपीठाचा समर्थपणे वापर करून घेणे, हे मानवी कल्याणाच्याच दृष्टीने नव्हे तर मानवी अस्तित्वाच्या दृष्टीने आवश्यक आहे.

## १.४ स्वयं-अध्ययन प्रश्न

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. संयुक्त राष्ट्र संघाची स्थापना...............रोजी करण्यात आली.

(अ) २२ ऑक्टोबर, १९४५ (ब) २३ ऑक्टोबर, १९४५

(क) २४ ऑक्टोबर, १९४५ (ड) २५ ऑक्टोंबर, १९४५.

२. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेत............ भाग व........... कलमे आहेत.

(अ) १७ व ११० (ब) १८ व १११ (क) १९ व १११ (ड) २० व १११.

३. संयुक्त राष्ट्रसंघाचे मध्यवर्ती कार्यालय........... येथे आहे.

(अ) पॅरीस (ब) न्यूयॉर्क (क) वॉशिंग्टन (ड) हॉलंड

४. संयुक्त राष्ट्र संघाच्या आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे कामकाज ............या देशातून चालते.

(अ) अमेरिका (ब) हॉलंड (क) इंग्लंड (ड) जर्मनी.

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. कोणत्या राष्ट्रांना संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेत कायम सदस्यत्व देण्यात आले?

२. संयुक्त राष्ट्र संघाचे सरचिटणीस उ-थॉट हे कोणत्या राष्ट्रांचे होते?

३. अटलांटिक सनद तयार करण्यासाठी कोणत्या दोन प्रमुख राष्ट्रांनी सहभाग घेतला होता?

४. कोणत्या दिवशी संयुक्त राष्ट्रसंघाच्यावतीने 'मानवाधिकार दिन' सर्व जगभर साजरा केला जातो.

**स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे**

अ) योग्य पर्याय निवडा.

१. (क) २४ ऑक्टोबर, १९४५. २. (क) १९ व १११.

३. (ब) न्यूयॉर्क ४. (ब) हॉलंड,

ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. संयुक्त राष्ट्र संघाच्या सुरक्षा परिषदेत अमेरिका, इंग्लंड, चीन, रशिया, फ्रान्स या राष्ट्रांना कावम सदस्यत्व देण्यात आले.

२. संयुक्त राष्ट्र संघाचे सरचिटणीस उ-थॉट हे म्यानमार देशाचे होते.

३. अमेरिका व इंग्लंड या दोन प्रमुख राष्ट्रांनी अटलांटिक सनद तयार करण्यासाठी सहभाग घेतला.

४. १० डिसेंबर या दिवशी संयुक्त राष्ट्रसंघाच्यावतीने 'मानवाधिकार दिन' सर्व जगभर साजरा केला जातो.

## १.५ सरावासाठी स्वाध्याय

अ) दिर्घोत्तरी प्रश्न.

१. संयुक्त राष्ट्रसंघाची तत्त्वे आणि उद्दिष्टे स्पष्ट करा.

२. संयुक्त राष्ट्रसंघाच्या स्वरुपाची सविस्तर चर्चा करा.

३. संयुक्त राष्ट्रसंघाचे कार्य स्पष्ट करा.

ब) टिपा लिहा.

१. महासभा

२. आंतरराष्ट्रीय न्यायलय

३. संयुक्त राष्ट्रसंघाचे यशापयश

**१.६ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके**


१. आचार्य धनंजय, विसाव्या शतकातील जग, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००७

२. वैद्य सुमन, शांता कोठेकर, आधुनिक जग (१९४५-२०००), श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

३. जोशी पी. जी., विसाव्या शतकाचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर

४. कदम य. ना., विसाव्या शतकातील जग, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

५. Mahajan V. D., History of Modern Europe, S. Chand of Co, Ltd., New Delhi, 1974.

६. Nanda S. P., History of the Modern World, Anmol Publication, New Delhi, 1998

७. Meiser Stanley, United Nations: The first-fifty years, New York, 1995

८. Yoder Amos, The Evolution of the United Nations System, New York, 1993

९. Bennett A. Lerox, International Organization, Englewood Cliff. (N.J.), 1980.


❑❑❑

# घटक २
# करार व संघटना
(Treaties and Alliances)

**अनुक्रमणिका**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ विषय विवेचन

 २.२.१ नाटो

 २.२.२ सेंटो

 २.२.३ ॲझ्युस

 २.२.४ वॉर्सा

२.३ स्वयं-अध्ययन प्रश्न

२.४ सरावासाठी स्वाध्याय

२.५ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## २.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला,

१. दुसऱ्या महायुध्दानंतर जगाची दोन गटात विभागणी कशा प्रकारे झाली याची माहिती मिळेल.

२. रशिया व अमेरिका या दोन महासत्तांचा उदय, विकास व त्यांच्यातील स्पर्धेबद्दल माहिती मिळेल.

३. दुसऱ्या महायुध्दानंतर जागतिक पातळीवर झालेल्या विविध राष्ट्रांतील लष्करी करार व संघटनांची माहिती मिळेल.

## २.१ प्रस्तावना

इ.स. १९४८ पर्यंत अमेरिकेने अमेरिकेचा प्रभाव असलेल्या किंवा प्रभाव निर्माण होण्याची शक्यता असलेल्या प्रदेशात साम्यवादाचा शिरकाव, प्रसार, प्रचार व विस्तार होवू नये म्हणून आर्थिक व तांत्रिक मदतीच्या योजना कार्यवाहीत आणल्या. युरोपीय आर्थिक सहकारी संघटना, परस्पर संरक्षक साहाय्य कार्यक्रम, युरोपांतर्गत अर्थदेय योजना, शूमन योजना, युरोपीय सामायिक बाजारपेठ इत्यादी योजना राबवून आर्थिक मदत दिली. परंतु या योजना पूर्णतः फलदायी होतील याची खात्री नव्हती. इ. स. १९४८ पासून

साम्यवाद रोखण्याची नीती राजनैतिक व लष्करी स्तरावर साकार झाली. साम्यवादी आक्रमण शस्त्राच्या बळावर थोपवण्याची वेळ आल्यास तशी तयारी असावी म्हणून लष्करी संघटना उभारण्यावर अमेरिकेने भर दिला. पश्चिम युरोपातील राष्ट्रांनी आपसात ब्रुसेल्स करारासारखे करार करून लष्करी गट स्थापन करण्यासाठी अमेरिकेने पुढाकार घेतला. लवकरच 'नॉर्थ अॅटलांटिक ट्रीटी ऑर्गनायझेशन (NATO)', मध्यपूर्वेत 'सेंट्रल ट्रीटी ऑर्गनायझेशन (CENTO)', अँझ्युस करार संघटना निर्माण झाल्या. यावर प्रतिक्रिया म्हणून रशियाने वॉर्सा करार करून त्यांच्या गटाचे लष्करीकरण केले. या करारांची सविस्तर माहिती पुढील प्रमाणे:

## २.२ विषय विवेचन

### **२.२.१ नाटो** (North Atlantic Treaty Organization)

आंतरराष्ट्रीय राजकारणात दीर्घकाळ टिकलेली व कायमचा ठसा उमटविणारी संघटना आंतरराष्ट्रीय संबंधात अतिशय महत्त्वाची समजली जाते. अमेरिकेच्या रशियाविरोधी संरक्षक योजनेचा एक भाग म्हणूनच 'नाटो' जन्माला आली. युरोपातील एकता टिकवून ठेवण्यासाठी अमेरिकेने ब्रुसेल्स तहाच्यावेळी सर्व प्रकारची आर्थिक व लष्करी मदत देण्याचे अभिवचन दिले होते. त्याप्रमाणे आर्थिक व लष्करी मदत देण्याचे प्रत्यक्ष कार्यदेखील सुरू केले होते. याच दरम्यान संयुक्त राष्ट्रसंघाच्या सभासद राष्ट्रांनी परस्पर संरक्षक करार केले असतील व ते युनोच्या सनदेशी सुसंगत असतील तर त्या राष्ट्रांनाही लष्करी मदत देण्यास अमेरिकेच्या सीनेटने मंजुरी दिली. अमेरिकेने तशी लष्करी मदत देण्याची योजनाही तयार केली.

याचवेळी युरोपच्या बर्लिन विभाजनामुळे पूर्व-पश्चिम तणाव वाढू लागला होता. म्हणून अमेरिकेने ब्रुसेल्स तहातील राष्ट्रांशी गुप्तपणे चर्चा करून युरोपवरील सोव्हिएट रशियाचे आक्रमण थोपविण्यासाठी भक्कम उपाययोजना करण्याचा निर्धार केला. या निर्धारातूनच पश्चिम युरोपातील राष्ट्रांची एक विस्तृत संरक्षक संघटना जन्माला आली. या संघटनेत डंकर्क (१९४७) व ब्रुसेल्स करारातील (१९४८) सर्व राष्ट्रे सामील होतीच, शिवाय नॉर्वे, डेन्मार्क, आइसलँड, आयलँड, पोर्तुगाल या देशांनाही संघटनेत सामील होण्याचे आवाहन केले. स्पेन व जर्मनी यांनाही संघटनेत सामील होण्यासाठी हिरवा कंदील दाखविण्यात आला. अशा विस्तृत पायावर आधारलेल्या व अमेरिकेची प्रेरणा स्वीकारलेल्या या संरक्षक संघटनेस 'उत्तर-अॅटलांटिक करार संघटना' (नाटो) असे नाव देण्यात आले. ४ एप्रिल, १९४९ रोजी अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, इटली, बेल्जियम, डेन्मार्क, लक्झेंबर्ग, नेदर्लंडस्, नार्वे, पोर्तुगाल, कॅनडा व आयर्लंड या बारा देशांनी नाटोच्या करारावर सह्या केल्या. सन १९५२ मध्ये ग्रीस व तुर्कस्थान आणि १९५५ साली पश्चिम जर्मनी या करारात सामील झाले.

**१. महत्वाची कलमे :-**

या करारामध्ये एक सरनामा व १४ कलमे आहेत. या कराराच्या सरनाम्यात संयुक्त राष्ट्रसंघाच्या ध्येयावर व उद्दिष्टांवर नाटो सभासद राष्ट्रांनी पूर्ण विश्वास व्यक्त केला आहे. स्वातंत्र्य, मानवतेचा वारसा, संस्कृती, लोकशाही, व्यक्ती स्वातंत्र्य आणि कायद्याचे राज्य या तत्वांशी कटिबध्द राहण्याची ग्वाही देण्यात

आली आहे. तसेच उत्तर अटलांटिक क्षेत्रातील शांततेच्या रक्षणासाठी सामुदायिक सुरक्षिततेच्या तत्वानुसार एकत्र येवून सहकार्य करण्याचा निश्चय नाटो राष्ट्रांनी जाहीर केला. या करारातील कलमे पुढीलप्रमाणे :-

१. 'नाटो' कराराच्या सरनाम्यात संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेवर पूर्ण विश्वास व्यक्त केला असून स्वातंत्र्य, मानवतेचा वारसा, संस्कृती, लोकशाही, व्यक्तिस्वातंत्र्य व कायद्याचे राज्य या तत्त्वांशी कटिबद्ध राहण्याची ग्वाही देण्यात आली आहे तसेच उत्तर ॲटलांटिक क्षेत्रातील शांततेच्या रक्षणासाठी सामुदायिक सुरक्षिततेच्या तत्त्वानुसार एकत्र येण्याचा निश्चय 'नाटों'राष्ट्रांनी जाहीर केला आहे.

२. नाटोच्या सभासद राष्ट्रांनी आपआपसातील वाद आणि समस्या शांततेने व तडजोडीने सोडवून वैयक्तिक व सामुदायिक सुरक्षितता मजबूत करण्याचे मान्य केले.

३. स्वातंत्र्य व सुरक्षितता धोक्यात येईल असे वाटल्यास सभासद राष्ट्रांनी त्वरित एकत्र येवून विचार विनिमय करण्याचे ठरले.

४. युरोप किंवा उत्तर अमेरिका या प्रदेशातील एका किंवा अनेक देशांवर झालेले आक्रमण हे नाटोच्या सर्व सभासद राष्ट्रांवरील आक्रमण समजण्यात येईल. त्या आक्रमणाचा प्रतिकार करण्याच्या दृष्टीने संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेनुसार आक्रमणाला बळी पडलेल्या राष्ट्राला सर्व सभासदांनी संयुक्तपणे लष्करी मदत द्यावी.

५. नाटो करार संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेशी विसंगत नाही त्यामुळे नाटो कराराच्या कलमांशी विसंगत अथवा विरोधी करार किंवा तह नाटो संघटनेबाहेरील राष्ट्राबरोबर कोणत्याही परिस्थितीत करू नये.

६. नाटो संघटनेबाहेरील ज्या राष्ट्रांना नाटो करार मान्य आहे त्यांना नाटोचे सभासदत्व देण्यात येईल.

७. सभासद राष्ट्रांना आवश्यकता वाटल्यास नाटो करारात १० वर्षांनंतर सुधारणा करता येईल.

८. नाटो कराराच्या सभासद राष्ट्रांना वीस वर्षानंतर सभासदत्व सोडता येईल. परंतु त्यासाठी एक वर्ष अगोदर नोटीस द्यावी लागेल.

**२. नाटोची कामकाज पध्दती :-**

उत्तर अटलांटिक कौन्सिल, लष्कर समिती, स्थायी समिती व लष्कर प्रतिनिधी समिती या चार घटक संस्था नाटोचे कामकाज पाहतात.

**अ) उत्तर अटलांटिक कौन्सिल:** ही नाटोची धोरणात्मक निर्णय घेणारी घटकसंस्था आहे. या घटक संस्थेवर प्रत्येक सभासद राष्ट्राच्या शिष्टमंडळात परराष्ट्रमंत्री, संरक्षण मंत्री व अर्थमंत्री यांचा समावेश असतो.

**ब) लष्करी समिती:** ही समिती नाटोचे सर्वसाधारण लष्करी धोरण ठरवित असते. या समितीवर प्रत्येक सभासद राष्ट्राचा लष्करी प्रमुखाच्या दर्जाचा अधिकारी असतो.

**क) स्थायी समिती:** नाटोचे दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी स्थायी समिती निर्माण करण्यात आली. या समितीत अमेरिका, इंग्लंड व फ्रान्स या राष्ट्रांचे प्रतिनिधी काम पाहतात.

**ड) लष्करी प्रतिनिधी समिती:** नाटोच्या प्रत्येक सभासद राष्ट्राच्या लष्करप्रमुखाचा एक प्रतिनिधी या समितीवर नियुक्त केला जातो. सभासद राष्ट्रांच्या लष्करी समस्यांची दखल घेणे, त्यावर उपाययोजना सुचविणे, सभासद राष्ट्रांच्या लष्करप्रमुखांशी सतत संपर्क ठेवून त्यांना योग्य ते मार्गदर्शन करणे इत्यादी लष्करी स्वरुपाची कामे या समितीला करावी लागत होती. या प्रमुख चार समित्यांशिवाय वेळोवेळी निर्माण होणाऱ्या समस्यांचा विचार करण्यासाठी २० कायम समित्या आहेत. नाटोचा सरचिटणीस दैनंदिन कामकाज पाहतो. त्याच्या सहकार्यासाठी असलेल्या कर्मचारी वर्ग गुणवत्तेच्या आधारे निवडला जातो.

**अमेरिकेचा पुढाकार:–**

२१ जुलै १९४८ रोजी सीनेटची नाटोला संमती मिळाल्यानंतर अध्यक्ष ट्रुमन यांनी २५ जुलै, १९४८ रोजी नाटोस अंतिम मंजुरी दिली. २४ ऑगस्ट १९४८ पर्यंत इतर संबंधित राष्ट्रांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्यानंतर नाटो अधिकृतपणे अस्तित्वात आला. नाटो ही पश्चिम युरोपातील राष्ट्रांची लष्करी संघटना आहे. युरोपशिवाय अमेरिका हे दुसऱ्या खंडातील राष्ट्र आहे.

पश्चिम युरोपातील राष्ट्रांचा समावेश असलेला व उत्तर अॅटलांटिक क्षेत्रात काम करणाऱ्या 'नाटों'करारात अमेरिकेचा पुढाकार का?, असा प्रश्न आंतरराष्ट्रीय राजनैतिक वर्तुळात चर्चिला जातो. त्याचे समर्थन अशा रीतीने केले जाते.

१) रशियाची साम्यवादाची द्वाही अमेरिकेला स्वातंत्र्य व लोकशाहीला धोका आणणारी वाटत होती. या लाल धोक्यापासून स्वातंत्र्य व लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी ट्रुमन सिद्धान्त 'मार्शल योजना' 'शूमन योजना' इत्यादी उपाययोजना अमेरिकेला अपुऱ्या वाटत होत्या. विशेषतः पूर्व युरोपात रशियाचे झालेले आक्रमण व त्या आक्रमणाची पश्चिम युरोपच्या दिशेने चाललेली आगेकूच पाहिल्यानंतर अमेरिकेने नाटो करार संघटना उभी करण्याचे निश्चित केले, म्हणून अमेरिका त्यात असणे नैसर्गिक आहे.

२) अमेरिकेच्या सुरक्षिततेसाठी स्वतंत्र व समर्थ युरोप आवश्यक आहे. म्हणून युरोप व अमेरिका यांचे संयुक्त सामर्थ्य कोणत्याही आक्रमणास सहजपणे परतवून लावू शकेल, यास्तव अमेरिका नाटोत असणे अत्यंत आवश्यक आहे.

३) जगात सर्वात कर्तृत्वसंपन्न व कर्तबगार माणसे युरोपात आहेत. या माणसांना आपल्याजवळ बाळगणे अमेरिकेला महत्त्वाचे वाटते. ही माणसे रशियाच्या अधिपत्याखाली गेल्यास साम्यवादी शक्तीमध्ये प्रचंड वाढ होईल व जगातील स्वातंत्र्य व लोकशाही धोक्यात येईल असा अमेरिकेचा समज आहे.

४) पश्चिम युरोपातील अतिसमृद्ध औद्योगिक केंद्रे युरोप व अमेरिकेच्या औद्योगिक विकासासाठी वापरल्यास त्यांची उत्पादनक्षमता सोव्हिएट रशियाच्या गटापेक्षा खात्रीने मोठी होईल, म्हणून अमेरिका नाटोत सामील झाली.

५) नवनवीन शस्त्रास्त्रांचे उत्पादन, ३० लाख उत्तम खडी सेना, संरक्षित बंदरे, विशाल हवाई तळ इत्यादी बाबी युरोपच्या जमेच्या बाजू आहेत, त्यांच्या सहाय्याने अमेरिकेला रशियन आक्रमणास सहज तोंड देता येईल, अशी अमेरिकेची खात्री होती.

६) अमेरिकेचा अध्यक्ष आयसेन हॉवर यांच्या मते, जागतिक शांततेचा आणि सुरक्षितेचा एक अविभाज्य घटक म्हणजे नाटो होय.

७) जगास दुरवस्थेतून विकास साधण्यासाठी सुरक्षितता वाटली पाहिजे. असुरक्षिततेच्या मुळाशी आक्रमणाची भीती असते. त्यावर सामुदायिक कारवाई हाच उपाय असतो. अमेरिकेने या सामुदायिक उपाययोजनेसाठी नाटोत भाग घेतला आहे. अमेरिकेचे नाटोतील अस्तित्व पश्चिम युरोपला खात्रीने बळकटी आणील, असा अमेरिकन परराष्ट्र खात्याचा दावा होता.

८) ट्रुमन यांच्या शद्बांत, 'आपल्या राष्ट्रीय सुरक्षिततेवर घाला घालणारे कोणतेही आक्रमण खंबीरपणे परतवून लावले जाईल, असे आक्रमणापूर्वीच स्पष्ट सांगितले असेल, तर आक्रमणच होणार नाही,' अशी अमेरिकेची भूमिका आहे.

१०) अमेरिकेच्या नाटोतील सहभागामुळे पश्चिम युरोप मजबूत होईल, तेथील जनतेचे नीतिधैर्य वाढेल, रशिया पश्चिमेकडे सरकणार नाही आणि नाटो संयुक्त राष्ट्रसंघाचा एक भक्कम आधारस्तंभ बनेल.

**४. नाटोचे सामर्थ्य :–**

नाटो ही लष्करी संघटना रशियाच्या साम्यवादी आक्रमणाचा प्रतिकार करण्यासाठी उदयास आली होती, या संघटनेला सामर्थ्यशाली बनविण्याचा प्रयत्न झाला. जगातील विविध समस्यांवरून रशिया व अमेरिका समोरासमोर आले. त्या प्रत्येकवेळी नाटोचे सामर्थ्य वाढत राहिले, नाटोच्या सभासद राष्ट्रांनी संघटनेच्या संयुक्त सेनेसाठी आपल्या देशातून ठराविक सैन्य पुरविले. या संयुक्त सेनेचे प्रमुख पद संघटनेच्या लष्कर प्रमुखाकडे असते. नाटोचे प्रमुख कार्यालय पॅरिस येथे आहे. नाटोत दहा लाखापेक्षा जास्त सैन्य आहे. शिवाय १०,००० रणगाडे, ३,५०० तोफा, १,५०० लढाऊ विमाने, १,००० टेहळणी विमाने, ५००० अणुबॉम्ब टाकणारी विमाने आहेत. नाटो संघटनेकडे अत्याधुनिक शस्त्रे, आधुनिक तंत्रज्ञान, तिन्ही दलात योग्य समन्वय साधणारी समर्थ प्रशासन यंत्रणा इत्यादी गोष्टी आहेत. नाटोच्या सभासद राष्ट्रांतील सुरुवातीचे संशयाचे व मतभेदाचे वातावरण नष्ट करून सर्व राष्ट्रांना व्यावहारिक पातळीवर एकत्र आणले. त्यांच्यात परिणामकारक सहकार्य वाढीस लावले. त्यातून नाटो सामर्थ्यशाली बनली.

**नाटोची वाटचाल:**

नाटोच्या स्थापनेपासून पुढील दहा-बारा वर्षात नाटोच्या सभासद राष्ट्रांत सहकार्य उत्तम रीतीचे राहिले. पण मार्शल योजनेसारख्या उपायामुळे सभासद राष्ट्रांची आर्थिक परिस्थिती सुधारली जाऊन स्वतःच्या पायावर उभे राहण्याची त्यांच्यात ताकद आल्यानंतर, दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिण्याच्या धोरणाचा त्याग करण्याचा बऱ्याच राष्ट्रांनी निश्चय केला. शिवाय अमेरिकेचे नाटोवरील वाढते दडपण आणि आपला प्रभाव

वाढविण्यासाठी केलेला वाढता वापर यामुळे नाटोमध्ये मतभेद वाढण्यास प्रारंभ झाला. स्टॅलिनच्या मृत्यूनंतर शीतयुद्धाची तीव्रताही कमी होऊ लागली, साहजिकच नाटोच्या लष्करी बळावर होणारा खर्च अनाठायी होत असल्याची भावना सभासद राष्ट्रांत बळावू लागली. शिवाय सभासद राष्ट्रातील अंतर्गत मतभेद चव्हाट्यावर येऊ लागल्याने संघटनेच्या ऐक्याला तडा जाऊ लागला. पुढील काळात अनेक कारणांमुळे शीतयुद्ध ओसरण्याची चिन्हे दिसू लागली. याचे महत्त्वाचे कारण अर्थातच स्टॅलिनच्या मृत्यूनंतर रशियाचे बदललेले धोरण, आणि अण्वस्त्रधारी राष्ट्रांची वाढती संख्या हे होय. शस्त्रास्त्रांच्या सामर्थ्यावर आधारलेली नाटो संघटना प्रत्येक सभासद राष्ट्रावर अमेरिकेकडून मर्यादा घालीत आहे, अशी भावना त्यांच्यात निर्माण झाली. युरोपातील फ्रान्ससारख्या राष्ट्रांनी रशियाशी राजनैतिक संबंध प्रस्थापित करण्याचे ठरवले, चीनशीही फ्रान्सने संबंध प्रस्थापित केले. पश्चिम जर्मनी व अमेरिका संबंध जसजसे जास्त बळकट होऊ लागले, तसतसा फ्रान्सचा जर्मनीविषयी असलेला पूर्वापार द्वेष उफाळून आला व फ्रान्स अमेरिकेपासून दूर चालला. थोडक्यात संयुक्त हितसंबंध, सामुदायिक सुरक्षितता अशा ज्या कल्पनेवर नाटो उभी राहिली, ती उपयुक्तता संपुष्टात येऊ लागली. विशेषतः अमेरिका-रशिया संबंध सुधारले, अमेरिका-चीन संबंध प्रस्थापित झाले त्यामुळे दुसऱ्या महायुद्धानंतरच्या दहा-बारा वर्षात ज्या अटीतटीने शीतयुद्ध लढले जात होते, ती तीव्रता सन १९७०-७५ च्या दरम्यान राहिली नाही. तिचे लष्करी महत्त्व कमी झाल्यामुळे आणि वैयक्तिक हितसंबंध स्वसामर्थ्यावर उभे करण्याची कल्पना सर्वमान्य झाल्याने नाटोला आपले उद्दिष्ट बदलावे लागले. सन १९८० नंतर नाटो संघटना लष्करी स्वरुपाची राहिलीच नाही. सोव्हिएट रशियाच्या विघटनानंतर अमेरिका ही एकमेव महासत्ता आंतरराष्ट्रीय राजकारणात राहिली, त्यामुळे नाटो संघटना विसर्जित करायला हवी होती, परंतु अमेरिकेने अट्टाहासाने नाटो संघटना चालू ठेवली आहे, अर्थात आंतरराष्ट्रीय पातळीवर तिचे अस्तित्व दखल घेण्याजोगे राहीले नाही.

**५. नाटोची कामगिरी:-**

स्थापनेनंतरच्या १५ ते २० वर्षात नाटोने महत्त्वाची कामगिरी बजावली. नाटो हे शांतता प्रस्थापनेचे एक उत्तम साधन राहिल्याने युरोपात शांतता राहिली. सन १९४९ पासून साम्यवाद्यांनी कोणताही नवा प्रदेश आपल्या ताब्यात आणला नाही, हे केवळ नाटोमुळे घडले. पश्चिम युरोप व अॅटलांटिक क्षेत्र या भागातील प्रादेशिक परिस्थिती नाटोने 'जैसे थे' ठेवली. नाटोची स्थापना झाल्यापासून साम्यवादी पक्षाच्या दहशतवादी कृत्यांना आळा बसला. मार्शल योजनेमुळे युरोपीय देशांचा आर्थिक विकास झपाट्याने झाल्यामुळे साम्यवादाचे आकर्षण हळूहळू कमी झाले. त्याचे प्रत्यंतर त्यानंतर झालेल्या सार्वत्रिक निवडणुकात साम्यवादी पक्षाला मिळालेल्या मतांमध्ये लक्षणीय घट झाल्यानंतर दिसले. नाटो सभासद राष्ट्रांत साम्यवादी पक्ष मृतप्राय झाला, असे म्हणणे फारसे चुकीचे होणार नाही.

नाटो सभासद राष्ट्रांत युद्धविषयक तयारीत विलक्षण वाढ झाली. सन १९४९ साली नाटोची भूसेना फक्त १२ डिव्हिजन होती, सन १९६० मध्ये ती १०० डिव्हिजनहून जास्त झाली. सन १९४९ मध्ये नाटोजवळ सुमारे ४०० विमाने होती, सन १९५५ मध्ये विमानांची संख्या ६००० इतकी वाढली, नौदलात ३० टक्केवाढ झाली. नाटोजवळ अत्याधुनिक शस्त्रे, आधुनिक तंत्रज्ञान, तिन्ही दलांत योग्य समन्वय साधणारी समर्थ

प्रशासन यंत्रणा इत्यादी गोष्टी होत्या, नाटोने सभासदांतील प्रारंभीचे संशयाचे व मतभेदाचे वातावरण नष्ट करून त्या सर्वांना व्यावहारिक पातळीवर एकत्र आणले व त्यांच्यात परिणामकारक सहकार्य वाढीस लावले. या सहकार्यातून 'पश्चिम युरोपीय संघ' (Western European Union - WEP) निर्माण झाला.

**६. नाटोच्या कार्याचे मूल्यमापन :–**

नाटो हे रशियाच्या साम्यवादी विस्तारास आळा घालण्यासाठी अमेरिकेने उचललेले एक महत्त्वाचे पाऊल होय. रशियन आक्रमणास तोंड देण्यासाठी केवळ आर्थिक उपाययोजना पुरेशी नव्हती म्हणून अमेरिकेने मार्शल योजनेपाठोपाठ नाटोच्या लष्करी संघटनेची स्थापना केली. नाटो स्थापन करण्यात जागतिक शांतता व सुरक्षितता टिकवणे हाच उद्देश अमेरिकेचा आहे असे वारंवार अमेरिकेच्या वतीने सांगण्यात येत होते. हे जर खरे मानले तर संयुक्त राष्ट्रसंघाचे प्रयोजन काय असा प्रश्न पडतो. नाटो संघटना युनोच्या तत्त्वाशी विसंगत आहे. युनोच्याच कार्यासाठी वेगळी संघटना स्थापन करण्याची गरज नव्हती, आंतरराष्ट्रीय शांतता, स्वातंत्र्य व लोकशाहीं रक्षणासाठी अमेरिका युनोचे हात बळकट करू शकली असती. परंतु अमेरिकेला युनोची प्रतिष्ठा कमी करावयाची होती असेच मानले जाते.

नाटोमुळे रशिया-अमेरिका संघर्ष तीव्र झाला. नाटोमुळे शीतयुद्धाची तिव्रता वाढली. नाटोवर रशियाने अत्यंत कठोर टीका केली. नाटोद्वारे अमेरिकेने आपल्या बाजूस जास्तीत जास्त राष्ट्रे गोळा करून रशियास त्रास देण्याचेच धोरण ठेवले, अशी रशिया टीका करीत होता. 'नाटो प्रकल्प म्हणजे इंग्लंड-अमेरिकेने जागतिक श्रेष्ठत्वासाठी केलेली पूर्वतयारी होय. या कराराच्या आधारे अँग्लो-अमेरिकन जगतातील राष्ट्रांना स्वतंत्र परराष्ट्र धोरण अथवा गृहधोरण ठरविण्याची संधी न देता आपल्या जागतिक प्रभुत्वास सहाय्यभूत ठरेल असेच त्यांना वागावावयाचे आहे.' अशी रशियन वृत्तपत्रांनी टीका केली.

रशिया-अमेरिकेच्या संघर्षात दयनीय अवस्था अशा राष्ट्रांची झाली की ज्यांनी रशियन प्रभावापुढे मान झुकवली नाही की नाटोचे सभासदत्वही मिळाले नाही. रशिया-अमेरिकेच्या गटापैकी कोणत्याही गटात सामील न होता, तिसरा गट निर्माण होण्याची याचवेळी गरज भासू लागली. (या जाणिवेतूनच लवकरच नेहरू-नासर-टिटो यांच्या नेतृत्त्वाखाली अलिप्त राष्ट्राची संघटना स्थापन होऊन तिसरी शक्ती निर्माण झाली.)

पश्चिम युरोपात अमेरिकेचा प्रभाव वाढल्याने, रशियाने आपली दृष्टी मध्यपूर्व व अतिपूर्व या भागांकडे वळवली. अमेरिकेनेही या भागातील रशियन प्रभाव रोखण्यासाठी आपला मोर्चा आग्नेय आशियाकडे वळवला. यातूनच 'अग्नेय आशिया करार संघटना'- सीटोंची स्थापना झाली.

नाटो संघटना नावापुरती अॅटलांटिक क्षेत्रातील आहे. ती एक लष्करी संघटना आहे. शांतता हे तिचे उद्दिष्ट नाही. शस्त्रास्त्र स्पर्धा करण्याच्या धोरणात सर्व संबंधित राष्ट्रांना एकत्र आणून 'शीतयुद्ध' तीव्र करणे हेच नाटो आपले कर्तव्य मानते. अशीही टीका रशियाने केली आहे. नाटो ही एक लष्करी संघटना आहे या टीकेत बराच तथ्यांश आहे. कारण नाटोच्या स्थापनेपासून १० वर्षात सभासद राष्ट्रांचे प्रतिनिधी अनेक वेळा एकत्र आले, आणि त्यांनी संघटनेला लष्करी सामर्थ्याची आत्यंतिक गरज आहे असे दाखवून सेनेच्या तिन्ही दलांत भरमसाठ वाढ केली.

भारताचे तत्कालीन पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनी नाटो भारतावर काही परिणाम करीत असल्याचे अमान्य केले. नाटोच्या कारवायांची फारशी दखल घेण्याची जरूरी नाही, असे सांगून ते म्हणतात, ''आक्रमणाला तोंड देण्यासाठी स्वसंरक्षणावर आधारित असे करार करायला काही हरकत नाही. प्रत्येक देशाला तसा अधिकार आहेच. पण भौगोलिकदृष्ट्या अशा करारांचा विस्तार होतो, त्यास माझा विरोध आहे.'' 'नाटो'चा तुर्कस्थान व ग्रीस देशांचा अॅटलांटिक क्षेत्राशी कसा संबंध पोहचतो, याहीपेक्षा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे अॅटलांटिक क्षेत्रांतील सत्तांच्या वसाहती, करार करून टिकवणे हे अयोग्य आहे. अर्थात प्रत्यक्ष करारात तसे दिसत नाही, पण ज्या ज्यावेळी सभासद राष्ट्रांच्या बैठका झाल्या, त्या त्यावेळी वसाहतींवरील प्रभुत्व टिकवून ठेवण्याचा प्रश्न चर्चेला आल्याचे दिसते. शिवाय युनोच्या मूलभूत तत्त्वाच्या विरोधी अशी नाटोची भूमिका असल्याचे जाणवते.

आपली प्रतिष्ठा व महासत्ता म्हणून स्थान उंचाविण्यासाठी अमेरिकेने या संघटनेचा उपयोग करून घेतला. नाटो ही संघटना संयुक्त राष्ट्रसंघाच्या तत्वांशी विसंगत आहे. अमेरिकेने संयुक्त राष्ट्रसंघाला डावलून नाटोची स्थापना केली. त्यामुळे संयुक्त राष्ट्रसंघाचे महत्व कमी झाले. नाटोच्या स्थापनेपासून रशिया व अमेरिका यांच्यातील संघर्ष तीव्र झाला. रशिया व अमेरिका यांच्या गटात सहभागी न झालेल्या राष्ट्रांनी आपला तिसरा गट निर्माण केला. नाटोमुळे शस्त्रास्त्र वाढीला चालना मिळाली. नाटोच्या माध्यमातून अमेरिकेने आपली दादागिरी जगावर लादण्याचा प्रयत्न केला.

२.२.२ **सेंटो:** (Central Treaty Organization-CENTO)

नाटो संघटना अस्तित्वात आल्यापासून अमेरिका मध्यपूर्वेत एखादी संरक्षक संघटना स्थापन करण्याचा विचार करीत होती. सन १९५४ च्या शेवटी अमेरिका व पाश्चात्य सत्ता यांचा पाठिंबा असलेल्या इराकच्या नुरी-अल-सैदने इजिप्तच्या नासरबरोबर सामुदायिक सुरक्षितता पध्दतीवर चर्चा केली. मात्र नासरकडून योग्य प्रतिसाद न मिळाल्याने त्याने तुर्कस्थानबरोबर चर्चा करून २४ फेब्रुवारी, १९५५ रोजी बगदाद करार केला. हा करार करताना ज्या राष्ट्रांना मध्यपूर्व विभागात शांतता व सुरक्षितता निर्माण व्हावी असे वाटते त्यांना बगदाद करारात सामील होता येईल, अशी तरतूद ठेवली. त्यामुळेच २४ एप्रिल, १९५५ ला इंग्लंड, १ जुलै, १९५५ ला पाकिस्तान व ३ नोव्हेंबर, १९५५ ला इराण या करारात सामिल झाले. त्यामुळे २४ ऑगस्ट, १९५९ रोजी कराराचे नाव बदलून सेंटो (Central Treaty Organization-CENTO) असे देण्यात आले.

**कामकाज पध्दती :-**

हा करार पाच वर्षांसाठी करण्यात आला होता. दर पाच वर्षांनी पुढील पाच वर्षांसाठी नुतनीकरण करण्यात येणार होते. त्याचे कार्यालय बगदाद येथे केले होते. परंतु इराकमध्ये क्रांती झाल्याने अंकारा, तेहरान, करायी इत्यादी ठिकाणी बैठका होवू लागल्या.

**कलमे:-**

या करारात एकूण आठ कलमे आहेत. त्यापैकी काही महत्वाची कलमे पुढीलप्रमाणे:-

(अ) संरक्षण व सुरक्षितता यांबाबतीत परस्पर सहकार्य करणे.

(ब) सुरक्षिततेची उद्दिष्टे सफल करण्यासाठी योग्य ती उपाययोजना करणे.

(क) सभासद राष्ट्रांनी परस्परांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करू नये.

(ड) परस्परांतील वाद अथवा तंटे शांततामय मार्गाने सोडविणे.

(इ) सभासद राष्ट्रांनी युनोच्या सनदेवर पूर्ण निष्ठा ठेवून कार्य करणे.

४. **कामगिरी:-**

सेंटोच्या स्थापनेपासून ते सन १९६० पर्यंत ही संघटना प्रभावी राहिली. या काळातील तिच्या कामगिरीचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल. सेंटोच्या कार्यकारिणीची पहिली बैठक २१, २२ नोव्हेंबर, १९५५ रोजी कादाद येथे घेण्यात आली. या बैठकीत एक लष्करी समिती स्थापन करण्याचे ठरले. आर्थिक विकासासाठी एक आर्थिक समितीही स्थापन करण्यात आली. बगदाद येथे अणुशक्ती केंद्र उभे करण्याचे ठरले. या संघटनेची दुसरी बैठक एप्रिल १९५६ मध्ये तेहरान येथे झाली. त्या बैठकीत अमेरिकेने या करारातील राष्ट्रांना आर्थिक व लष्करी मदत करण्याची जबाबदारी घेतली. जानेवारी १९५७ मध्ये कराची येथे तिसऱ्या बैठकीचे आयोजन करण्यात आले. या दरम्यान सुएझ कालवा पेचप्रसंगाने उग्र रूप धारण केले होते. त्यामुळे बैठक झाली नाही. ५ ते ८ नोव्हेंबर, १९५६ या कालावधीत तेहरान येथे तातडीची बैठक घेवून इंग्लंड व फ्रान्स यांना शस्त्रास्त्रांचा संघर्ष थांबवून इजिप्तचे सार्वभौमत्व मान्य करण्याचे आवाहन करण्यात आले. १९ व २० जानेवारी, १९५७ रोजी संघटनेची चौथी बैठक अंकारा येथे पार पडली. या बैठकीत आयसेनहॉवर सिध्दांताला पाठिंबा दिला. या बैठकीत मध्यपूर्वेत आर्थिक व लष्करी मदत देण्याविषयी चर्चा झाली. २७ जानेवारी, १९५८ रोजी अंकारा या ठिकाणी पुन्हा पाचवी बैठक घेतली. अमेरिकेला क्षेपणास्त्रांचा तळ मध्यपूर्वेत निर्माण करावयाचा होता. त्याविषयावर गंभीर चर्चा झाली. मध्यपूर्वेत तेलाचे प्रचंड साठे होते. तेल उत्पादक राष्ट्रे आर्थिक व लष्करीदृष्ट्या मागासलेली होती. ही राष्ट्रे साम्यवादाला बळी पडू नयेत. म्हणून अमेरिकेने हा करार घडवून आणला होता. मात्र अनेक कारणांनी ही संघटना आपल्या अंगीकृत कार्यात यशस्वी ठरली नाही, अथवा उल्लेखनीय कामगिरी करू शकली नाही.

**सेंटोवरील प्रतिक्रिया:-**

इराक अरब संघात असूनही त्याने 'सेंटो' मध्ये सामील झाल्याने अरब गणराज्यांकडून प्रखर विरोध झाला. इराकला अरब संघातून फोडून काढण्याचे डावपेच अमेरिका व पाश्चिमात्य राष्ट्रांनी अवलंबल्यामुळे, अरब संघ साहजिकपणे सोव्हिएट रशियाच्या बाजूला झुकला. जॉर्डन 'सेंटो'त सामील व्हावा म्हणून इंग्लंडने जंगजंग पछाडले, परंतु त्यास यश आले नाही. हा इंग्लंडचा राजनैतिक पराभव होता. इंग्लंडने सेंटोचे अनेक

प्रकारे समर्थन केले. मार्च १९५६ मध्ये इंग्लंडचे परराष्ट्रमंत्री सेल्विन लॉईड भारत भेटीवर आले असता 'सेंटो करारामुळे मध्यपूर्वेतील स्थैर्याचा आणि सुरक्षिततेचा पाया घातला' असे मत व्यक्त केले. त्यावेळी पत्रकारांनी, 'सेंटोमुळे भारताची सुरक्षितता धोक्यात आली' या गोष्टीकडे त्यांचे लक्ष वेधले. तेव्हा हा करार उत्तराभिमुखी आहे, पूर्वाभिमुखी नाही, असे उद्गार काढले. हा करार भारताविरुद्ध नसून रशियाविरुद्ध आहे, असे लॉईड यांनी स्पष्टपणे सांगितले. अमेरिकेच्या सर फॉस्टर डल्लेस या परराष्ट्रमंत्र्यानेही 'या करारामुळे भारताने घाबरण्याची गरज नाही' असे सांगितले. 'यदाकदाचित पाकिस्तानने भारतावर आक्रमण केलेच तर अमेरिका पाकिस्तानविरुद्ध लढेल' असे त्यांनी जाहीरपणे सांगितले. इंग्लंड-अमेरिकेची सेन्टो करारापासून भारताला धोका नसल्याची ग्वाही देऊनही भारताने या करारास विरोध केला. पं. जवाहरलाल नेहरू म्हणाले, 'सेंटो व सीटो' करारामुळे भारतावर निश्चित परिणाम झाला आहे. त्यांनी (करारांनी) भारत दोन्ही तिन्ही बाजूंनी वेढला गेल्यामुळे धोक्याची टांगती तलवार भारताच्या डोक्यावर सतत आहे.' सीटोमुळे शीतयुद्धाची धग भारताला जाणवू लागली होतीच, आता सेंटोमुळे शीतयुद्धाच्या ज्वाळा भारताला प्रखरपणे जाणवू लागल्या.

इजिप्तचे अध्यक्ष नासर यांनीही सेंटोविरुद्ध तिखट शद्वात टीका केली, 'मध्यपूर्वेतील संरक्षणाशी संबंध त्या भागातील देशांचाच आहे. आम्ही त्यासाठी कोण्या एका देशाचे अथवा राष्ट्रगटाचे पालकत्व मानणार नाही. आम्ही आमच्या शस्त्रसज्ज सेनेच्या साहाय्याने आमच्या स्वातंत्र्याचे रक्षण करण्याचा दृढ निश्चय केला आहे,' असे उद्गार काढून त्यांनी इजिप्त, सौदी अरेबिया व सिरिया यांचा परस्पर संरक्षण करार घडवून आणला. रशियानेही ज्या आक्रमक राष्ट्रांना आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता याविषयी खरी आस्था नाही, अशांच्या हातातील 'सेंटो' हे एक साधन आहे, 'सेंटो'च्या आधाराने त्यांना नव्या वसाहतीच निर्माण करायच्या आहेत, अशी सेंटोवर टीका केली.

'बगदाद करार' घडवून आणण्यात पुढाकार घेणाऱ्या इराकच्या नूरी-एल-सैद विरुद्ध जनमत या करारामुळे खवळले, कारण जनतेला हा करार पसंत नव्हता. या करारामुळे इराकची तेल क्षेत्रे अमेरिका-इंग्लंडच्या ताब्यात गेली व इराकी जनता दारिद्र्याच्या फेऱ्यात सापडली, जनतेने या कराराविरुद्ध मोर्चे, निदर्शने केली. शेवटी सेंटो कराराविरुद्ध जनमत इतके तापले की इराकला सन १९५९ मध्ये सेंटोचे सभासदत्व सोडून देणे भाग पडले. इराकने सेंटोतून बाहेर पडल्यामुळे ही संघटना कमकुवत झाली. सेंटोमधील इंग्लंड-अमेरिकेचे वर्चस्व मध्यपूर्वेतील राष्ट्रांना सहन होणे शक्यच नव्हते. अमेरिकेने सेंटोराष्ट्रात क्षेपणास्त्रांचा तळ उभारण्याची योजना आखली. सेंटोराष्ट्रांचे संयुक्त सेनादल उभारण्याचा प्रस्ताव मांडला. परंतु भारतासारख्या अलिप्त राष्ट्रांच्या संघटनेने सेंटोतील पाकिस्तानवर अंतर्गत कारभारात हस्तक्षेप होत असल्याची टीका केली. अरब राष्ट्रांचा तर प्रथमपासून सेंटोस विरोध होता. रशियाने सेंटोवर असा आरोप केला की, 'अमेरिका रशियावर अण्वस्त्रांचा हल्ला करणार असल्याच्या गुप्त योजनेची कागदपत्रे आपणास सापडली आहेत'. या आरोपाचा सेंटोवर फारसा परिणाम झाला नाही, परंतु सन १९६० नंतरच्या दशकात सेंटो विशेष प्रभावी राहिली नाही. पुढे अरब-इस्राएल संघर्षात सेंटोराष्ट्रे फुटून ती अरब एकतेच्या बाजूने उभी राहिली. याउलट अमेरिकेने इस्राएलचा पाठपुरावा केल्यामुळे सेंटोचा आधार तुटल्यासारखा झाला.

**५. बदलते स्वरूप:-**

इराक या करारातून सन १९५९ मध्ये बाहेर पडला, त्यामुळे ही संघटना कमकुवत झाली. अमेरिकेने सेंटो राष्ट्रांमध्ये संयुक्त लष्कर उभारण्याचा प्रस्ताव मांडला तसेच क्षेपणास्त्र तळ उभारण्याचाही प्रयत्न केला. परंतु त्यात यश आले नाही. अरब-इस्त्रायल संघर्षात अमेरिका इस्त्रायलच्या पाठिशी उभी राहीली व अरब राष्ट्रे अरब एकतेच्या बाजूने उभी राहिली. परिणामी सेंटो संघटना कमकुवत होत गेली. सन १९६० नंतर सेंटो फारशी प्रभावी राहिली नाही. सन १९७९ मध्ये इराण, पाकिस्तान व तुर्कस्थान ही राष्ट्रे या संघटनेतून बाहेर पडली. काळाच्या ओघात सेंटो इतिहासात जमा झाली.

**२.२.३ अँझ्युस करार:** (Australia-NewZealand-United States-ANZUS)

चीनमध्ये १९४९ साली साम्यवादी क्रांती घडून आली. तिबेटसुध्दा साम्यवादाच्या वर्चस्वाखाली गेले. उत्तर कोरिया व उत्तर व्हिएतनाम या भागांत साम्यवादाचा प्रसार झाला. आग्नेय आशियात झपाट्याने साम्यवादाचा होत असलेला प्रसार अमेरिकेच्या चिंतेचा विषय बनला. जपान पुन्हा सामर्थ्यशाली होवू लागल्याने जपानी लष्करवादाचा धोका व साम्यवादाच्या प्रसाराने ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड ही राष्ट्रे अस्वस्थ झाली होती. इंडोचायनातही साम्यवादाच्या प्रसाराची भिती निर्माण झाल्याने ती राष्ट्रे अस्वस्थ झाली होती. अमेरिकेला त्यांच्या संरक्षणाची तजवीज करणे आवश्यक होते.

**१. अँझ्युस कराराची निर्मिती:**

वरील पार्श्वभूमीमुळे अमेरिकेला साम्यवाद रोखण्यासाठी आग्नेय आशियातील या राष्ट्रांशी स्वतंत्र करार करणे आवश्यक वाटले. अमेरिकेचे नेते या विभागात जबाबदारी स्वीकारण्याबाबतीत साशंक होते. तरीसुध्दा अमेरिकेस साम्यवादाला रोखण्यासाठी एखादा करार करणे आवश्यक होते.

त्यानुसार ऑस्ट्रेलिया-न्यूझीलँड-अमेरिका या राष्ट्रांनी ऑस्ट्रेलिया खंडाच्या सुरक्षिततेसाठी प्रादेशिक पातळीवर केलेला हा संरक्षक करार १२ जुलै, १९५१ रोजी घडून आला. चीनमधील साम्यवाद्यांचा विजय, कोरियन युद्धाचा भडका व जपानचा संभाव्य लष्करवाद या संकटांना तोंड देण्यासाठी 'अँझ्यूस' (ANZUS) ही करार संघटना जन्माला आली. अँन्झ्यूस सभासद राष्ट्रांनी युनोवर पूर्ण विश्वास व्यक्त करून युनोशी सहकार्य करण्याची भूमिका स्वीकारली. अँझ्यूस करारात इंग्लडला सामील न करून घेतल्यामुळे तो काहीसा नाराज झाला, कारण आतापर्यंत अमेरिकाप्रणीत सर्व करारांमध्ये इंग्लंड सामील होते. त्यामुळे अमेरिका-इंग्लंड संबंधात किंचितसा दुरावा निर्माण झाला. अँझ्यूस कराराच्या मर्यादित कार्यक्षेत्रामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर या करारास कोणी फारसे महत्त्व दिले नाही.

**करारातील कलमे:-**

एका बाजूला अमेरिका व दुसऱ्या बाजूला ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड यांच्यात झालेला हा करार अनिर्णित काळापर्यंत राहणार होता. त्यानुसार

(अ) आपापसातील तंटे शांततेच्या मार्गाने सोडविणे.

(ब) परस्पर सहकार्य व मदत याद्वारे संबंधित राष्ट्रांची संरक्षण शक्ती वाढविणे.

(क) पॅसिफिक क्षेत्रात कोणत्याही राष्ट्रास धोकादायक स्थिती निर्माण झाल्यास परस्परांशी सल्लामसलत करावी.

(ड) पॅसिफिक क्षेत्रात इतरत्र लढा सुरू झाल्यास त्यापासून आपल्या शांतता व सुरक्षिततेला धोका आहे असे समजले जावे.

(इ) घटनात्मक मार्गाने समान धोक्यास तोंड देणे.

(फ) करारातील कोणत्याही एका राष्ट्रावर सशस्त्र हल्ला झाल्यास पॅसिफिक बेटावरील सैन्य व विमान यावर हल्ला झाला आहे असे समजले जाईल.

वरील कलमांबरोबर कराराच्या सभासद राष्ट्रांनी संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेवर पूर्ण विश्वास व्यक्त करून त्या संघटनेशी पूर्ण सहकार्य करण्याचे ठरविले. या कराराच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याकरिता सदस्य राष्ट्रांचे परराष्ट्र मंत्री किंवा त्यांचे प्रतिनिधी यांचे एक कौन्सिल प्रस्थापित करण्यात आले.

**३. करारावरील प्रतिक्रिया :–**

या करारापूर्वी अमेरिकेने पुढाकार घेवून केलेल्या सर्व करारांमध्ये इंग्लंड सामील होते. मात्र या करारात इलंडला सहभागी करून घेतले नाही. त्यामुळे इंग्लंड नाराज झाले. इंग्लंड व अमेरिका यांच्या संबंधात काही काळ दुरावा निर्माण झाला. या कराराच्या मर्यादित कार्यक्षेत्रामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर या करारास कोणी फारसे महत्व दिले नाही. पंडीत जवाहरलाल नेहरूंनी ही संघटना फारशी उपयोगी ठरणार नाही, असे म्हटले होते. अमेरिकेने पॅसिफिक क्षेत्रात वर्चस्वासाठी चालविलेले प्रयत्न पाहून रशियाने चीनबरोबर परस्पर सहकार्य व मैत्रीचा तीस वर्षांचा करार केला. रशिया व चीनचा करार प्रामुख्याने जपानच्या सहकार्याने एखाद्या देशांनी आक्रमण केल्यास परस्परांना मदत देण्यावर आधारलेला होता.

**४. कराराच्या बैठका:–**

हा करार झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी करण्यासाठी काही बैठका घेवून महत्वपूर्ण निर्णय घेतले गेले. कराराची पहिली बैठक ४ ते ६ ऑगस्ट, १९५२ या दरम्यान हवाई येथे पार पडली. पॅसिफिक क्षेत्रातील सामुदायिक सुरक्षितता व इतर राज्यांबरोबर त्यासाठी सहकार्य इत्यादी बाबतीत चर्चा करून निर्णय घेतले गेले. सभासद राष्ट्रांची एक लष्करी समिती स्थापन करण्यात आली. या कराराच्या निर्मितीपासून पुढील दहा वर्षात तिन्ही देशांनी एकात्मता साधली. सेंटो या संघटनेशी सहकार्य प्रस्थापित केले. दुसरी महत्वाची बैठक ५ ते ६ जून, १९६३ दरम्यान वेलिंग्टन येथे झाली. या बैठकीत संरक्षणात्मक प्रगतीचा आढावा घेतला गेला. भारतावरील चीनच्या आक्रमणाचा गांभीर्याने विचार करण्यात आला. सन १९६७ पर्यंत या कराराच्या नियमित बैठका होत राहिल्या.

### ५. कराराचे बदलते स्वरूप:–

रशिया अथवा चीनचे पॅसिफिक क्षेत्रात वर्चस्व वाढू नये यासाठी अमेरिकेने अँझ्युस कराराच्या माध्यमातून तरतूद केली. अमेरिकेला काही काळ त्यात चांगले यश मिळाले. परंतु शीतयुध्द ओसरू लागताच या कराराचे महत्व कमी झाले. न्यूझीलंडने १९८४ साली अमेरिकेच्या परमाणू जहाजाच्या प्रवासाला आपल्या बंदरात विरोध केला. त्यानंतर न्यूझीलंडने रशिया व चीनकडे आपण झुकणार नाही, शिवाय वार्सा करार संपुष्टात आल्याने अँझ्युस करारसुध्दा संपला आहे असे स्पष्ट केले.

## २.२.४ **वॉर्सा करार** (Warsaw Pact)

साम्यवादी विचारसरणीचा प्रसार होवू नये यासाठी अमेरिकेने रशियाविरोधी करारांची भक्कम मालिका तयार केली होती. या रशियाविरोधी करारांवर रशियाची प्रतिक्रिया उमटणे स्वाभाविक होते. रशियानेसुध्दा साम्यवादाचा प्रसार करण्यासाठी व अमेरिकन योजना अयशस्वी ठरविण्यासाठी प्रयत्न केले होते. चीन या पूर्वेकडील देशाची रशियाला साथ मिळत होती. अमेरिकाप्रणित करारांना शह देण्यासाठी रशियाने पूर्व युरोपातील देशांबरोबर १५–२० द्वीपक्षीय छोटे–मोठे करार घडवून आणले होते. कॉमिन्फॉर्म व कॉमेकॉन या दोन व्यापक करारांच्या माध्यमातून पूर्व युरोपातील राष्ट्रांमधून आर्थिक व तात्विक सहकार्याची भावना रशियाने निर्माण केली होती.

### १. कराराची निर्मिती:–

अमेरिकेच्या प्रेरणेने पश्चिम युरोपात घडत असलेल्या घटनांचा विचार करण्यासाठी सोव्हिएट रशियाने डिसेंबर १९५४ मध्ये हंगेरी, झेकोस्लोव्हाकिया, अल्बानिया, बल्गेरिया, पूर्व जर्मनी, पोलंड, रुमानिया आणि सोव्हिएट रशिया अशा आठ राष्ट्रांची एक परिषद मॉस्कोमध्ये बोलावली. लाल चीन या बैठकीस निरीक्षक म्हणून उपस्थित होता. या बैठकीत युरोपातील अमेरिकेच्या वाढत्या प्रभावाचा विचार करून आठ राष्ट्रांच्या संयुक्त संरक्षक पद्धतीवर विचार करण्यासाठी पुन्हा एकत्र येण्याचे ठरविले. या आठ राष्ट्रांची एकत्रित बैठक पोलंडची राजधानी वॉर्सा येथे ११ ते १४ मे, १९५५ रोजी भरली. बैठकीत दीर्घ चर्चा होऊन आठ राष्ट्रांमध्ये 'मैत्री, सहकार्य व परस्पर मदतीचा करार' (Treaty of Friendship, Co-operation and Mutual Assistance) करण्यात येऊन सभासद राष्ट्रांचे संयुक्त सेनादल उभारण्याचे ठरले. या करारास 'वॉर्सा करार' (Warsaw Pact) असे संबोधण्यात येते.

वॉर्सा करारानुसार संयुक्त सेनादल स्थापन करण्यात येऊन सेनादल प्रमुख म्हणून रशियाच्या मार्शल आय. एस. कोनिव्ह यांची नियुक्ती करण्यात आली. उपसेनाप्रमुखपदी ज्या राष्ट्रांची सेना संयुक्त सेनादलात होती त्या देशाचा उपसेनाप्रमुख वा संरक्षणमंत्री यांची नियुक्ती करण्यात आली. प्रमुख कार्यालय मॉस्कोमध्ये ठेवण्यात येऊन परिस्थितीनुसार सल्लामसलतीसाठी योग्य असे ठिकाण निवडण्याचे ठरले. संयुक्त सेनादलातून पूर्व युरोपला बाजूला ठेवण्यात आले होते.

**२. करारातील कलमे :–**

युनोच्या सनदेतील ध्येये व उद्दिष्टे यावर आधारलेला 'वॉर्सा करार'आहे, असे सभासद राष्ट्रांनी जाहीर केले. सभासद राष्ट्रे मैत्री, सहकार्य व परस्पर मदत देण्यास बांधली गेली असून, प्रत्येक राष्ट्रांचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व अबाधित असल्याचे मान्य करण्यात आले. सभासद राष्ट्रांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप केला जाणार नाही, अशी करारात ग्वाही देण्यात आली. करारातील प्रमुख कलमे पुढीलप्रमाणे

१) परस्परांतील वाद तडजोडीच्या व शांततेच्या मार्गांनी सोडविले जातील.

२) आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता यासाठी सभासद राष्ट्रे सतत परस्पर सहकार्य करतील.

३) सामुदायिक सुरक्षिततेच्या तत्त्वानुसार सर्व राष्ट्रे कार्यरत राहतील.

४) संयुक्त सेनादल उभारले जाईल.

५) करारामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांच्या विचारासाठी 'राजकीय सल्लामसलत समिती' स्थापन करून कराराच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आवश्यक वाटतील तितक्या घटक समित्या स्थापन करण्यात येतील.

६) वॉर्सा करारातील विसंगत विरोधी करार वा तह केले जाणार नाहीत.

७) सभासद राष्ट्रांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप केला जाणार नाही.

८) परस्परांमध्ये आर्थिक व सांस्कृतिक सहकार्य केले जाईल.

९) कोणत्याही प्रशासन व समाजव्यवस्था असलेल्या राष्ट्रास करारात सामील होता येईल, फक्त त्याने आंतरराष्ट्रीय शांतता व सुव्यवस्था टिकविण्याचे बंधन पाळले पाहिजे.

१०) करार २० वर्षासाठी असून, मुदतीपूर्वी एखाद्या राष्ट्रास बाहेर पडावयाचे झाल्यास तशी आगावू नोटीस १ वर्ष अगोदर दिली पाहिजे. अन्यथा पुढील काळासाठी हा करार सर्वांना लागू राहील.

११) दरम्यानच्या काळात सामुदायिक सुरक्षा व्यवस्था करणारा अन्य एखादा करार केला गेल्यास व त्यावर वॉर्सा करारातील राष्ट्रांनी स्वाक्षऱ्या केल्यास, वॉर्सा करार आपोआप संपुष्टात येईल.

हा करार २० वर्षांसाठी होता. मात्र सामुदायिक सुरक्षा व्यवस्थेसाठी एखादा नवा करार झाल्यास व वॉर्सा करारातील सभासद राष्ट्रांनी त्यावर सह्या केल्यास वॉर्सा करार संपुष्टात येणार होता.

**३. वॉर्सा कराराची कामगिरी :–**

वॉर्सा करारातील राष्ट्रात विनाविलंब विचारविनिमय करणे शक्य व्हावे यासाठी एका समितीची निर्मिती करण्यात आली. सर्व सदस्य राष्ट्रांचे प्रतिनिधी या समितीवर सदस्य होते. गरजेनुसार अन्य संघटना स्थापन करण्याचा अधिकार त्या समितीला होता. रशियाने हंगेरीत सैन्य घुसविले व कराराचा भंग करूनच या कराराच्या कार्यवाहीची सुरवात झाली. सन १९५६ मध्ये रशियाने हंगेरीत सैन्य घुसवून तेथील स्वातंत्र्यबंदी

उठाव दडपून टाकला. या चळवळीने आंतरराष्ट्रीय शांततेला धोका पोहोचण्याची शक्यता होती. त्यामुळे रशियाच्या या कारवाईने आंतरराष्ट्रीय जनमत रशियाच्या विरोधात गेले. या करारातील राष्ट्रांवर रशियाचे प्रचंड दडपण होते. चीन व उत्तर कोरिया सभासद नसतानाही या कराराच्या बैठकीला त्यांची रशियाशी सलगी असल्याने उपस्थित राहात होती. शिवाय त्यांच्या हस्तक्षेपाने रशियाच्या प्रभुत्वाला धार आली व सदस्य राष्ट्रे नाराज होवू लागली. वॉर्सा करारातील राष्ट्रांनी एकत्र येवून बर्लिन समस्येवर तोडगा सुचविला, मात्र तो मान्य झाला नाही. सन १९६० ते १९६७ या काळात वॉर्साच्या सेनादलाचे आधुनिकीकरण करून अत्याधुनिक शस्त्रास्त्रे पुरविण्यात आली. रशियात १९६४ साली कीसिंजर सत्तेवर आल्यानंतरसुध्दा पूर्वीचेच धोरण चालू राहिले. सन १९६५ मध्ये ब्रेझनेव्ह यांनी करारातील समस्यांवर विचार करण्यासाठी एक कायमस्वरूपी कृतीसमिती नियुक्त करण्यावर भर दिला. त्याचबरोबर संयुक्त सेनादलात रशियाऐवजी इतर सदस्य राष्ट्रांच्या सेनेवर जास्त जबाबदारी टाकण्यात आली. रशिया-चीन संबंध बिघडू लागल्यामुळे युरोपातील इतर वॉर्सा साथीदाराशी निकटतम स्नेहसंबंध जोडून साम्यवादी राष्ट्रांची राजकीय एकता व शिस्त टिकवण्यासाठी आर्थिक क्षेत्रात 'कॉमेकॉन'व 'सेमा' (Council of Economic Mutual Assistance- CEMA) जसे कार्य करीत होत्या, तसे कार्य लष्करी क्षेत्रात सुरू करण्यात आले.

**४. कराराचे बदलते स्वरूप व शेवट:-**

वॉर्सा करारातील राजकीय सल्लामसलत समितीची ४ जुलै ते ६ जुलै, १९६६ रोजी बुखारेस्ट येथे एक बैठक होवून वॉर्सा व नाटो या संघटना एकाचवेळी विसर्जित करून त्यांच्याऐवजी 'जर्मन शांतता तह' करण्यात यावा व त्याचबरोबर इतर काही महत्वपूर्ण सूचना शांततेसाठी करण्यात आल्या. अशा प्रकारची सूचना करून रशियाने अमेरिकेवर राजनैतिक विजय मिळविला. मात्र नाटोच्या बाजूने या सूचनेस प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे युरोपात शांतता प्रस्थापित करण्यात अपयश आले. १९९० साली रशियाने पूर्व युरोपातील देशांवरील आपले वर्चस्व मागे घेतले. त्यामुळे हे देश स्वतंत्र झाले. जून १९९० साली मास्को व वॉर्सा शिखर संमेलनात या कराराचा उद्देश संपला आहे असे जाहीर केले.फेब्रुवारी १९९१ साली या कराराच्या सर्व सदस्य राष्ट्रांनी हा करार संपुष्टात आल्याचे जाहीर केले.

शीतयुध्दाची सुरुवात तात्विक व वैचारिक संघर्षाने झाली होती. मात्र कालांतराने वैचारिक संघर्ष मागे पडून गटातटाचे राजकारण सुरू झाले. अमेरिकेने आपला गट प्रभावी व भक्कम करण्यासाठी नाटो, पश्चिम युरोपीय संघ, अमेरिकन राज्यसंघ, सेंटो, सीटो, अँझ्युस अशा लष्करी करारांची मालिका निर्माण केली. अमेरिकेला प्रत्युत्तर म्हणून रशियाने वार्सा करार व बाल्कन संघ अशा संघटना उभ्या केल्या. या दोन गटातील संघटनांमध्ये जगातील बहुतेक राष्ट्रे सामील झाली होती. सन १९७० पर्यंत शीतयुध्द प्रखर होते. भारत, इजिप्त व युगोस्लाव्हीयाचे नेते पं. नेहरू, नासेर व टिटो यांनी दोन्ही गटांपासून अलिप्त राहून अलिप्त राष्ट्रांची संघटना १९५५ साली निर्माण केली. पुढे अलिप्ततावादाचा वाढता प्रभाव पाहून दोन्ही महासत्तांना शीतयुध्दातून माघार घ्यावी असे वाटले. जागतिक लोकमतसुध्दा अमेरिका व रशिया यांच्या विरोधात जावू लागले. रशिया व चीन या साम्यवादी राष्ट्रांतील संघर्षाने साम्यवादी राष्ट्रगटांत फूट पडली. १९७३ साली अमेरिकेने चीनला मान्यता दिल्याने साम्यवाद व भांडवलशाही यांच्यातील तथाकथित वैचारीक संघर्ष संपुष्टात आला. त्यामुळे

राष्ट्रांचे गटतट करून आपला प्रभाव निर्माण करता येणार नाही याची महासत्तांना कल्पना आली. त्यातूनच लष्करी करारांचे व गटांचे विसर्जन घडून आले. त्याबरोबर शीतयुध्दही संपुष्टात आले.

## २.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

प्रश्न. १) अ) एका वाक्यात उत्तरे द्या.

१. नाटो करार घडवून आणण्यास कोणत्या देशाने पुढाकार घेतला?

२. सेंटो कराराचे कार्यक्षेत्र कोणते होते?

३. अँझ्युस करार कोणत्या वर्षी घडून आला?

४. वॉर्सा करार कोणत्या देशाच्या नेतृत्वाखाली करण्यात आला?

५. वॉर्सा करारातील संयुक्त सेनादलाचा पहिला सेनाप्रमुख कोण होता?

ब) योग्य पर्याय निवडून वाक्ये पूर्ण करा.

१. वॉर्सा करार ...........कालावधीसाठी करण्यात आला.

(अ) १५ वर्षे (ब) २० वर्षे (क) १० वर्षे (ड) २५ वर्षे

२. नाटोचे कार्यक्षेत्र ..............क्षेत्रात होते.

(अ) ॲटलांटिक (ब) पॅसिफिक (क) आशिया (ड) आफ्रिका

३. अँझ्युस करारात .............. हा देश नव्हता.

(अ) अमेरिका (ब) न्यूझीलंड (क) ऑस्ट्रेलिया (ड) भारत

४. अमेरिकाप्रणित ................या करारात इंग्लंड हा देश नव्हता.

(अ) नाटो (ब) सेंटो (क) अँझ्युस (ड) वॉर्सा

५. वॉर्सा कराराची निर्मिती ................या वर्षी झाली.

(अ) १९५३ (ब) १९५४ (क) १९५५ (ड) १९५६

उत्तरे

प्रश्न-१ अ) एका वाक्यात उत्तरे.

१. नाटो करार घडवून आणण्यात अमेरिकेने पुढाकार घेतला.

२. मध्यपूर्व आशिया हे सेंटो कराराचे कार्यक्षेत्र होते.

३. अँझ्युस करार-१९५१

४. वॉर्सा करार रशियाच्या नेतृत्वाखाली करण्यात आला.

५. वॉर्सा करारातील संयुक्त सेना दलाचा प्रमुख मार्शल आय. एस. कोनिव्ह होता.

ब) योग्य पर्याय निवडा.

१. ब) २० वर्षे　　२. अ) ॲटलांटिक　　३. ड) भारत

४. क) अँझ्युस　　५. क) १९५५

## २.४ सरावासाठी स्वाध्याय

**अ) टीपा लिहा.**

१. नाटो

२. वॉर्सा करार

३. सेंटो

४. अँझ्युस करार

ब) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

१. अमेरिकाप्रणित लष्करी करार व संघटनांची माहिती लिहा.

२. रशियाच्या नेतृत्वाखाली शीतयुध्द काळात उदयास आलेल्या लष्करी करार व संघटनांची माहिती लिहा.

## २.५ अधिक वाचनासाठी ग्रंथ


१. आचार्य धनंजय, विसाव्या शतकातील जग, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००७

२. वैद्य सुमन, शांता कोठेकर, आधुनिक जग (१९४५-२०००), श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

३. जोशी पी. जी., विसाव्या शतकाचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर

४. कदम य. ना., विसाव्या शतकातील जग, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

५. तोडकर बी. डी., आंतरराष्ट्रीय संबंध - महत्त्वाच्या संकल्पना, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २०१२.

६. Mahajan V. D., History of Modern Europe, S. Chand of Co, Ltd., New Delhi, 1974.

७. Nanda S. P., History of the Modern World, Anmol Publication, New Delhi, 1998

८. Meiser Stanley, United Nations: The first-fifty years, New York, 1995

९. Yoder Amos, The Evolution of the United Nations System, New York, 1993

१०. Bennett A. Lerox, International Organization, Englewood Cliff. (N.J.), 1980


❑❑❑

# घटक ३
# अलिप्ततावादी चळवळ
(Non-aligned Movement-NAM)

**अनुक्रमणिका**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

    ३.२.१ अलिप्ततावादी चळवळीची तत्त्वे आणि उद्दिष्टे
    (Principals and Objectives of NAM)

    ३.२.२ नेतृत्व: जवाहरलाल नेहरू, गमाल अब्दुल नासर आणि जोसेफ टिटो
    (Leadership : Jawaharlal Nehru, Abdul Nasser and Josef Tito)

    ३.२.३ अलिप्ततावादी चळवळीची प्रासंगिकता (Relevance of NAM)

३.४ स्वयं-अध्ययन प्रश्न

३.५ सरावासाठी स्वाध्याय

३.६ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## ३.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला,

१. अलिप्ततावादी चळवळीची पार्श्वभूमी, तत्त्वे आणि उद्दिष्टे स्पष्ट करता येतील.

२. अलिप्ततावादी चळवळीला लाभलेले नेहरू, अब्दुल नासर, जोसेफ टिटो यांचे नेतृत्व याचा विस्तृत आढावा घेता येईल.

३. आजच्या परिस्थितीत अलिप्ततावादी चळवळीची नेमकी प्रासंगिकता काय या प्रश्नांची उकल करता येईल.

## ३.१ प्रस्तावना:

दुसऱ्या महायुद्धानंतर इंग्लंड-फ्रान्स या पूर्वीच्या महासत्ता मोडीत निघून जागतिक व्यासपीठावर खुल्या अर्थव्यवस्थेचा व भांडवलशाहीचा हिरीरीने पुरस्कार करणारी अमेरिका आणि साम्यवादी हुकूमशाहीचा प्रचार व प्रसार करणारा रशिया अशा दोन महासत्ता परस्परांसमोर दंड थोपटून उभ्या ठाकल्या होत्या. त्याचवेळी युरोपीय साम्राज्यवादाचे जोखड झुगारून देऊन आशिया-आफ्रिका खंडातील छोटी-मोठी राष्ट्रे स्वतंत्र होत होती. सर्वार्थाने दुर्बळ असलेल्या, मागासलेल्या, अविकसित नवस्वतंत्र राष्ट्रांवर अमेरिका-रशिया या बलाढ्य

महासत्तांचा प्रभाव पडणे अगदी स्वाभाविक व अटळ होते. आपल्या विचारसरणीचा पुरस्कार करण्यासाठी या नवोदित महासत्तांनी संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या जागतिक व्यासपीठाचा वापर करणे सुरू केले. महायुद्धोत्तर उध्वस्त जीवनाची पुन्हा नव्याने उभारणी करण्याच्या बुरख्याखाली अमेरिका व रशिया या दोन्ही महासत्तांनी ज्या विविध आर्थिक योजना आखल्या आणि युरोपातील व अतिपूर्वेकडील राष्ट्रांना आर्थिक सहकार्य दिले; त्या जाणीवपूर्वक प्रयत्नांतून जगाची दोन परस्परभिन्न विचारसरणीच्या सत्तागटात विभागणी झाली. साम्यवादाचा प्रसार करण्याच्या नावाखाली रशिया आपले राजकीय वर्चस्व प्रस्थापित करीत होता, तर जगाला साम्यवादाच्या धोक्यापासून वाचविण्यासाठी आपल्या बलदंड आर्थिक ताकदीचा मुक्तहस्ते वापर करून अमेरिका आपले राजकीय वर्चस्वक्षेत्र वृद्धिंगत करीत होते. रणभूमीवरील सर्वसंहारक, विनाशक, शस्त्रास्त्रांचा खणखणाट, जरी थांबला असला, तरी अमेरिका-रशिया या नवोदित महासत्तांमध्ये सुरू झालेल्या विचारसरणीच्या शीतयुद्धाने जग हताश व हतबल झाले. कारण हिरोशिमा नागासाकीच्या प्रलयंकारी घटनेने उभ्या जगाचा थरकाप उडविला होता. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सनदेला उभा छेद देणाऱ्या, सनदेत नमूद करण्यात आलेल्या मूलभूत तत्त्वांशी संपूर्ण विसंगत असलेल्या लष्करी संघटना अमेरिका-रशिया या महासत्तांनी निर्माण केल्या. अमेरिका व रशिया या दोन्ही सत्तागटांना काबूत ठेवू शकेल अशी तिसरी शक्ती जगात अस्तित्वात नव्हती. आशिया-आफ्रिका खंडातील नवमुक्त राष्ट्रांना आपले स्वातंत्र्य, सार्वभौमत्व व प्रादेशिक एकात्मता टिकवायची होती. अविकसित, मागासलेल्या स्वतंत्र राष्ट्रांना आपल्या देशातील दारिद्र्य, निरक्षरता, अनारोग्य यांच्यावर यशस्वीरीत्या मात करून परकीय आक्रमणापासून आपले देश सुरक्षित राखावयाचे होते आणि त्याचबरोबर युरोपीय साम्राज्यवादाच्या जोखडातून मुक्त झालेल्या नवस्वतंत्र राष्ट्रांबरोबर मैत्रीपूर्ण सलोख्याचे संबंध प्रस्थापित करावयाचे होते. आशिया-आफ्रिका खंडातील नवमुक्त राष्ट्रांना आपल्या सर्वांगीण प्रगतीसाठी प्रगत राष्ट्रांच्या आर्थिक, वैज्ञानिक व तांत्रिक मदतीवर अवलंबून राहावे लागत होते. अमेरिका व रशिया या महासत्तांनी नवमुक्त राष्ट्रांना आपल्या सोयीस्कर अटींवर मदत देऊ करून त्यांना आपल्या सत्तागटात खेचण्याचा व त्यांच्यावर आपले राजकीय वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न सुरू केला. तथापि या नवजात स्वतंत्र राष्ट्रांच्या आर्थिक गरजा इतक्या प्रचंड होत्या की, जेथून मदत मिळेल तेथून त्यांना ती हवी होती. दोन महासत्तांपैकी एका गटात लष्करी कराराद्वारे सामील झाल्यास दुसऱ्या गटातील राष्ट्राकडून हवी ती मदत मिळविता येणार नाही हे जाणून बहुतांश नवस्वतंत्र राष्ट्रांनी अलिप्ततावादी धोरणाचा स्वीकार केला. अशा अलिप्ततावादी राष्ट्रांना एका जागतिक व्यासपीठावर आणण्याच्या प्रयत्नांचे नेतृत्व भारताने केले.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ अलिप्ततावादी चळवळीची तत्त्वे आणि उद्दिष्टे:

पंडित नेहरूंनी अलिप्ततावादाचे स्पष्टीकरण देताना जाहीर केले, अलिप्ततावाद म्हणजे जगातील दोन्ही लष्करी गटांपासून अलिप्त राहणे होय. जगाच्या पाठीवर स्वातंत्र्यासाठी संघर्ष चालू असताना, त्यापासून स्वतःला अलग ठेवणे नव्हे.

एखाद्या राष्ट्राने जगातील दोन बलिष्ठ गटाच्या भांडणात न पडण्याचे ठरविले किंवा कोणाच्याच बाजूने समर्थन न करण्याचे ठरविले म्हणजे इतर क्षेत्रांत त्या राष्ट्राने इतर राष्ट्रांशी अजिबात सहकार्य करू नये असा अलिप्ततावादाचा अर्थ नव्हता. अलिप्ततावाद याचा अर्थ तटस्थता सुद्धा नव्हे. युद्ध चालू असताना एखाद्या राष्ट्राने युद्धात भाग घेतला नाही तर ते राष्ट्र तटस्थ राहिले असे म्हणता येईल. तटस्थता ह्याचा युद्धाशी संबंध येतो आणि युद्धाच्या संदर्भातच आपण तटस्थतेचा विचार करू शकतो. एखाद्या युद्धात एखादे राष्ट्र ज्यावेळी तटस्थ राहते त्यावेळी युद्धात जे प्रश्न गुंतलेले असतात त्यावर अशा तटस्थ राष्ट्राला कोणतेही मत नसते. उलट अलिप्ततावादी राष्ट्राला कोणत्याही प्रश्नावर किवा आंतरराष्ट्रीय प्रश्नावर स्पष्ट मते ठेवता येतात किंवा स्पष्ट भूमिका सुद्धा मांडण्याची मुभा असते. ज्या राष्ट्रांना जगात चिरस्थायी शांतता नांदावी असे वाटत असते ती राष्ट्रे अलिप्तवादाचा पुरस्कार करून विवादास्पद प्रश्नांवर आपली मते स्पष्टपणे मांडत असतात. आपण एखाद्या गटाचे मत स्विकारल्यास आपण आपले मत-स्वातंत्र्य गमावतो आणि त्या गटाच्या दडपणाखाली आपल्याला त्या गटाच्या माताचीच री ओढावी लागते असे जवाहरलाल नेहरू नेहमीच म्हणत असत. थोडक्यात अलिप्ततावादाचा पुरस्कार करणारे राष्ट्र कोणत्याही लष्करी गटाच्या आहारी न जाता शांततापूर्ण मार्गांनी जागतिक तणावाचे प्रश्न सोडवीत असतात.

प्रत्येक अलिप्ततावादी राष्ट्र आपल्या राष्ट्रीय गरजेनुसार किंवा स्थानिक गरजेनुसार अलिप्ततावादी धोरणाचा पुरस्कार करीत असल्याने प्रत्येकाची भाषा, प्रत्येकाची उद्दिष्टे, प्रत्येकाची प्रश्न सोडविण्याची पद्धती यांच्यामध्ये बराच फरक असे. जरी त्यांनी अलिप्ततावाद स्वीकारलेला असला तरी तो प्रश्न सोडविण्याची पद्धती आणि प्रश्न समजावून सांगण्याची भाषा अगदी वेगवेगळी असे. प्रत्येक राष्ट्राची भाषा वेगवेगळी असे परंतु उद्दिष्ट मात्र एकच असे.

अलिप्तता हा नवीन शब्द प्रथमतः दुसऱ्या महायुद्धानंतर म्हणजे सन १९४५ मध्ये वापरला गेला. त्याच्या अर्थाचेही काही प्रमाणात निरनिराळे अर्थ लावले गेले. तटस्थता, विलगता, पृथकता असे निरनिराळे अर्थ प्रथमतः लावले गेले. परंतु शार्त्सन बर्जन ह्या राजकीय पंडिताने 'संधीपासून अलिप्त राहण्याचे धोरण' (Non Alignment is a policy of keeping out of alliances) असा अलिप्ततावादाचा शास्त्रीय अर्थ लावलेला आढळतो. सोप्या भाषेत अलिप्ततावादाचा अर्थ दोन प्रभावी गटामध्ये सामील न होता त्यांच्या संघर्षातून स्वतःच्या राष्ट्राला मोकळे ठेवणे आणि त्याचबरोबर जागतिक शांततेकरिता सतत प्रयत्न करणे हा आहे.

भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू तिसऱ्या जगाची निर्मिती करण्यास उत्सुक होते. त्यांनी इजिप्तचे अध्यक्ष अब्दुल गमाल नासर व युगोस्लाव्हियाचे अध्यक्ष मार्शल जोसेप टिटो या दोन मध्यपूर्व व पूर्व युरोपातील नेत्यांच्या सहकार्याने सन १९५६ मध्ये अलिप्तवादी चळवळीची मुहूर्तमेढ रोवली. अलिप्ततावादी राष्ट्रांच्या चळवळीचे संस्थापक नेहरू-नासर-टिटो ही त्रिमुर्ती आहे.

अलिप्ततावादी चळवळीचे तत्त्वे आणि उद्दिष्टे पुढीलप्रमाणे:

### १. लष्करी गटांपासून व लष्करी करारांपासून अलिप्त :

१५० वर्षांपूर्वी विकसनशील अवस्थेत असताना अमेरिकेने जागतिक राजकारणापासून अलिप्त राहण्याचे जे धोरण अवलंबिले होते, तेच धोरण सर्वांगीण विकासासाठी शांततेची, स्वातंत्र्याची, सार्वभौमत्वाची, स्वयंनिर्णयाची नितांत आवश्यकता असल्यामुळे अलिप्तवादी गटाने अवलंबिले. अलिप्ततेच्या धोरणानुसार कोणत्याही लष्करी संघटना वा लष्करी करारात सामील होण्यास स्पष्ट शब्दांत नकार अलिप्तवादी देशांनी दिला. आशिया खंडातील साम्यवादाचे आक्रमण थोपवून धरण्यासाठी भारताने 'सिएटो' करारात सामील व्हावे अशी विनंती अमेरिकेने केली, परंतु पं. नेहरूंनी ही विनंती साफ फेटाळून लावली. अमेरिका व रशिया या महासत्तांच्या पुढाकाराने निर्माण झालेल्या लष्करी करारांपासून अलिप्त राहून स्वतःचे स्वतंत्र परराष्ट्रीय धोरण आखणे व निर्भयपणे ते प्रत्यक्ष कृतीत आणणे हे भारताच्या अलिप्ततेचे प्रमुख वैशिष्ट्य होय.

### २. शांततेचे धोरण :

राष्ट्रहितासाठी व शांततेसाठी अलिप्तता अत्यावश्यक होती. कोणत्याही एका राष्ट्रगटाशी संलग्न झाल्यास आपोआपच दुसऱ्या राष्ट्रगटाशी शत्रुत्व निर्माण होणार ही गोष्ट स्पष्ट होती. तसे होणे शांततेच्या दृष्टीने घातक ठरले असते. सर्व राष्ट्रांशी मग ते कोणत्याही गटात सामील झालेले असोत, मैत्रीपूर्ण सलोख्याचे व सहकार्याचे संबंध प्रस्थापित करण्यासाठी लष्करी करारांपासून अलिप्तता फायदेशीर ठरणार होती. भारताच्या अलिप्ततावादी धोरणामुळेच भिन्न गटातील राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण सलोख्याचे व सहकार्याचे संबंध प्रस्थापित करता आले. तसेच या अलिप्ततावादी धोरणामुळेच विकसनशील देशांच्या प्रगतीसाठी सर्व प्रगत राष्ट्रांकडून आर्थिक, तांत्रिक, वैज्ञानिक मदत मिळविणे शक्य झाले. अलिप्ततावादी धोरण शांतता निर्माण करण्यास उपकारक ठरते. आंतरराष्ट्रीय समस्येबाबत आपण स्वीकारलेली भूमिका योग्य आहे याची खात्री असल्यास अलिप्त राष्ट्रास एक प्रकारचे नैतिक व आत्मिक सामर्थ्य प्राप्त होऊन अलिप्त राष्ट्र आपली भूमिका जागतिक व्यासपीठावर ठामपणे मांडू शकते. गुंतागुंतीचे करारमदार करून अलिप्त राष्ट्राने युद्ध अथवा युद्धसदृश परिस्थिती स्वतःवर ओढवून घेऊ नये. युद्ध टाळणे सहजशक्य आहे यावर अलिप्त राष्ट्रांचा ठाम विश्वास निर्माण करण्यात आला. मात्र 'कोणतीही किंमत देऊन शांतता' हे तत्त्व अलिप्ततेच्या शांततेच्या धोरणात बसत नाही. युद्ध, युद्धसदृश परिस्थिती, घातक तणाव यांपासून आपल्या राष्ट्रास दूर ठेवून शांतता प्रस्थापित करणे हे उद्दिष्ट अलिप्ततेच्या धोरणात अंतर्भूत आहे.

### ३. स्वातंत्र्य व सार्वभौमत्व :

स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्व या दोन भरभक्कम पायावर अलिप्ततेचे धोरण आधारलेले आहे. कोणत्याही अंतर्गत व बाह्य शक्तीच्या नियंत्रणापासून मुक्त असे निर्णयस्वातंत्र्य अलिप्तवादी राष्ट्रांना असले पाहिजे, याचाच अर्थ राजकीय स्वातंत्र्यामुळे खऱ्या अर्थाने सार्वभौमत्व प्राप्त झाले असेल, तरच अलिप्ततेच्या धोरणाचा पाठपुरावा करता येईल, ही गोष्ट अलिप्तवादी नेते जाणून होते. जागतिक महासत्तेच्या पुढाकाराने व प्रभावाखाली स्थापन झालेल्या लष्करी गटात सामील झालेल्या छोट्या-मोठ्या राष्ट्राचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व कालांतराने नाममात्र राहते. महासत्तेच्या मर्जीनुसार त्याला अगतिकपणे वाटचाल करावी लागते आणि तशीच

वेळ आली तर सत्तासंघर्षांमुळे उद्भवणाऱ्या संहारक युद्धात नामशेष व्हावे लागते. स्वातंत्र्योत्तर भारताच्या राजकीय नेत्यांच्या, विशेषत्वाने पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंच्या असाधारण राजकीय सुज्ञपणामुळे भारताने अंगीकारलेल्या अलिप्ततावादी धोरणामुळे भारताला आपले स्वतंत्र परराष्ट्रीय धोरण राबविता आले आणि आपले स्वातंत्र्य व सार्वभौमत्व अबाधित राखता आले.

**४. निर्णय स्वातंत्र्य :**

अलिप्ततेचे धोरण जाहीर केल्यानंतर काही काही पाश्चात्य राष्ट्रांनी या धोरणाची 'दुबळ्याची क्षमाशीलता', 'पौरुषहीन धोरण', 'भ्याडपणाचे धोरण' अशा कटू शब्दांत टीका केली. तथापि पं. नेहरूंनी आपल्या कुशल व प्रभावी नेतृत्वाने आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रयत्नपूर्वक अलिप्ततावादी धोरणास जागतिक प्रतिष्ठा मिळवून दिली. अलिप्ततावादी धोरणाचे स्वरूप नकारात्मक नसून ते सुनिश्चित गतिमान धोरण आहे. कोणत्याही लष्करी गटांत अथवा शीतयुद्धांत अलिप्तवादी राष्ट्रे स्वतःला गुंतवून घेणार नाहीत. कोणत्याही आंतरराष्ट्रीय समस्येबाबत, वादाबाबत सारासार विचार करून स्वतःला योग्य वाटणारा निर्णय स्वतंत्रपणे घेता यावा व त्या निर्णयाचा ठामपणे पाठपुरावा करता यावा. याच धोरणामुळे अलिप्तवादी राष्ट्रांना प्रमुख आदर्श व उद्दिष्टे साध्य करता आली. साम्राज्यवाद, वसाहतवाद, वंशभेद, वर्णभेद, युद्धसदृश परिस्थिती, युद्ध, शांतता अशा आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील अनेक समस्यांबाबत भारताने आपली मते स्पष्ट व ठाम शब्दात मांडली. सन १९५० मध्ये कोरियन युद्ध उद्भवले त्यावेळी उत्तर कोरिया आक्रमक असल्याचे मत भारताने ठामपणे दिले. सन १९५६ मध्ये इंग्लंड आणि फ्रान्स या राष्ट्रांनी इजिप्तवर केलेल्या हल्ल्याचा भारताने निर्भीडपणे निषेध केला. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या महासचिवाने केलेल्या आवाहनाला त्वरित प्रतिसाद देऊन शांततारक्षणार्थ भारताने सन १९५६ मध्ये गाझा पट्टीत आणि सन १९६१ मध्ये कांगोमधील आणीबाणीच्या वेळी आपली सैन्यदळे पाठविली. याचाच अर्थ भारत लष्करी गटांशी असंलग्न असला, तरी भारताचे धोरण कायम तटस्थतेचे नाही. अलिप्ततावाद म्हणजे कायमची तटस्थता नव्हे. आंतरराष्ट्रीय समस्यांबाबत राष्ट्रांना स्वतःचे निर्णयस्वातंत्र्य आहे, स्वतःचे स्वतंत्र परराष्ट्रीय धोरण आहे आणि स्वतःचा निर्णय ठामपणे अंमलात आणण्याचे स्वातंत्र्य आहे.

**५. निर्भयतेचे धोरण :**

अलिप्ततेचे धोरण म्हणजे भित्रेपणाच्या पोटी जन्मास आलेली शांतता नव्हे. अलिप्ततेचे धोरण हा दुबळ्यांचा आक्रोश नसून जागतिक महासत्ता बनण्याच्या मार्गावर वाटचाल करणाऱ्या शांतताप्रिय सामर्थ्यसंपन्न राष्ट्रांचे जागतिक शांततेला पोषक ठरणारे सुयोग्य, सुनिश्चित परराष्ट्रीय धोरण आहे. स्वातंत्र्योत्तर भारताने संस्थानांच्या विलीनीकरणाच्या प्रसंगी निर्भय धोरण अवलंबिले. हैदराबाद संस्थानाच्या विलीनीकरणाचा प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या व्यासपीठावर चर्चेला आला, त्याची भारताने तमा बाळगली नाही. हैदराबादमधील सैनिकी कारवाईबाबत भारताची भूमिका ठाम व निर्भय होती. काश्मीर प्रश्नाबाबत पाश्चात्य राष्ट्रांनी पाकिस्तानला अनुकूल अशी घेतलेली भूमिका भारताला अजिबात आवडली नाही. काश्मीर हा भारतीय संघराज्याचा अविभाज्य भाग आहे या भूमिकेवर भारत ठाम आहे.

६. **सहकार्याचे व सहजीवनाचे धोरण:**

अलिप्ततावादी राष्ट्रांची संघटना बांधण्यामागे जागतिक पातळीवर 'तिसरी शक्ती' वा 'तिसरे जग' निर्माण करण्याची भूमिका आमची नाही, ही गोष्ट पं. नेहरूंनी वारंवार स्पष्ट केली. अलिप्ततावादी राष्ट्रांची संघटना उभारण्यामागे उद्देश एवढाच आहे की, अलिप्ततेच्या धोरणाच्या आधारे शांततेचे क्षेत्र वाढविता येईल, जागतिक तणाव कमी करण्याचा प्रयत्न करता येईल, शस्त्रास्त्रस्पर्धा रोखता येईल, अविकसित राष्ट्रांचा विकास साधता येईल आणि वंशभेद, वर्णभेद, वसाहतवाद यांना कडवा विरोध करून नेस्तनाबूत करता येईल. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने जवळपास सर्व प्रमुख राष्ट्रांशी राजनैतिक संबंध प्रस्थापित केले आहेत. भारत संयुक्त राष्ट्रसंघ व त्याच्या घटक संस्थांचा सक्रिय सभासद आहे. राष्ट्रकुलाचेही सदस्यत्व भारताने कायम राखले आहे. आफ्रो-आशियायी राष्ट्रांची संघटना स्थापन करून कोलंबो योजना यशस्वी करण्यात भारताचा सिंहाचा वाटा आहे. एकूणच अलिप्ततावादी धोरणाचा आधार सहकार्याचा व सहजीवनाचा आहे.

### ३.२.२ अलिप्ततावादी चळवळीचे नेतृत्व: जवाहरलाल नेहरू, गमाल अब्दुल नासर आणि जोसेफ टिटो

अलिप्तवादी चळवळीला जागतिक पातळीवर एक वेगळी ओळख निर्माण करून देण्यामध्ये पंडित जवाहरलाला नेहरू यांचे नेतृत्व व योगदान तर महत्त्वाचे आहेच त्याचबरोबर यूगोस्लाव्हियाच्या प्रजासत्ताक संघराज्याचा पहिले अध्यक्ष मार्शल टिटो आणि इजिप्तचे पहिले राष्ट्राध्यक्ष गमाल अब्दुल नासर यांचेही या चळवळीतील स्थान महत्त्वाचे आहे. नेहरू-नासर-टिटो हेच अलिप्ततावादी राष्ट्रांच्या चळवळीचे संस्थापक होते.

**१. पंडित जवाहरलाल नेहरू:** अलिप्ततावादी नीतीचे प्रवर्तक पंडित जवाहरलाल नेहरू होते. त्यांनी अलिप्तवादी चळवळीला आपल्या प्रभावी नेतृत्वाने जागतिक पातळीवर महत्त्व प्राप्त करून दिले. अलीप्ततेचे धोरण स्पष्ट करताना नेहरूंनी म्हटले आहे की, भारत कोणत्याही लष्करी गटात सामील होणार नाही. दोन गटांत संघर्ष निर्माण झाल्यास तो मिटविण्याचा प्रयत्न भारत करील परंतु संघर्ष अटळ ठरल्यास आपल्या हितासाठी अगर जागतिक शांततेच्या दृष्टीने योग्य वाटेल ती भूमिका घेण्यास भारत स्वतंत्र राहील. जगातील दोन परस्परविरोधी बलाढ्य शक्तींना तोंड देण्यासाठी अलिप्ततावादाच्या तिसऱ्या शक्तीची (Third Power) नितांत आवश्यकता आहे, असे त्यांचे मत होते. म्हणूनच नेहरूंना 'अलिप्ततावादाचे उद्गाते' म्हणून संबोधले जाते.

**भारत आणि अलिप्ततावाद:-**

**पंचशील करार:** आंतरराष्ट्रीय सहकार्य व सद्भाव वृद्धिंगत होऊन जागतिक शांतता टिकावी या प्रामाणिक हेतूने पंडित जवाहरलाल नेहरू यांनी पंचशील तत्त्वाचा हिरीरीने पुरस्कार केला.

भारत व चीन यांच्यात तिबेटच्या स्वायत्ततेसंबंधी झालेल्या करारात २९ एप्रिल, १९५४ रोजी पंचशील तत्त्वांचा अंतर्भाव करण्यात आला. भारत-चीन यांच्यात पंचशील तत्त्वावर आधारित झालेल्या मैत्री कराराचा भंग करून १९६२ साली पंचशील तत्त्वे पायदळी तुडवून चीनने भारतावर आक्रमण केले असले, तरीही

पंचशील तत्त्वांचे महत्त्व तिळमात्र कमी होत नाही. आंतरराष्ट्रीय राजकारणात मार्गदर्शक तत्त्वे म्हणून पंचशील तत्त्वांचा उल्लेख पं. नेहरूंनी सन १९५४ मध्ये इंडोनेशियाच्या पंतप्रधानाच्या सन्मानार्थ आयोजित करण्यात आलेल्या भोजनसमारंभाच्या प्रसंगी आपल्या भाषणात जाहीरपणे केला.

पंचशील तत्त्वांबाबत पं. नेहरूंची भूमिका टोकाची प्रामाणिक होती. पं. नेहरूंना असलेली आंतरराष्ट्रीय समस्यांची अचूक जाण, जागतिक शांततेवरील त्यांचा विश्वास, मानवतेवरील श्रद्धा, शांततामय सहजीवनाविषयी असलेली आंतरिक आस्था आणि सर्व राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण सलोख्याचे संबंध राखण्याची प्रबळ इच्छा या भूमिकेतून पं. नेहरूंनी त्यांच्या कारकिर्दीत आंतरराष्ट्रीय राजकारणात पंचशील तत्त्वांचा आणि अलिप्ततावादाचा हिरीरीने पुरस्कार केला. पंचशील तत्त्वाची जगात चेष्टा झाली, पंडितजींच्या भूमिकेचा मोठ्या राष्ट्रांनी उपहास केला, पंचशील तत्त्वांबाबत नेहरूंना अतिकटू टीकेला तोंड द्यावे लागले; परंतु पं. नेहरूंनी भारताच्या अलिप्ततावादी धोरणाची आणि पंचशील तत्त्वांची कास कधीही सोडली नाही. पं. नेहरू खऱ्या अर्थाने शांतिदूत होते. नेहरूंचे महत्त्व कालांतराने जगाला पटले.

१७ ऑक्टोबर, १९५४ रोजी व्हिएटनामचे अध्यक्ष हो-ची-मिन्ह यांनी आणि सन १९५५ मध्ये युगोस्लाव्हियाचे अध्यक्ष मार्शल टिटो यांनी भारताच्या पंचशील तत्त्वांना मान्यता दिली. एप्रिल १९५५ पर्यंत ब्रह्मदेश, चीन, लाओस, कंबोडिया, नेपाळ या राष्ट्रांनीही पंचशील तत्त्वांना आपला पाठिंबा जाहीर केला. नवी दिल्ली येथे एप्रिल १९५५ मध्ये भरलेल्या आशियायी राष्ट्रांच्या परिषदेमध्ये जमलेल्या २०० प्रतिनिधींनी पंचशील तत्त्वांना आपली मान्यता दिली. सन १९५५ मध्येच बांडुंग परिषदेमध्ये २९ आफ्रो-आशियायी राष्ट्रांनी पंचशील तत्त्वांना आपली जाहीर मान्यता दिली. बांडुंग परिषदेमध्ये मूलभूत मानवी हक्कांचा सन्मान राखला जावा आणि सर्व प्रकारच्या आंतरराष्ट्रीय मतभेदांची सोडवणूक शांततेच्या मार्गाने व्हावी या दोन तत्त्वांची जोड पंचशील तत्त्वांना देण्यात आली. १९५५ मध्येच ऑस्ट्रेलिया, ऑस्ट्रिया आणि पोलंड या राष्ट्रांनीही पंचशील तत्त्वांना आपली मान्यता दिली. यातूनच नेहरूंनी अलिप्ततावादी धोरणाची बीजे रोवली.

कोरियन युद्धाच्या काळात भारताची अलिप्तता आंतरराष्ट्रीय आणीबाणीच्या प्रसंगी मध्यस्थी करण्यासाठी स्वागतार्ह ठरू शकते याचा प्रत्यय अमेरिका व रशिया या दोन्ही महासत्तांच्या लष्करी गटांना आणि चीनला आला. सन १९५२ च्या अखेरीस भारताने कोरियन समस्येबाबत केलेली मध्यस्थी यशस्वी झाली. सुरक्षा परिषदेमध्ये युद्धबंदीबाबत व युद्धकैद्यांच्या अदलाबदलीबाबत भारताने मांडलेला ठराव संमत झाला. कोरियन प्रश्नाबाबत युनोने नियुक्त केलेल्या २० तटस्थ राष्ट्रांच्या मंडळाचे अध्यक्षपद भारताकडे आले. शस्त्रसंधी कराराची अंमलबजावणी व युद्धकैद्यांची अदलाबदल याबाबत लेफ्टनंट जनरल एस.पी. थोरात यांनी अद्वितीय कामगिरी बजावली. कोरियन युद्धप्रसंगी भारताचे सहकार्य व न्याय्य भूमिका मोलाची ठरल्यामुळे भारताच्या अलिप्ततावादी धोरणाच्या उपयुक्ततेबाबत सोव्हिएट रशिया आणि चीन यांना विश्वास वाटू लागला, तर अमेरिकेच्या तीव्र नाराजीची धार किंचित बोथट झाली.

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या बाबतीत अलिप्ततावादी धोरण राष्ट्रहिताच्या दृष्टीने लाभदायक ठरू शकते आणि भारताचे उदाहरण डोळ्यासमोर असल्यामुळे अलिप्तता राखणे सहजशक्य आहे हे लक्षात आल्यामुळे

सन १९५५ नंतर स्वतंत्र झालेल्या बहुतांश आफ्रिकन राष्ट्रांनी भारताच्या पावलावर पाऊल ठेवून अलिप्ततावादी नीतीचा स्वीकार केला. अलिप्ततेमुळे शांततेचे क्षेत्र विस्तारावे, आंतरराष्ट्रीय ताणतणावाचे वातावरण ओसरल्यास शस्त्रास्त्रकपातीसाठी, वर्णभेद, वंशभेद, वसाहतवाद यांचे निर्मूलन होण्यासाठी, अलिप्ततावादी राष्ट्रांची मदत व्हावी एवढीच नेहरूंची माफक अपेक्षा होती.

१९६२ साली भारताने पोर्तुगीजांच्या तावडीतून गोवा मुक्त केला, त्यावेळी अमेरिका, इंग्लंड इत्यादी मोठ्या राष्ट्रांनी भारताच्या शांततावादी अलिप्ततेच्या धोरणावर खूप ताशेरे ओढले पण भारताचे धोरण निर्भय कृतिशीलतेचे आहे, हे नेहरूंनी दाखवून दिले.

राष्ट्राचे हितसंबंध जोपासणारे तात्पुरते व संधिसाधू धोरण असे अलिप्तवादाचे स्वरूप कधीच नव्हते, तर नेहरूंच्या चिंतनात महत्त्वाची असलेली नैतिक भूमिका हा त्या धोरणाचा कणा होता. आपले प्रश्न सहिष्णुतेव्दारे, अहिंसक मार्गांनी आणि स्थूल मतैक्याच्या शोध घेवून सोडवावेत, त्याच्या प्रत्येक कृतीमागे मानवमात्राच्या भवितव्याचा नीट विचार केला गेलेला असावा, आणि प्रसंगोपात अहिंसेखेरीज अन्य मार्गांचा वापर करणे भाग पडलेच तर तो फक्त तेवढ्यापुरताच व्हावा, अशी नेहरूंची भूमिका होती. रोमेश थापर यांनी म्हटल्याप्रमाणे, नेहरूंच्या या दृष्टीकोनामुळे अलिप्ततावाद हे केवळ एक धोरण न राहता, जगातल्या अनेक राष्ट्रांसाठी ते एक भावात्मक तत्त्वज्ञान झाले आणि महासत्तांमधील संघर्षाला आटोक्यात ठेवण्याची क्षमता आणि संधी त्यांना त्यातून लाभली.

**२. गमाल अब्दुल नासर:** सन १९५४ गमाल अब्दुल नासर इजिप्तचे पहिले पंतप्रधान झाले. नासर यांनी सन १९५६ मध्ये इजिप्तचे नवीन संविधान तयार केले. त्यानुसार इजिप्त हे इस्लामी अरब कल्याणकारी राज्य बनले. संविधानानुसार एकपक्ष राज्यपद्धतीचा अवलंब करण्यात आला. संविधानानुसार निवडणुका झाल्या व नासर बहुमताने राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आले. या पदावर ते अखेरपर्यंत म्हणजे सुमारे १४ वर्षे होते.

सन १९५५ मध्ये इजिप्तची राजधानी कैरो येथे नासर आणि नेहरू यांच्या झालेल्या पहिल्या भेटीनंतर लष्करी करारांपासून दूर राहण्याची दोन्ही राष्ट्रांची भूमिका समान असल्याचे उभय नेत्यांना जाणवले. अमेरिका-रशिया या महासत्तांशी लष्करी युती करणे ही गोष्ट जागतिक शांततेला विघातक ठरणारी असल्यामुळे भारत व इजिप्त या राष्ट्रांनी अशा लष्करी करारांपासून अलिप्त राहावे याबाबत उभय राष्ट्रांत निश्चित करार झाला. सन १९५६ मध्ये युगोस्लाव्हियाच्या ब्रिओनी बेटावर नेहरू-टिटो-नासर हे तीन खंडातील नेते एकत्र आले. शांततामय मार्गाने आंतरराष्ट्रीय समस्यांची सोडवणूक करणे, लष्करी करारांना विरोध करणे आणि जागतिक शांततेची असलेली आंतरिक निकड या समान हेतूंनी नेहरू-टिटो-नासर ही त्रिमूर्ती एकत्र आली. नासर यांनी इजिप्तच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अनेक सुधारणा अमलात आणल्या आणि त्या राबविण्यासाठी लष्करी स्थैर्य व शांतता लाभावी म्हणून आंतरराष्ट्रीय राजकारणात नासर यांनी नेहरू व टिटो यांच्या बरोबरीने अलिप्ततावादाचा पुरस्कार केला. आणि आपला सक्रीय सहभाग नोंदविला.

नासर यांनी अलिप्त राष्ट्रांच्या दुसऱ्या शिखर परिषदेचे यजमानपद स्वीकारले. इजिप्तची राजधानी कैरो येथे ऑक्टोबर १९६४ मध्ये भरलेल्या अलिप्त राष्ट्रांच्या दुसऱ्या शिखर परिषदेमध्ये सभासद राष्ट्रांची संख्या ४७

झाली आणि त्यामध्ये आफ्रिकन राष्ट्रांची संख्या सर्वाधिक होती. कैरो परिषदेमध्ये संमत झालेल्या ठरावान्वये स्वातंत्र्यासाठी झगडणाऱ्या, वसाहतवादापासून मुक्त होऊ इच्छिणाऱ्या जनतेच्या स्वातंत्र्यलढ्यांना सहानुभूती व पाठिंबा व्यक्त करण्यात आला. संयुक्त राष्ट्रसंघाने शांततापूर्ण सहजीवनाच्या तत्त्वास मान्यता देऊन त्याचा स्वीकार करावा, अशी शिफारस करण्यात आली. ही शिखर परिषद यशस्वी करण्यासाठी नासर यांनी पुढाकार घेवून अलिप्तवादी चळवळीला बळ देण्यासाठी प्रयत्न केले.

**३. मार्शल जोसेफ टिटो:** टिटो हे युगोस्लाव्हियाच्या प्रजासत्ताक संघराज्याचे पहिले अध्यक्ष होते. त्यांनी नेहरूंच्या बरोबर अलिप्ततावादी परराष्ट्रीय धोरणाचा पुरस्कार केला. मर्यादित साधने, मागासलेली शेती व अर्थव्यवस्था, दारिद्र्य, फुटीर वृत्ती इ. अडचणी असतानाही युगोस्लाव्हियाने गेल्या काही वर्षांत विलक्षण प्रगती केली याचे श्रेय टिटोच्या कर्तृत्वासच द्यावे लागते.

सन १९५९ मध्ये मार्शल टिटो यांनी भारतास भेट दिली. त्यावेळी नेहरू-टिटो यांच्यात झालेल्या चर्चेमध्ये आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील अनेक विवाद्य मुद्यांबाबत दोन्ही राष्ट्रांची भूमिका समान असल्यामुळे भारत-युगोस्लाव्हिया परस्पर सहकार्य दोन्ही राष्ट्रांना लाभदायक ठरू शकेल याची जाणीव नेहरू व टिटो यांना झाली. त्यातून टिटो हे अलिप्तवादी धोरणाकडे ओढले गेले. नेहरू-टिटो यांनी प्रसिद्ध केलेल्या संयुक्त निवेदनात अलिप्ततेचे क्षेत्र विस्तारण्यावर भर दिला. अलिप्तता म्हणजे निष्क्रियता नसून शांतता टिकविण्यासाठी साकार करण्यात आलेली ती एक सक्रिय, गतिमान व विधायक स्वरूपाची नीती आहे असे संयुक्त निवेदनात आवर्जून स्पष्ट करण्यात आले. अणुयुद्धाचा वाढता धोका व शांततामय सहजीवनाची निकड या पार्श्वभूमीवर अलिप्तवादी राष्ट्रांची चळवळ संघटित करण्याचा निर्णय नेहरू-टिटो-नासर या तिघांनी घेतला आणि अलिप्त राष्ट्रांची शिखर परिषद घेण्याचा निर्णय जाहीर केला. मार्शल टिटो यांच्या विनंतीवरून अलिप्तवादी राष्ट्रांची पहिली शिखर परिषद सप्टेंबर १९६१ मध्ये युगोस्लाव्हियाची राजधानी बेलग्रेड येथे घेण्यात आली.

बेलग्रेड येथील अलिप्तवादी राष्ट्रांच्या या पहिल्या शिखर परिषदेस २५ राष्ट्रांचे प्रतिनिधी अधिकृत सभासद या नात्याने उपस्थित होते. जगातील सर्व ठिकाणच्या वसाहती लवकरात लवकर संपुष्टात आणाव्यात या मुद्द्यावर २५ सभासद राष्ट्रांचे एकमत झाले. अलिप्त राष्ट्रांच्या संघटनेत सामील झालेल्या कोणत्याही सभासद राष्ट्राने कुठल्याही लष्करी करारात सामील होऊ नये आणि तसे झाल्यास त्या राष्ट्राचे अलिप्त राष्ट्रांच्या संघटनेचे सभासदत्व रद्द होईल, असा ठराव संमत केला. तिसऱ्या महायुद्धाच्या संभाव्य धोक्याकडे जगाचे लक्ष वेधण्यात येऊन अमेरिका-रशिया या महासत्तांना अण्वस्त्र चाचण्या बंद करण्याची विनंती करण्यात आली. शांततामय सहजीवन व मैत्रीपूर्ण सलोख्याचे संबंध जागतिक शांतता व सुरक्षेततेसाठी अत्यावश्यक असून या मार्गानेच लष्करी गटांमधील आपापसातील संघर्ष संपविता येतील यावर बेलग्रेड परिषदेमध्ये ठाम विश्वास व्यक्त करण्यात आला. या परिषदेवर नेहरू-टिटो-नासर यांच्या नेतृत्वाचा ठसा उमटला. टिटो हे शेवटपर्यंत अलिप्ततावादी गटात राहिले. त्यांनी अलिप्तवादी धोरणांचा जागतिक पातळीवर प्रसार आणि प्रचार केला. त्यांच्या अलिप्तवादी चळवळीतील योगदानामुळे भारताने त्यांना १९७१ साली जवाहरलाल नेहरू आंतरराष्ट्रीय सामंजस्याचा पुरस्कार देऊन बहुमान केला.

### ३.२.३ अलिप्तवादी चळवळीची प्रासंगिकता:

सन १९९१ मध्ये सोव्हिएत रशियाचे विघटन झाले. त्याचवेळी रशियाची महासत्ता म्हणून असलेली जागतिक प्रतिष्ठा लयाला गेली आणि ४५ वर्षांपूर्वी अमेरिका व सोव्हिएत रशिया यांच्यात सुरू झालेले शीतयुद्ध संपुष्टात आले. त्यानंतर अस्तित्त्वात आलेल्या नवीन जागतिक रचनेत अलिप्ततावादी चळवळ कालबाह्य झाल्याचे मत अमेरिका व पाश्चिमात्य विचारवंत मांडू लागले. त्यांच्या मते, शीतयुद्धाच्या पार्श्वभूमीवर अलिप्ततावादी चळवळीचा उदय झाला होता. शीतयुद्धाच्या राजकारणापासून अलिप्त राहणे आणि परस्पर सहकार्याच्या माध्यमातून आपला आर्थिक व सामाजिक विकास साधणे या उद्देशाने या चळवळीचे व्यासपीठ तयार करण्यात आले होते. शिवाय कोणाच्याही प्रभावाखाली न जाता आपले स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्व तिसऱ्या जगातील राष्ट्रांना टिकवून धरता यावे, यासाठी केलेला सामूहिक प्रयत्न म्हणजेच अलिप्तता चळवळ होती. पण पुढे या चळवळीमधील राष्ट्रांमध्ये ऐक्य आणि एकमताचा अभाव जाणवू लागल्याचे अनेक जागतिक घटनांमधून दिसून आले. उदा. एन.पी.टी. व सी.टी.बी.टी. करार या प्रश्नांवरून या चळवळीतील राष्ट्रांनी घेतलेली भूमिका त्यांच्यातील ऐक्याचा अभाव दाखवते. याचाच अर्थ असा होतो की, ही चळवळ कालबाह्य झाली आहे, पण तिची गरज आजही संपली आहे, असे मात्र म्हणता येणार नाही. तिचे स्वरूप बदलले असेल; मात्र गरज तेवढीच आहे, हे आजच्या परस्थितीत नाकारता येत नाही. एकंदरीत तिचे भवितव्य, उपयुक्तता आणि प्रासंगिकता खालीलप्रमाणे:

**अलिप्ततावादी चळवळीचे भवितव्य :**

अनेक जागतिक प्रश्नांमुळे/कारणांमुळे अलिप्ततावादी चळवळीपुढे प्रश्नचिन्हे उभी राहिलेली आहेत ती खालीलप्रमाणे–

१. सन १९९१ मध्ये सोव्हिएत रशियाच्या विघटनाबरोबरच शीतयुद्ध संपुष्टात आले आणि एक नवी जागतिक रचना उदयास आली. यामध्ये अलिप्तता चळवळ कालबाह्य ठरली आहे. अशा प्रकारचा प्रचार मोठ्या प्रमाणात सुरू झाला. या प्रचारामध्ये काही प्रमाणात तथ्येही होती. कारण ज्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी अलिप्ततावादी चळवळीची निर्मिती आणि विकास झाला होता, त्यातील काही साध्यही झाली, तरीही या चळवळीची कालबाह्यता अधिक उघड झाली.

२. शीतयुद्धानंतरच्या काळात अलिप्ततावादी चळवळीतील अनेक राष्ट्रांनी आर्थिक उदारीकरणाच्या प्रक्रियेचा अवलंब करून आपली अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेला जोडण्याचा प्रयत्न सुरू केला. मुक्त व्यापाराचे धोरण स्वीकारण्याबरोबरच आर्थिक आणि व्यापारी हितसंबंधांच्या रक्षणाला या राष्ट्रांनी प्राधान्य दिले. आर्थिक आणि व्यापारी विकासासाठी परकीय गुंतवणूक आकर्षित करणे, आर्थिक आणि व्यापारी विकासासाठी महासत्तांशी चांगले संबंध प्रस्थापित करून त्यांच्याकडून सवलती मिळवणे यांसारख्या उद्दिष्टांना प्राधान्य देण्यात आले. यामधूनच विभागीय व्यापारसंघ निर्माण होऊन प्रादेशिक हितसंबंधांना महत्त्व प्राप्त झाले. हा अलिप्ततावादी चळवळीला बसलेला महत्त्वाचा धक्का होता.

३. संपूर्ण खंडाचे सामूहिक हितसंबंध जोपासण्यापेक्षा व्यक्तिगत आणि प्रादेशिक हितसंबंध जोपासण्याला आशिया व आफ्रिका खंडांतील राष्ट्रांनी प्राधान्य दिले. हे करत असताना अमेरिका किंवा पश्चिम युरोपीय आर्थिक महासत्तांच्या विरुद्ध संघर्ष करण्याच्या मनःस्थितीमध्ये ही राष्ट्रे नव्हती. अण्वस्त्रप्रसारबंदी कराराला मुदतवाढ देण्यासाठी जे मतदान संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या व्यासपीठावरून घेण्यात आले, त्या वेळी अलिप्ततावादी राष्ट्रांनी मुदतवाढीच्या बाजूने मतदान करून अलिप्ततावादी चळवळीला धक्का दिलेला दिसतो.

४. संपूर्ण निःशस्त्रीकरण हे या चळवळीचे प्रमुख तत्त्व आणि उद्दिष्ट आहे. ही चळवळ सुरुवातीपासून संपूर्ण निःशस्त्रीकरणाची मागणी करत आलेली आहे. एन.पी.टी. व सी.टी.बी.टी. हे दोन्ही करार भेदभावावर आधारलेले होते. शिवाय काही राष्ट्रांचा आण्विक एकाधिकारशाही निर्माण करण्याचा त्यामागे स्वार्थी हेतू आहे, असे असतानाही अलिप्तवादी चळवळीतील बहुसंख्य राष्ट्रांनी या करारांना मुदतवाढ मिळावी, या बाजूने मतदान केले. त्यामुळे या चळवळीमध्ये फूट पडली. हाही अलिप्ततावादी चळवळीचा पराभव मानला जातो.

५. अलिप्ततावादी चळवळीच्या उदय व विकासात भारताचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. याच अलिप्ततावादी चळवळीतील राष्ट्रांनी भारताचा विश्वासघात केलेला दिसतो. उदा. सन १९९६ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सुरक्षा परिषदेच्या हंगामी सदस्यपदासाठी भारत आणि जपान यांच्यामध्ये निवडणूक झाली. यामध्ये बहुसंख्य अलिप्त राष्ट्रांनी जपानच्या बाजूने मतदान करून भारताचा पराभव घडवून आणलेला दिसून येतो.

६. शीतयुद्धाच्या विघटनानंतरच्या भारतीय परराष्ट्रीय धोरणाचा आढावा घेतल्यास, भारताकडूनही वेळोवेळी अलिप्ततावादी तत्त्वांचा भंग झालेला दिसतो. भारताचे परराष्ट्रीय धोरण गेल्या काही दिवसांपासून अमेरिकेकडे झुकलेले दिसते. उदा. सन २००१ नंतर अमेरिकेने दहशतवादाविरोधी उघडलेल्या मोहिमेला भारताने समर्थन दिलेले आहे. विभागीय महासत्ता म्हणून पुढे यावे, ही भारताची महत्त्वाकांक्षा आहे. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सुरक्षा परिषदेमध्ये कायम सदस्यत्व मिळवण्यासाठी भारताचे प्रयत्न चालू आहेत. भारताचे हे प्रयत्न किंवा महत्त्वाकांक्षा अमेरिकेच्या सहकार्याशिवाय पूर्ण होणार नाही, याची जाणीव भारताला आहे.

७. सन १९९८ मध्ये भारताने पाच अणुचाचण्या घेतल्या. भारताचे हे कृत्य अलिप्ततावादी तत्त्वांचा भंग करणारे किंवा अलिप्ततावादी विचारधारेच्या विरुद्ध होते. कारण भारत निःशस्त्रीकरणाचे प्रयत्न सतत करत आलेला आहे. त्याच भारताकडून निःशस्त्रीकरणाच्या तत्त्वांचा भंग झाला.

८. अलिप्ततावादी चळवळ शीतयुद्धानंतर नामधारी बनली. कारण या चळवळीच्या व्यासपीठावरून अनेक ठराव मंजूर करण्यात आले. पण या ठरावरूपी प्रश्नांसंबंधी कोणत्याही प्रकारची प्रत्यक्ष कृती किंवा प्रयत्न अलिप्ततावादी राष्ट्रांकडून झालेले नाहीत. यामागचे महत्त्वाचे कारण म्हणजे घेतलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक यंत्रणा या संघटनेकडे नाही. तात्पर्य, अलिप्ततावादी चळवळीतील राष्ट्रांमध्ये सहकार्य प्रस्थापित करण्यात या चळवळीला अपयश आले. त्याचप्रमाणे या कारणांमुळे अलिप्ततावादी चळवळीच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झालेले आपणांस दिसून येते. या चळवळीतील राष्ट्रे सामूहिक हितसंबंधांपेक्षा व्यक्तिगत आणि उपविभागीय हितसंबंधांना अधिक प्राधान्य देताना दिसून येतात.

**अलिप्ततावादी चळवळीची उपयुक्तता :**

वरील अनेक कारणांमुळे अलिप्ततावादी चळवळीचे अस्तित्व जरी धोक्यात आले असले, तरीदेखील ही चळवळ अद्यापतरी कालबाह्य ठरलेली नाही. अलिप्ततावादी चळवळ ही फक्त नवीन स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांना अमेरिका व सोव्हिएत रशिया यांच्यातील शीतयुद्धाच्या राजकारणापासून अलिप्त ठेवणारी नव्हती, तर न्याय्य जागतिक रचनेचा तिचा उद्देश होता. इंग्लंड व फ्रान्स यांच्या दीर्घ गुलामगिरीतून मुक्त झालेली राष्ट्रे ही गरीब, अविकसित आणि विकसनशील अशा स्वरूपाची आहेत. त्या राष्ट्रांना आर्थिक आणि सामाजिक न्याय किंवा पाया मजबूत करून देण्यासाठी ही चळवळ विकसित झालेली होती. शिवाय ही चळवळ न्याय्य जागतिक रचनेच्या निर्मितीसाठी सदैव प्रयत्नशील राहिली.

आशिया आणि आफ्रिका खंडांतील राष्ट्रांचा आर्थिक व सामाजिक पाया मजबूत करण्यासाठी किंवा त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी न्याय्य जागतिक रचनेच्या निर्मितीसाठी खालील उद्दिष्टांची पूर्तता होणे आवश्यक आहे. तरच आजच्या जागतिक रचनेत अलिप्ततावादी चळवळ उपयुक्त आणि प्रासंगिक ठरेल. ही उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

**१. उद्दिष्टांची पूर्तता:** अलिप्तता हे ध्येय नाही, ही चळवळ म्हणजे एक धोरण आहे. राष्ट्रीय मूल्यांचे जतन करणे, हे या चळवळीतील प्रत्येक राष्ट्राचे धोरण आहे. ही चळवळ त्यासाठी फक्त एक माध्यम आहे. त्यामुळेच ही चळवळ आंतरराष्ट्रीय जीवनाचे महत्त्वपूर्ण स्वरूपाचे अंग बनली आहे. आपल्या सर्वांगीण विकासासाठी जगातील कोणाकडूनही मदतीची अपेक्षा करणे, पण ही मदत घेत असताना आपले स्वातंत्र्य, आपली इच्छा गहाण टाकली जाणार नाही, याची खबरदारी घेणे म्हणजे अलिप्ततावाद होय. या चळवळीच्या सर्व उद्दिष्टांची अजूनही पूर्तता झालेली नाही. ते कार्य अजूनही अपूर्ण आहे, म्हणून या चळवळीची उपयुक्तता आणि प्रासंगिकता आजच्या स्थितीतही तितकीच महत्त्वपूर्ण आहे.

**२. सर्वांगीण विकास:** नवीन स्वतंत्र झालेल्या, नवोदित तसेच तिसऱ्या जगातील राष्ट्रांचा अद्यापही सर्वांगीण विकास झालेला नाही. अशा राष्ट्रांचा राजकीय, सामाजिक आणि आर्थिक विकास अजून बराच व्हावयाचा आहे, म्हणून हे धोरण त्यांना उपयुक्त ठरेल. तसेच अविकसित व मागासलेल्या राष्ट्रांना आर्थिक लाभाचा उपयोग करून घ्यावयाचा आहे. राजकीय क्षेत्रातील यश आर्थिक क्षेत्रात रूपांतरित करणे अजूनही पूर्ण झालेले नाही. विकसित आणि अविकसित राष्ट्रांतील दरी दूर करण्यासाठी बड्या राष्ट्रांचे वर्चस्व झुगारून परस्पर सहकार्य व विकासाचे कार्य राष्ट्राराष्ट्रांना अजूनही पार पाडायचे आहे. मानवजातीच्या प्रगतीसाठी, गरिबी व श्रीमंती यांतील अंतर कमी करण्यासाठी या चळवळीचा उपयोग करून घ्यावयाचा आहे. या सर्व परिस्थितीचा विचार करता या चळवळीची उपयुक्तता अजूनही संपलेली नाही.

**३. बहुकेंद्री जागतिक रचनेची निर्मिती:** बहुकेंद्री जागतिक रचनेची निर्मिती आर्थिक आणि सामाजिक पाया मजबूत करण्यासाठी किंवा न्यायाच्या प्राप्तीसाठी गरजेची आहे. बहुकेंद्री जागतिक रचनेच्या निर्मितीतूनच अमेरिका व तिच्या मित्र राष्ट्रांची एकाधिकारशाही कमी होणार आहे. बहुकेंद्री जागतिक रचना ही शह-प्रतिशहामधून सत्तासमतोल करणारी आहे. बहुकेंद्री जागतिक रचनेच्या निर्मितीसाठी चीन, रशिया आणि

भारतासारख्या मोठ्या राष्ट्रांकडून जे प्रयत्न सुरू आहेत, त्यांना सर्व अविकसित राष्ट्रांनी म्हणजेच अलिप्ततावादी राष्ट्रांनी पाठिंबा द्यायला हवा. बहुकेंद्री जागतिक रचनेच्या निर्मितीमधून आशिया व आफ्रिका खंडांतील गरीब राष्ट्रांना आर्थिक आणि सामाजिक न्याय प्राप्त होणार आहे, तसेच त्यांचा आर्थिक व सामाजिक पाया मजबूत होण्यास मदत होणार आहे. याचसाठी या चळवळीची उपयुक्तता अजूनही संपलेली नाही.

**४. संयुक्त राष्ट्रांचे लोकशाहीकरण:** शीतयुद्धानंतरच्या काळात संयुक्त राष्ट्रांच्या लोकशाहीकरणाचा प्रश्न उग्र बनला. संयुक्त राष्ट्रांतील अमेरिकेचे वर्चस्व कमी करण्यासाठी तसेच अमेरिकेचा एकाधिकार नष्ट करण्यासाठी तिचे लोकशाहीकरण होणे गरजेचे आहे. १९१ सदस्यांपैकी जवळजवळ ११३ सदस्य हे अलिप्ततेचा स्वीकार केलेली राष्ट्रे आहेत. याचाच अर्थ असा होतो की, या संघटनेत २/३ बहुमत अलिप्त राष्ट्रांचे आहे. ही सर्व राष्ट्रे आपापसांतील मतभेद दूर करून जर एकत्र आली, तर संयुक्त राष्ट्रांचे लोकशाहीकरण अवघड नाही. संयुक्त राष्ट्रांच्या लोकशाहीकरणांतर्गत पहिली पायरी म्हणजे सुरक्षा परिषदेचा विस्तार होय. अमेरिका व युरोपियन राष्ट्रांचे बहुमत सुरक्षा परिषदेमध्ये आहे. आशिया, आफ्रिका व लॅटिन अमेरिकेतील १०० हून जास्त राष्ट्रे संयुक्त राष्ट्राचे सदस्य असताना सध्या चीन हे एकमेव राष्ट्र सुरक्षा परिषदेमध्ये त्यांचे प्रतिनिधित्व करीत आहे. संयुक्त राष्ट्रातील या राष्ट्रांच्या प्रमाणानुसार सुरक्षा परिषदेमध्ये त्यांना प्रतिनिधित्व मिळायला हवे, म्हणून सुरक्षा परिषदेचा विस्तार करून विकसनशील राष्ट्रांना त्यामध्ये सामावून घेण्यासाठी अलिप्ततावादी चळवळीकडून सामूहिक प्रयत्न व्हायला हवेत. याचसाठी या चळवळीची उपयुक्तता अजूनही संपलेली नाही.

**५. जागतिक व्यापाराची सर्वसामान्य नियमावली तयार करणे :** जागतिक व्यापाराची सर्वसामान्य नियमावली तयार करण्यासाठी सन १९९६ पासून विकसित आणि विकसनशील राष्ट्रांनी एकत्र येऊन जागतिक व्यापार संघटनेच्या व्यासपीठावरून चर्चेला सुरुवात केली आहे. आपल्या प्रभावाचा, आपल्यासाठी सोईस्कर नियम बनवण्याचा प्रयत्न विकसित राष्ट्रे करीत आहेत. तसेच विकसित राष्ट्रे बालकामगार, मानवाधिकार, पर्यावरण रक्षण यांसारखी कारणे पुढे करून विकसनशील राष्ट्रांच्या व्यापारावर मर्यादा घालण्याचे प्रयत्न करीत आहेत. विकसनशील राष्ट्रांना विकसित राष्ट्रांचे हे प्रयत्न हाणून पाडण्यासाठी अलिप्ततावादी चळवळीच्या माध्यमातून एक होऊन सामूहिक प्रयत्न करायला हवेत. विकसनशील राष्ट्रांची सौदेबाजीची क्षमता ते एकत्र आल्याने वाढणार आहे. आर्थिक व सामाजिक न्याय मिळवायचा असेल आणि नवीन आर्थिक जागतिक रचनेचे स्वप्न साकार करावयाचे असेल, तर परत एकदा विकसनशील राष्ट्रांनी अलिप्तता चळवळीमध्ये एकत्र यावयास हवे, म्हणूनच या चळवळीची उपयुक्तता अजूनही संपलेली नाही.

**६. शोषणातून मुक्त होणे:** भांडवलशाही व साम्राज्यवादी राष्ट्रांनी शोषणातून मुक्त होण्यासाठी या चळवळीची कास धरली. पण ते कार्य पूर्णपणे संपलेले आहे. असे अजूनतरी म्हणता येणार नाही. शोषणाचे अनेक मार्ग व विविध रूपे आजही अस्तित्वात आहेत. याचसाठी या चळवळीची उपयुक्तता आजही आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाचे लोकशाहीकरण, दक्षिण गोलार्धातील राष्ट्रांचे ऐक्य व नवी न्याय्य जागतिक अर्थव्यवस्था ही उद्दिष्टे समोर ठेवून कार्य केल्यास अलिप्त राष्ट्र चळवळीस उज्ज्वल भवितव्य आहे, यात शंका नाही. 'Non-aligned Movement- NAM is Relevant!' संयुक्त राष्ट्र सरचिटणीस डॉ. ब्युट्रोस घाली यांनी अलिप्त राष्ट्र चळवळीची आवश्यकता प्रतिपादन करीत असताना म्हटले होते की, NAM is needed to give developing countries and the people of the Third World to express their demands and permit them to conduct, collectively, the difficult negotiations which the contemporary world requires.

वरील उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी आशिया व आफ्रिका खंडांतील राष्ट्रांनी एकत्र येऊन सामूहिक सौदेबाजी क्षमता वाढवण्यावर भर दिला पाहिजे. अलिप्ततावादाची उपयुक्तता आणि प्रासंगिकता आजच्या स्थितीतही तितकीच महत्त्वपूर्ण आहे.

## ३.४ स्वयं-अध्ययन प्रश्न

अ) योग्य पर्याय निवडा.

१. अलिप्तता म्हणजे ...............होय.

(अ) तटस्थता (ब) राजकारणापासून अलिप्त

(क) निष्क्रियता (ड) क्रियाशील तटस्थता

२. खालीलपैकी .................. हे अलिप्ततावादी चळवळीचे वैशिट्य नव्हते.

(अ) प्रसंगानुसार कारवाई करण्याचे स्वातंत्र्य

(ब) निर्भयतेचे धोरण

(क) स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्व यावर आधारलेले धोरण

(ड) शीतयुद्धातील एखाद्या गटाला पाठिंबा देणे

३. बेलग्रेड ही ........... या देशाची राजधानी आहे.

(अ) अमेरिका (ब) भारत (क) युगोस्लाव्हिया (ड) इजिप्त

४. अलिप्तवादी राष्ट्रांची दुसरी शिखर परिषद .............साली आयोजित केली गेली.

(अ) १९६० (ब) १९६२ (क) १९६४ (ड) १९६६

ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. 'अलिप्तवादाचे उद्गाते' म्हणून कोणास संबोधले जाते?

२. बाडुंग परिषदेचे आयोजन केव्हा करण्यात आले?

३. अलिप्तवादी राष्ट्रांची पहिली शिखर परिषद कोठे भरविण्यात आली?

४. अलिप्तवादी राष्ट्रांच्या पहिल्या शिखर परिषदेस किती राष्ट्रांचे सभासद उपस्थित होते?

**स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे**

अ) योग्य पर्याय निवडा.

१. (ड) क्रियाशील तटस्थता

२. (ड) शीतयुद्धातील एखाद्या गटाला पाठिंबा देणे

३. (क) युगोस्लाव्हिया

४. (क) १९६४

ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. पंडित जवाहरलाल नेहरू

२. १९५५

३. बेलग्रेड

४. २५

## ३.५ सरावासाठी स्वाध्याय

अ) दिर्घोत्तरी प्रश्न.

१. अलिप्ततावादी चळवळीची तत्त्वे आणि उद्दिष्टे स्पष्ट करा.

२. अलिप्ततावादी चळवळीतील पंडित जवाहरलाल नेहरूंच्या नेतृत्वाची सविस्तर चर्चा करा.

३. अलिप्ततावादी चळवळीची प्रासंगिकता स्पष्ट करा.

ब) टिपा लिहा.

१. पंचशील करार

२. जोसेफ टिटो

३. गमाल अब्दुल नासर

## ३.६ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


१. आचार्य धनंजय, विसाव्या शतकातील जग, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००७

२. वैद्य सुमन, शांता कोठेकर, आधुनिक जग (१९४५-२०००), श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

३. जोशी पी. जी., विसाव्या शतकाचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर

४. कदम य. ना., विसाव्या शतकातील जग, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

५. तोडकर बी. डी., आंतरराष्ट्रीय संबंध – महत्त्वाच्या संकल्पना, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २०१२.

६. Mahajan V. D., History of Modern Europe, S. Chand of Co, Ltd., New Delhi, 1974.

७. Nanda S. P., History of the Modern World, Anmol Publication, New Delhi, 1998

८. Meiser Stanley, United Nations: The first-fifty years, New York, 1995

९. Yoder Amos, The Evolution of the United Nations System, New York, 1993

१०. Bennett A. Lerox, International Organization, Englewood Cliff. (N.J.), 1980

❑❑❑

## घटक ४
# इतर महत्त्वाच्या संघटना

**अनुक्रमणिका**

४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय - विवेचन

४.२.१ खनिज तेल उत्पादन आणि निर्यात करणारी बहुराष्ट्रीय संघटना (OPEC)

४.२.२ दक्षिण आशियाई प्रादेशिक सहयोग संघटना (SAARC )

४.२.३ जागतिक व्यापार संघटना (WTO)

४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.४ स्वयं - अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.५ सारांश

४.६ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## ४.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला -

- खनिज तेल उत्पादन आणि निर्यात करणारी बहुराष्ट्रीय संघटना कोणती ते समजेल.
- या बहुराष्ट्रीय संघटनेचे कोणकोणत्या देशाबरोबर संबंध होते ते समजेल.
- दक्षिण आशियाई प्रादेशिक सहयोग संघटनेची उद्दिष्टे व तत्वे विशद करता येतील
- सार्क संघटनेचे प्रशासन कसे आहे ते स्पष्ट करता येईल.
- जागतिक व्यापार संघटनेची स्थापना कशी झाली हे समजेल.
- जागतिक व्यापार संघटनेची उद्दिष्टे स्पष्ट करता येतील.
- जागतिक व्यापार संघटनेची भूमिका व कार्य विशद करता येईल.

## ४.१ प्रास्ताविक

२० वे शतक म्हणजे केवळ पहिले महायुद्ध, दुसरे महायुद्ध व नंतर निर्माण झालेले शीतयुद्ध, शस्त्रास्त्र स्पर्धा, लष्करी गट दहशतवाद, आंतरराष्ट्रीय शांतता व असुरक्षिततेचे शतक नव्हते, तर २० वे शतक हे भांडवलशाहीने जन्माला घातलेले व साम्राज्यशाहीने दूरवर प्रसारित केलेल्या एका वैश्विक मानवी संस्कृतीच्या उदयाचे शतक होते. असे म्हटले जाते. त्यामुळेच गतिमानता व अभिसरणता ही २०व्या शतकाची प्रमुख वैशिष्ट्ये होती. या शतकाने साम्राज्यशाहीच्या मार्फत पश्चिमेकडील प्रबोधन चळवळीतून उदयाला आलेली आधुनिक जीवनमूल्ये प्रसारित केली. मानव हा चिंतनाचा व अभ्यासाचा मुख्य विषय ठरला. २०व्या शतकात स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांनी मध्ययुगीन अंधकारमय युगाची कात टाकून दिली व आधुनिकतेच्या दिशेने वाटचाल सुरु केली. या इतिहासातील आधुनिकतेमुळे विज्ञान युगामुळे, जग जोडण्याच्या प्रक्रियेमुळे राष्ट्राराष्ट्रात सहयोगाची गरज तीव्रतेने वाटू लागली.

व्यापारवाद, व्यापारी क्रांती वसाहतवाद, आर्थिक साम्राज्यवाद या आधुनिक आर्थिक व राजकीय मुल्यांमुळे जग जोडण्याची प्रक्रिया जोमाने सुरू झाली. प्रभावक्षेत्र निर्मितीमुळे राजकीय महत्त्वाकांक्षा विकसित झाल्या.

सध्या भारतातच नव्हे तर जगभर महागाईचा आगडोंब उसळलेला आहे. भारतातल्या व्यक्तीला जर आपण सांगितले की, या महागाईच्या मागे ओपेकचा हात आहे, तर त्यावर चटकन विश्वास बसणार नाही. परंतु हे सत्य आहे. साऱ्या जगाला महागाईच्या संदर्भात वेठीला धरण्याचे कार्य ओपेक करीत आहे. अशी ही खनिज तेलाचे उत्पादन आणि निर्यात करणारी ही एक बहुराष्ट्रीय संघटना आहे. यामध्ये १३ सभासद देश आहेत.

आंतरराष्ट्रीय शांतता व सहयोग या दृष्टीकोनातून व इतर काही हेतूने काही क्षेत्रीय संघटना उदयाला आल्या. त्यात आर्थिक, राजकीय, लष्करी संघटनाबरोबरच अमेरिका खंडातील संघटना अस्तित्वात आल्या. सन १९८५ मध्ये काही उद्दिष्टे लक्षात ठेवून दक्षिण आशियाई प्रादेशिक सहयोग संघटना – 'सार्क' ही संघटना अस्तित्वात आली.

जागतिक व्यापार संघटना (WTO) ही वेगवेगळ्या देशांच्या सरकारमधील व्यापारविषयक बोलणी घडवून आणणारी कायमस्वरूपी संघटना असून ती जगातील वस्तू आणि सेवांच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचे नियमन करते. WTO चे मुख्यालय जिनेव्हा, स्वित्झर्लंड येथे आहे. जागतिक व्यापारातील आचरसंहिता निश्चित करण्याचे काम ही संघटना करते. आपल्या अखत्यारीतील बहुराष्ट्रीय व्यापार करारातील उद्दिष्टे मार्गी लावण्याच्या दृष्टीने WTO अंमलबजावणी, प्रशासन, कार्यवाही आणि साधने यासाठी निश्चित चौकट आखून देते.

## ४.२ विषय – विवेचन

### ४.२.१ खनिज तेल उत्पादन आणि निर्यात करणारी बहुराष्ट्रीय संघटना (OPEC)

**पार्श्वभूमी :** खनिज तेलाचे उत्पादन आणि निर्यात करणारी ही एक बहुराष्ट्रीय संघटना आहे. तेरा सभासद देश असलेल्या 'ऑर्गनायझेशन ऑफ द पेट्रोलियम एक्सपोर्टिंग कंट्रीज' (OPEC) या संस्थेची स्थापना सप्टेंबर १९६० मध्ये बगदाद येथे झाली व जानेवारी १९६१ मध्ये इराक, इराण, सौदी अरेबिया, कुवेत आणि व्हेनेझुएला या पाच देशांनी या संस्थेची औपचारिक संरचना केली. त्यानंतर त्यात कतार (१९६१), इंडोनेशिया व लिबिया (१९६२), संयुक्त अरब अमिराती (१९६७), अल्जीरिया (१९६९), नायजेरिया (१९७१), एक्वादोर (१९७३), गॅबाँ (१९७५), आणि अंगोला (२००७) या देशांची भर पडली. ओपेक अंतर्गत देश जगातील ४२ टक्के तेल उत्पादन करतात आणि ७३ टक्के साठ्यात भागीदार आहेत. त्यामुळे तेलाच्या जागतिक किमतींवर त्यांचे नियंत्रण असते. त्याआधी अमेरिकेचे वर्चस्व असणाऱ्या सात आंतरराष्ट्रीय कंपन्या (सेव्हन सिस्टर्स) ही किंमत ठरवित असत. ओपेकच्या उत्पादन आणि साठ्याचा दोन तृतीयांश भाग इराणच्या आखातातील सहा मध्य-पूर्व देशांपाशी आहे. फेब्रुवारी २०१४ मध्ये अल्जीरिया, एक्वादोर, इराण, इराक, कुवेत, लिबिया, नायजेरिया, कतार, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती व व्हेनेझुएला हे देश ओपेकचे सभासद होते.

**४.२.१.१ रचना आणि कार्यप्रणाली :** खनिज तेलाच्या धोरणांमध्ये एकसूत्रीपणा आणि बाजारपेठेत स्थिरता आणणे; ग्राहकांना निश्चित, सक्षम आणि नियमित तेलाचा पुरवठा करणे; तेल उत्पादकांना नियमित स्वरूपाची अर्थप्राप्ती आणि व्यवसायात आर्थिक गुंतवणूक करणाऱ्यांना योग्य त्या नफा प्राप्तीची शाश्वती देणे, ही ओपेकची प्रमुख उद्दिष्टे आहेत.

या संस्थेचे सर्वोच्च अधिकार ओपेक परिषदेकडे असतात. सभासद देशांच्या खनिज तेल, खाण उद्योग अथवा ऊर्जा खात्याचे मंत्री तिचे सदस्य असतात. संस्थेचा प्रमुख कार्यकारी हा महासचिव (सेक्रेटरी जनरल) असतो. व्हिएन्नामध्ये दरवर्षी दोनदा ओपेक परिषद भरते. 'एक सभासद-एक मत' आणि सर्वसंमती ही तत्त्वे पाळली जातात.

सर्व देश समान सभासदशुल्क देतात. खनिज तेलाच्या व्यापारात सर्वाधिक नफा कमावणाऱ्या आणि बाजारपेठेतील चढउतारावर वर्चस्व राखणाऱ्या सौदी अरेबियाकडे साहजिकच ओपेकचे अलिखित नेतृत्व आहे.

नैसर्गिक संसाधने आणि जागतिक वर्चस्वाच्या बाबतीत ओपेकच्या सभासदांनी स्वतः वेळोवेळी नुकसान सोसले आहे. त्यामुळे संस्थेचे आंतरराष्ट्रीय संबंध आणि निर्णय यांची कदर केली जाते. परंतु सभासद देशांनी तेल उत्पादनावर ठेवलेल्या मर्यादित नियंत्रणामुळे बाजारात तेलाच्या किंमतीत वाढ होते आणि त्याकरवी ओपेकच्या महसुलात आणि अनुषंगाने त्यांच्या संपत्तीत वृध्दी होते. जागतिक अर्थव्यवस्थेवर याचे दूरगामी आणि दीर्घकालीन परिणाम होणे साहजिक आहे. उत्पादन कमी केले, तर उत्पादनाच्या किमती

वाढतात. या कार्यकारणभावाचे परिणाम वेळोवेळी खनिज तेल पुरवठ्यात मोठ्या प्रमाणात कपात करण्याच्या ओपेकच्या निर्णयात दिसून येतात.

**४.२.१.२ योगदान :** संघटनेच्या स्थापनेनंतर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील तेल उत्पादनाचे प्रमाण आणि गुणवत्तेच्या संबंधी माहिती पुरवण्यामध्ये ओपेक सतत कार्यरत आहे. 'जॉईंट ऑर्गनायझेशन डेटा इनिशिएटिव्ह' (JODI) ही ओपेकची सहसंघटना एकंदरीत जागतिक खनिज तेल बाजारपेठेबद्दलची ९० टक्के माहिती उपलब्ध करून देते आणि 'गॅस एक्सपोर्टिंग कंट्रीज फोरम' (GECF) च्या मदतीने जागतिक बाजारपेठेतील नैसर्गिक संसाधनांबद्दलचा ९० टक्के अहवाल या संस्थेतर्फे सादर केला जातो. नैसर्गिक संसाधने उत्पादन करणाऱ्या व्यावसायिकांना त्यांच्या सुरळीत कार्यप्रणालीसाठी आणि भावी आयोजनासाठी (ज्याच्यासाठी कधीकधी कित्येक महिने लागू शकत होते) त्यांना या अहवालाचा निश्चितपणे फायदा होतो. दरवर्षी ओपेकतर्फे 'वर्ल्ड आऊटलूक' या नावाचा विश्लेषणात्मक अहवाल प्रसिद्ध केला जातो. यामध्ये मध्यम आणि दीर्घकाळी तेल उत्पादनाची मागणी आणि पुरवठा यांवर नजर ठेवून तेल उत्पादनाचे व्यापक विश्लेषण केले जाते. याखेरीज 'आर्थिक बुलेटिन' (SB), ओपेक बुलेटिन आणि 'तेल बाजारपेठ मासिक अहवाल' प्रकाशित केले जातात.

'कच्चे तेल (Crude Oil) दंडमापन' हे पेट्रोलियम प्रमाणित उत्पादनाचे आधारभूत मानले जाते. ज्यामुळे तेल बाजारपेठेतील ग्राहक आणि उत्पादकांसाठी तेलाच्या किमती ठरवण्यास मदत होते. तसेच सन १९८३ पासून वायदेबाजारातील करारपत्रांचे नियमन करण्यासाठी या दंडमापनाचा उपयोग होतो. काही वेळेस थोडे का होईना, एका बॅरलमागे काही अमेरिकन डॉलर्सचा फरक पडतो. हा फरक उत्पादनातील विविधता, दर्जा, त्याचे वितरण, त्या ठिकाणाची कायदेशीर आवश्यकता या अनेक गोष्टींवर अवलंबून असतो. उत्पादन प्रदेश आणि त्यातील विविधता लक्षात घेऊन हे मापदंड ओपेकने ठरविले आहेत.

सन १९७५ पासून 'आंतरराष्ट्रीय विकास निधी' (ओपेक फंड फॉर इंटरनॅशनल डेव्हलपमेंट, OFID) प्रकल्पाच्या माध्यमातून जगातील अनेक गरीब देशांना ओपेकने मदतीचा हात दिला आहे. अजूनपर्यंत त्यांनी या प्रकल्पासाठी ६९०० अब्ज अमेरिकन डॉलर्स एवढा खर्च केला आहे. कमी उत्पन्न असलेल्या १३७ पेक्षाही जास्त देशांना OFID ने मदत पुरविली आहे.

**४.२.१.३ ओपेक देश – उद्दिष्टे**

ओपेकची मुख्य उद्दिष्टे पुढीलप्रमाणे:

- पेट्रोलियम उत्पादकांसाठी न्याय्य आणि स्थिर किंमती मिळविण्यासाठी सदस्य देशांमधील पेट्रोलियम धोरणांचे एकीकरण आणि समन्वय साधणे.
- ग्राहक राष्ट्रांना पेट्रोलियमचा कार्यक्षम, आर्थिक आणि नियमित पुरवठा सुनिश्चित करणे आणि गुंतवणुकीचा पुरेसा परतावा देणे.
- पेट्रोलियम पदार्थांची निर्यात करणाऱ्या देशांच्या धोरणांत समानता आणणे.

- पेट्रोलियम क्षेत्रात गुंतवणूक करणाऱ्या (उत्पादन व संशोधन) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय उद्योजकांचे आर्थिक हितसंरक्षण करणे.
- पेट्रोलियम पदार्थांची आयात करणाऱ्या देशांना योग्य दरात व नियमित इंधन पुरवठ्याची हमी देणे.

**४.२.१.४ भवितव्य :** ओपेकचे सदस्य म्हणून आपल्या उद्दिष्ट आणि ध्येयावर काम करत असताना त्यातील काही देशांनी मात्र आपल्या स्वतःच्या आर्थिक गरजेनुसार स्वतःचे तेल उत्पादन वाढवून तेलांच्या किमतींवर सवलत देण्यास सुरुवात केली. या अंतर्गत फसवणुकीचा विपरीत परिणाम त्यांच्यातील एकजुटीवर आणि तेलाच्या जागतिक किमतींवर झाला. ओपेकच्या तेरा सभासद देशांची वैयक्तिक निर्यातकुवत, उत्पादन खर्च, तेलसाठा, भौगोलिक परिस्थिती, लोकसंख्या, आर्थिक विकास, स्वतःचे अर्थसंकल्प आणि राजकीय धोरण यांतील तफावतींमुळे संस्थेच्या धोरण निश्चितीच्या निर्णयात अडचणी येऊ लागल्या. त्यातच मध्य-पूर्व देशांमधील संघर्षाचे परिणाम भूराजनीतीवर दिसू लागले. सन १९६७ आणि सन १९७३ मधील 'अरब-इझ्राएल युद्ध, इराण-इराक युद्ध, इराकचा कुवेतवर कबजा, अमेरिकेवरील आतंकवादी हल्ला, अमेरिकेचा इराकवर ताबा इ. जागतिक घडामोडींमुळे तेल पुरवठ्यामधील व्यत्यय आणि तेलाच्या किंमतीत वेळोवेळी वाढ होणे साहजिकच आहे. असे संघर्ष आणि अस्थिरता वारंवार घडत राहिल्यामुळे ओपेकच्या दूरगामी विस्तारीकरण आणि प्रभावावर नक्कीच परिणाम झाला.

२०१६-२०१७ साली अमेरिकेने शेल गॅस उत्पादनाला सुरुवात केली. अमेरिकेच्या या नवीन उत्पादनाच्या बाजारातील विक्रमी साठ्यामुळे ओपेकच्या बाजारपेठेवरील स्वतःच्या नियंत्रण ठेवण्याच्या प्रयत्नांना धक्का पोहोचला. दिवसेंदिवस वाढीव उत्पादन आणि वाढीव साठा या अमेरिकेच्या कृतीमुळे आता बाजारात शेल गॅसचे वर्चस्व दिसू लागले आहे. त्यामुळे ओपेकचे 'कमी उत्पादन-वाढीव किंमत' हे धोरण मागे पडू लागले आहे. या निराशावादाचे पडसाद दीर्घकालीन स्वरूपात उमटू लागले आहेत. उत्पादनाचे नवनवीन प्रकल्प आणि शेल गॅसच्या उद्योगातील भरभराट यांमुळे कालांतराने तेलाचा पुरवठा जागतिक बाजारात मोठ्या प्रमाणात होऊ लागला. ओपेकच्या पारंपरिक धोरणाचा असा एकाअर्थी अमेरिकेला नकळत फायदाच झाला.

या सर्वांचा परिणाम म्हणून ओपेकची परिस्थिती कात्रीत सापडल्यासारखी झाली आहे. जास्त फायद्यासाठी जर त्यांनी कमी उत्पादनाचे जुने धोरण अवलंबिले, तर अमेरिकेची उत्पादनातील वाढ वैध राहून बाजारात अस्थिरता येण्याची शक्यता आहे. या बदलत्या परिस्थितीमुळे ओपेकचे बाजारपेठेवरील वर्चस्व किती प्रमाणात टिकून राहील, हे शंकास्पद आहे. त्याचबरोबर रशियाकडून तेल पुरवठा, इराण आणि ओपेकचे सदस्य नसलेल्या काही देशांनी बाजारात मोठ्या प्रमाणात तेलाचा पुरवठा उपलब्ध करण्यास केलेली सुरुवात, इराणचे ओपेकशी मतभेद आणि अनेक देशांनी तेल उत्पादनाचे नूतनीकरण करण्यासाठी लागणाऱ्या विकासाच्या दृष्टीने टाकलेली पावले वगैरे घडामोडींमुळे ओपेकचे भवितव्य प्रश्नचिन्हात्मक झाले आहे.

### ४.२.१.५ ओपेक देश – संक्षिप्त इतिहास

इराण, इराक, कुवेत, सौदी अरेबिया आणि व्हेनेझुएलाच्या सरकारी प्रतिनिधींनी बगदादमध्ये त्यांच्या देशांद्वारे उत्पादित कच्च्या तेलाच्या किंमती वाढवण्याच्या मार्गांवर आणि MOCs द्वारे एकतर्फी कारवाईला प्रतिसाद देण्याच्या मार्गांवर चर्चा करण्यासाठी भेट घेतली.

अमेरिकेचा तीव्र विरोध असूनही, सौदी अरेबियाने इतर अरब आणि गैर–अरब तेल उत्पादक देशांसोबत तेल उत्पादक देशांची संघटना स्थापन केली, जेणेकरून मोठ्या तेल कंपन्यांकडून सर्वोत्तम किंमत मिळावी. मुळात, अरब राष्ट्रांनी बेरूत किंवा बगदाद हे ओपेकचे मुख्यालय होण्यासाठी वकिली केली होती परंतु व्हेनेझुएलाच्या तीव्र आक्षेपामुळे, तटस्थ आधारावर, स्वित्झर्लंडमधील जिनिव्हा हे शहर निवडले गेले. स्वित्झर्लंडने राजनैतिक आश्वासन न दिल्यामुळे, OPEC चे मुख्यालय १ सप्टेंबर, १९६५ रोजी ऑस्ट्रियातील व्हिएन्ना येथे हलविण्यात आले.

१९७० च्या दशकाच्या सुरुवातीस, ओपेकच्या सदस्यत्वाचा वाटा जगभरातील तेल उत्पादनात निम्म्याहून अधिक होता.

OPEC, वर्ल्ड ऑईल आउटलुक (WOO) ५ नोव्हेंबर २०१९ रोजी व्हिएन्ना (ऑस्ट्रिया) येथील वीनर बोर्स येथे सुरू करण्यात आले. WOO ची १३ वी आवृत्ती OPEC सचिवालयाच्या मध्यम ते दीर्घकालीन अंदाज आणि जागतिक तेल आणि ऊर्जा उद्योगाच्या मूल्यांकनाच्या सखोल पुनरावलोकनाबद्दल होती. OPEC ची पुढील बैठक ५ डिसेंबर रोजी व्हिएन्ना येथील मुख्यालयात होणार आहे.

**पाच संस्थापक सदस्यांमध्ये नंतर इतर आठ सदस्य सामील झाले:**

१. कतार (१९६१)

२. इंडोनेशिया (१९६२)

३. सोशलिस्ट पीपल्स लिबियन अरब जमहीरिया (१९६२)

४. संयुक्त अरब अमिराती (१९६७)

५. अल्जेरिया (१९६९)

६. नायजेरिया (१९७१)

७. इक्वेडोर (१९७३–१९९२)

८. गॅबॉन (१९७५–१९९४)

**ओपेकचे वर्तमानकालीन सदस्य:–**

१. अल्जेरिया

२. अंगोला

३. संयुक्त अरब अमिराती (UAE)

४. व्हेनेझुएला

५. सौदी अरेबिया

६. कॉंगोचे प्रजासत्ताक

७. लिबिया

८. नायजेरिया

९. कुवेत

१०. इराण

११. इराक

१२. गॅबॉन

१३. इक्वेटोरियल गिनी

### ४.२.१.६ ओपेक देश – वाटचाल / कार्ये

१९६० ते १९७० हा ओपेकचा कालखंड शांततेचा होता. या काळात तेलाकडे निर्यातीचे साधन म्हणून पाहिले गेले. सन १९७० मध्ये जागतिक पातळीवर तेलाच्या किंमती वाढल्याने ओपेकचा प्रचंड फायदा झाला. खनिज तेल एक सामर्थ्यशाली हत्यार असल्याची कल्पना ओपेक राष्ट्रांना आली. संघटनेच्या जोरावर ओपेकने आर्थिक सूत्रे आपल्या हाती घेण्याचा प्रयत्न चालविला. आपल्या नफेखोरी वृत्तीला विधायक चेहरा देण्यासाठी त्यांनी सन १९७६ मध्ये विकसनशील देशांना आर्थिक मदत देण्यासाठी ओपेक निधी उभारला. सन १९८० मध्ये या निधीचे रुपांतर स्थायी ओपेक निधी मध्ये करण्यात आले. आंतरराष्ट्रीय विकासाकरिता आम्ही हे पैसे वापरीत आहोत अशी ओपेकची भूमिका आहे.

**ओपेकची कार्यपद्धती :**

**उत्पादकांना गुंतवणुकीवर परतावा मिळवून देणे :** OPEC सदस्य देश पेट्रोलियम बाजारात स्थिरता आणण्यासाठी आणि उत्पादकांना त्यांच्या गुंतवणुकीवर चांगला परतावा मिळवून देण्यासाठी त्यांच्या तेल उत्पादन क्रियाकलाप समायोजित करतात. हे धोरण तेल ग्राहकांना तेलाचा स्थिर पुरवठा सतत मिळत राहावा यासाठी देखील तयार करण्यात आले आहे.

**तेल बाजाराचा आढावा व सुरक्षिततेसाठी पावले उचलणे :** ऊर्जा आणि हायड्रोकार्बन व्यवहार मंत्रालय वर्षातून दोनदा आंतरराष्ट्रीय तेल बाजाराच्या स्थितीचा आढावा घेण्यासाठी आणि तेल बाजारात सुरक्षितता आणण्यासाठी पावले उचलण्यासाठी बैठक घेतात.

सदस्य देश इतर बैठका देखील घेतात. ज्यात पेट्रोलियम आणि आर्थिक तज्ज्ञ आणि पर्यावरणाच्या प्रभारी समित्या आणि पॅनेलसारख्या विशिष्ट संस्थांचा समावेश आहे. त्या विविध हितसंबंधांची काळजी घेतात.

**बदललेली परिस्थिती :** खनिज तेलाच्या भडकलेल्या किंमतींमुळे ओपेक राष्ट्रे श्रीमंत झाली. यातून औद्योगिककरण, शस्त्रास्त्रे, व्यापार, सेवा या गोष्टी सुरु झाल्या. परंतु प्रथमच एवढा पैसा महापुरासारखा आल्याने त्याचे नियोजन करणे जमले नाही. यातून ओपेक राष्ट्रांत भ्रष्टाचाराचा भस्मासुर शिरला. यातून एकेकाळी अत्यंत श्रीमंत असणाऱ्या या राष्ट्रांनी पाश्चिमात्यांकडून कर्जे घेतली ती सुद्धा अविचाराने. या कर्जाचे प्रमाण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ४०% एवढे झाले. संभाव्य संकट म्हणजेच राष्ट्रीय अर्थव्यवस्था कोसळण्याचा धोका समोर उभा राहताच ओपेक राष्ट्रांनी आपले जुनेच हत्यार उपसले. तेल उत्पादन करणाऱ्या या राष्ट्रांनी भाव वाढविले. त्याचा परिणाम तात्काळ आंतरराष्ट्रीय पातळीवर होण्यास सुरुवात झाली. खनिज तेलाच्या किंमती वाढू लागल्या की, साऱ्याच किंमती वाढतात. कर्जाची परतफेड, भविष्यासाठी राखीव निधी यासाठी ओपेक राष्ट्रांनी तेलाच्या किंमती वाढविल्या. त्याचा परिणाम ओपेक व्यतिरिक्त खनिज तेल उत्पादक देशावरही झाला. ओपेक राष्ट्रांचे तेल उत्पादन जागतिक तेल उत्पादनाच्या ४०% आहे. या ४०% पैकी १०% उत्पादन एकट्या सौदी अरेबियाचे आहे. जगात रोज ७ कोटी ५० लाख बॅरलचे उत्पादन होते. त्यापैकी ओपेक राष्ट्रे २ कोटी ६५ लाख बॅरलचे उत्पादन करतात. ६०% उत्पादन विखुरलेले असल्याने ओपेक राष्ट्रांची मक्तेदारी निर्माण झाली आहे. या प्रश्नाची दुसरी बाजू म्हणजे ओपेक गटातील राष्ट्रे अमेरिकेच्या प्रभावाखाली असल्यामुळे अमेरिकेची भूमिका निर्णायक ठरते.

**ओपेक – वर्तमान**

ओपेक प्लस (OPEC+) ने एप्रिलमध्ये पुरवठा न वाढविण्याचे मान्य केले आहे कारण ते COVID-19 साथीच्या आजारामध्ये मागणीत अधिक भरीव पुनर्प्राप्तीची वाट पाहत होते. या घोषणेनंतर क्रूडच्या किमती वाढल्या आणि या वर्षी ३३% वर आहेत.

**४.२.१.७ भारताची चिंता**

भारत हा जगातील तिसरा सर्वात मोठा तेल आयातदार देश आहे. भारत आपल्या ८४% तेलाची आयात करतो आणि तिची मागणी पूर्ण करण्यासाठी पश्चिम आशियाई पुरवठ्यावर अवलंबून असतो. कच्च्या तेलाचा वापर करणाऱ्या सर्वात मोठ्या देशांपैकी एक म्हणून, उत्पादक देशांच्या अशा कृतींमुळे उपभोगाच्या नेतृत्वाखालील वसुली कमी होण्याची आणि ग्राहकांना बाजारपेठेत नुकसान होण्याची शक्यता आहे याची काळजी वाटते.

इंटरनॅशनल एनर्जी एजन्सी (IEA) च्या मते, अमेरिका नॉर्वे आणि गयाना सारख्या देशांमधून कच्च्या तेलाच्या उत्पादनात नुकत्याच झालेल्या वाढीमुळे (OPEC+) ओपेक प्लसला मागणीत मोठी घट होऊ शकते. इंटरनॅशनल एनर्जी एजन्सीच्या आकडेवारीनुसार, जानेवारी ते जुलै या कालावधीत जागतिक मागणी गेल्या वर्षीच्या सरासरी पातळीपेक्षा १०.५ दशलक्ष बॅरल प्रतिदिन होती, ज्याचा अंदाज १०० दशलक्ष बॅरलपेक्षा जास्त आहे.

ओपेक (OPEC) आणि त्यांचे सहयोगी, एकत्रितपणे ओपेक प्लस (OPEC+) म्हणून ओळखले जातात. जानेवारी २०२१ मध्ये ७.७ दशलक्ष बॅरल प्रतिदिन (bpd) वरून सुमारे ५.७ दशलक्ष पर्यंत उत्पादनात कपात करण्याची योजना आहे. धोरण निश्चित करण्यासाठी OPEC+ ची बैठक ३० नोव्हेंबर, आणि १ डिसेंबर रोजी होणार आहे. कच्च्या तेलाची निर्यात करणाऱ्या नॉनओपेक देशांना ओपेक प्लस देश असे संबोधले जाते, ही कच्च्या उत्पादकांची युती आहे, जी २०१७ पासून तेल बाजारातील पुरवठ्यात सुधारणा करत आहेत. यात अझरबैजान, बहरीन, ब्रुनेई, कझाकिस्तान, मलेशिया, मेक्सिको, ओमान, रशिया, दक्षिण सुदान आणि सुदान यांचा समावेश आहे.

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी मंजूर केलेल्या नवीन करप्रणालीमुळे रशियाला COVID-19 साथीचा आर्थिक परिणाम सहन करण्यास मदत करण्यासाठी, ऊर्जा कंपन्यांना परिपक्व तेल क्षेत्रांमधून उत्पादन वाढवणे आणि अधिक जड क्रूडचे उत्पादन करणे अधिक महाग पडते. यामुळे रशियाचे ऊर्जा क्षेत्र तेल बाजारावर सौदी अरेबियासारख्या तेल उत्पादक देशांशी भांडण करण्याऐवजी ओपेक कंट्रीज (OPEC) आणि ओपेक प्लस OPEC+ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या त्याच्या सहयोगी देशांकडून कठोर धोरणे स्वीकारण्यास तयार होऊ शकते.

कोविड-१९ विरुद्ध अत्यंत प्रभावी लस आणि बाजार समतोल राखण्यासाठी ओपेक प्लस कडून (OPEC+) तेल आउटपुट करार समायोजित केला जाऊ शकतो. सौदी अरेबियाच्या आश्वासनानंतर जवळजवळ सहा महिन्यांतील सर्वात मोठ्या दैनंदिन नफ्यासाठी तेलाच्या किमती १०% च्या जवळपास वाढल्या.

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एका राष्ट्रीय योजनेची रूपरेषा आखली ज्यामध्ये कार्बन फूटप्रिंट असेल, इंधन म्हणून गॅसचा वापर वाढेल आणि वार्षिक तेल शुद्धीकरण क्षमता काही वर्षांत भारताची २५० वरून ४०० दशलक्ष टन होईल. भारताच्या क्रूड आयातीत जोरदार वाढ होण्याचा अंदाज असताना, अलीकडेच त्यांनी OPEC पुरवठा अन्यायकारकपणे नियंत्रीत करणार नाही अशी आशा व्यक्त करून कमी किंमती आणि दीर्घ क्रेडिट कालावधीबाबतीत योग्य सौद्यांची मागणी केली.

**ओपेक प्लसची निर्मिती :-**

जेव्हा रशियाने सन २०१६ मध्ये व्हिएन्ना करार पूर्ण केला तेव्हा रशियन नेतृत्वाचा असा विश्वास होता की तो मार्च २०१८ मध्ये रशियन अध्यक्षीय निवडणुकीसाठी देशाला तयार करण्यास मदत करेल. उच्च तेलाच्या किमतींमुळे क्रेमलिनची आर्थिक क्षमता यशस्वी निवडणूक मोहिमेचे नेतृत्व करण्याची खात्री झाली.

यामुळे शासनाचे बदलले प्राधान्यक्रम - सामान्य लोकांच्या गरजा पूर्ण करण्यापासून ते तेल उत्पादन नियंत्रित करण्यासह शक्तिशाली टायकूनसह क्रेमलिनच्या युतीची शाश्वतता सुनिश्चित करणे इ.

रशियासाठी, गटाचे औपचारिकीकरण पुतीनचा मध्य पूर्वेतील प्रभाव वाढविण्यास मदत करते तथापि, यूएस शेल उत्पादकांना फटका देण्यासाठी तेलाच्या किमतीत घट घडवून आणण्याचे या दोघांचे उद्दिष्ट आहे, ज्यांनी त्यांचा बाजार हिस्सा वाढवून ओपेक उत्पादन कपातीचा फायदा घेणे सुरू ठेवले आहे.

सौदी अरेबियासाठी, तदर्थ युतीचे औपचारिक गटात रूपांतर करणे भविष्यातील तेल-बाजारातील अशांततेपासून बचाव (संरक्षण) प्रदान करते.

मंदावलेल्या मागणीमुळे आणि बाजार स्थिर ठेवण्यासाठी ओपेकने तेल उत्पादनात कपात करण्याचा निर्णय घेतला आहे.

**आउटपुट कटचे प्रमाण :-**

एकूण कपात सुमारे १.१६ दशलक्ष बॅरल प्रतिदिन (bpd) आहे. जगातील एक तृतीयांश तेल उत्पादकांकडून उत्पादन कपात मे २०२३ मध्ये सुरू होईल आणि ती संपूर्ण वर्षासाठी राहील.

ओपेक प्लस (OPEC+) गटात येणाऱ्या रशियानेही या वर्षाच्या अखेरीपर्यंत ५००,००० (bpd) ची कपात करण्याची घोषणा केली आहे.

**आउटपुट कापण्याचा निर्णय :-**

ओपेकनुसार तेल बाजाराच्या स्थिरतेला पाठिंबा देण्यासाठी, मंदावलेल्या जागतिक अर्थव्यवस्थेचा आणि कच्च्या तेलाच्या किमतींवर अमेरिकेतील बँकिंग प्रभाव कमी करण्यासाठी आउटपुट कापण्याचा निर्णय हा एक सावधगिरीचा उपाय आहे.

या कटाचे परिणाम

- जागतिक बेंचमार्क ब्रेंटमध्ये ५% पेक्षा जास्त वाढ.
- महागाईचा दबाव आणि जागतिक मालमत्तेतील चढ-उतार.
- ओपेक व्यतिरिक्त इतर तेल उत्पादकांनी उत्पादनात केलेली घट.
- तेल बाजार तुटीत जाण्याची शक्यता

**भारतावर परिणाम**

- उच्च आयात बिले आणि महागाईत वाढ.
- चालू खात्यातील तूट वाढणे आणि भारतीय रुपयाच्या किंमतीत घट.
- जागतिक गुंतवणुकीत संभाव्य घट.

**स्वयं अध्ययन प्रश्न – १**

अ. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा .

१. ऊर्जा आणि हायड्रोकार्बन व्यवहार मंत्रालय हे वर्षातून .......... वेळा आंतरराष्ट्रीय तेल बाजाराच्या स्थितीचा आढावा घेते.

अ. २ ब. ३ क. ४ ड. ५

२. जगात रोज .......... लाख बॅरलचे उत्पादन होते.

अ. ७ कोटी ५० लाख ब. ८ कोटी ३ ० लाख

क. ५ कोटी ५० लाख ड. ३ कोटी २० लाख

३. जागतिक उत्पादनाच्या .......... उत्पादन विखुरलेले असल्याने ओपेक राष्ट्रांची मक्तेदारी निर्माण झाली आहे.

अ. ३०% ब. ४०% क. ५०% ड. ६०%

४. ओपेक (OPEC) चे मुख्यालय .......... रोजी व्हिएन्ना, ऑस्ट्रिया येथे हलविण्यात आले.

अ. १ सप्टेंबर, १९६५ ब. १ सप्टेंबर, १९६६

क. १ सप्टेंबर, १९६७ ड. १ सप्टेंबर, १९६८

५. ओपेकचे अलिखित नेतृत्व .......... या देशाकडे आहे.

अ. सौदी अरेबिया ब. इराक क. अमेरिका ड. इराण

## ४.२.२ दक्षिण आशियाई प्रादेशिक सहयोग संघटना (SAARC )

आशियाई खंडात आर्थिक विकासासाठी व सामाजिक विकासासाठी एखादी संघटना असावी असे बांगलादेशचे तत्कालीन पंतप्रधान झिया-उर-रेहमान यांना वाटत होते. यादृष्टीने त्यांनी भारत, श्रीलंका, नेपाळचा दौरा केला. यातूनच बांगलादेश, भूतान, पाकिस्तान, भारत, श्रीलंका, मालदीव, नेपाळ या सात देशांच्या परराष्ट्र सचिवांची बैठक २१ ते २३ एप्रिल, १९८१ रोजी झाली. त्यात प्रादेशिक सहकार्यासाठी नियोजन कृषी, ग्रामीण विकास, आरोग्य, लोकसंख्या, व्यापार या विषयांवर सहकार्य करण्याचे ठरविण्यात आले. ही बैठक कोलंबो येथे झाली म्हणून त्यास 'कोलंबो परिषद' म्हणतात. या विचारला आणखी गती देण्यासाठी सार्क देशातील परराष्ट्र मंत्र्याची पहिली बैठक दि. १ व २ ऑगस्ट, १९८३ मध्ये नवी दिल्ली येथे भरली. या बैठकीत सार्क संघटना स्थापन करण्याची घोषणा झाली.

**४.२.२.१ शिखर परिषद –** मंत्री पातळीवर सार्कची संकल्पना मान्य करण्यात आल्यावर सार्क देशांच्या प्रमुखांची पहिली शिखर परिषद ६ ते ८ डिसेंबर, १९८५ या दरम्यान बांगलादेशची राजधानी ढाका येथे झाली. भारताच्या वतीने पंतप्रधान राजीव गांधी उपस्थित होते. शिखर परिषद सुरू होण्यापूर्वी कृषी, ग्रामीण

विकास, दूरसंचार, आरोग्य या क्षेत्रांत काम करण्याचे ठरले होते. सार्कची कल्पना अस्तित्वात आल्यावर पुढे टपालसेवा, वाहतूक, विज्ञान-तंत्रज्ञान, क्रीडा, कला-संस्कृती या क्षेत्रांना सार्कच्या कार्यक्षेत्रात आणण्यात आले.

४.२.२.२ **सार्कची ध्येये** - सार्क परिषद यशस्वी ठरण्यासाठी भारत, नेपाळ, पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका, मालदीव, भूतान आणि अफगानिस्तान (२००७ मध्ये सदस्यत्व स्वीकारले) यांनी एकमेकांचे सार्वभौमत्व, प्रादेशिक एकता, राजकीय स्वातंत्र्य, सदस्य राष्ट्राच्या अंतर्गत प्रश्नामध्ये हस्तक्षेप न करणे ही तत्वे मान्य केली व परिषदेची ध्येये पुढीलप्रमाणे निश्चित केली.

१. सदस्य राष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी सहकार्य करणे व विकासाचा वेग वाढविणे.

२. दहशतवाद, अंमली पदार्थाची तस्करी अशा विघातक गोष्टींना विरोध करणे.

३. परस्पर विश्वास वाढविण्यासाठी सामंजस्याचे वातावरण निर्माण करून समस्यांचे निराकरण करणे.

४. समविचारी संघटनांशी (प्रादेशिक, विभागीय, आंतरराष्ट्रीय) सहकार्य करणे.

५. आंतरराष्ट्रीय पातळीवर सामायिक हितार्थ प्रयत्न करणे.

६. सामुहिक स्वावलंबना करिता विकास घडविणे.

४.२.२.३ **सार्कची रचना** – सार्कची वर्षातून एकदा बैठक होणे आवश्यक असून तिचे मुख्यालय नेपाळची राजधानी काठमांडू येथे आहे. गरज भासल्यास वर्षातून १ पेक्षा अधिक बैठका भरविता येतात. येथे एक सरचिटणीस, सात संचालक व अन्य कर्मचारी वर्ग असतो. खर्चासाठी सदस्य राष्ट्रांकडून वार्षिक वर्गणी गोळा केली जाते. सार्कच्या सदस्य राष्ट्रांत असणाऱ्या कार्यालयाचा खर्च त्या-त्या राष्ट्राने प्रामुख्याने करायचा असून अन्य खर्च सदस्य राष्ट्रांच्या वर्गणीव्दारे केला जातो. मुख्य सचिवाचा कालावधी ३ वर्षाचा असून सर्व देशांना मुख्य सचिवपदाची संधी मिळते. सन १९८५ ते १९९२ या कालखंडात सार्कची एकूण ६ अधिवेशने झाली. या अधिवेशनांच्या माध्यमातून ही राष्ट्रे जवळ येण्यास मदत झाली. एकमेकांचे प्रश्न समजून घेण्यासाठी ही अधिवेशने उपयुक्त ठरली.

४.२.२.४ **घोषणापत्र** - या सर्व राष्ट्रांनी पुढील घोषणापत्र घोषित केले. त्यातील महत्वाचा भाग 'आम्ही संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सनदेनुसार व असंलग्नतेच्या सिद्धांतानुसार (विशेषतः राष्ट्रीय स्वातंत्र्य, भौगोलिक एकता, समानता, सामर्थ्याचा उपयोग अन्य राष्ट्रांवर न करणे, अंतर्गत बाबीत हस्तक्षेप न करणे व परस्पर संघर्ष शांततामय मार्गाने सोडविणे) आचरण करू.'

**मंत्रीपरिषदेचे कार्य–**

सार्क सदस्याच्या परराष्ट्र मंत्र्याच्या समितीचे कार्य पुढीलप्रमाणे -

१. सार्क संघटनेचे धोरण

२. कार्याचा आढाव घेणे व वेळोवेळी मूल्यमापन करणे

३. सहकार्याच्या नव्या क्षेत्रांबाबत निर्णय घेणे.

४. उद्दिष्टाच्या पुर्ततेसाठी व कार्यासाठी नव्या योजना तयार करणे

५. सार्कच्या समान हितसंबंधाबाबत विविध विषयांवर निर्णय घेणे.

या मंत्र्याच्या बैठका वर्षातून दोनदा किंवा गरजेनुसार जास्त वेळा बोलवता येते.

**स्थायी समिती** – सदस्य राष्ट्रांच्या परराष्ट्र सचिवांचा या समितीत समावेश असून गरजेनुसार बैठक बोलवायची ही समिती आपला कार्य अहवाल मंत्री परिषदेला सादर करून धोरणात्मक निर्णय मंत्रीपरिषदेच्या मार्गदर्शनाने घेते. या समितीचे काम पुढीलप्रमाणे –

१. सार्कच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणे

२. सार्क प्रकल्प व कार्यक्रमांना मान्यता देणे

३. सार्कच्या कार्यक्रमांमध्ये समन्वय आणणे.

४. प्रादेशिक प्राधान्यक्रम ठरविणे.

५. नव्या क्षेत्रांतील सहकार्याच्या शक्यता तपासणे.

६. प्रादेशिक व बाह्य संसाधनाची व्यवस्था करणे.

**४.२.२.५ सार्कचे कार्य –**

वस्त्रोद्योग आणि मळे उत्पादने (उदा., ऊस, तंबाखू इत्यादी) हे लहान अर्थव्यवस्था निर्माण करीत असल्याचे हित लक्षात घ्यावे लागते. अशा उत्पादनांमध्ये भारताची संवेदनशील सूचि मोठी आहे. अशा उत्पादनामध्ये कोणत्याही प्रकारची प्रशुल्क कपात घडून येत नाही. विशेषत: भारताच्या संवेदनशील सूचिमध्ये लघुउद्योगांना साहाय्यक उत्पादने, रसायने, चर्म उत्पादने आणि इतर आरक्षित वस्तूंचा समावेश आहे. भारताने ८८४ वस्तू संवेदनशील सूचिमध्ये विकसनशील देशांकरिता ठेवलेल्या आहेत; तर न्यून विकसित देशांच्या ७६३ वस्तू आहे. शिवाय काही वस्तूंच्या निर्यातीवर बंधने आहे. बांगला देश कापडाच्या संरक्षणाबाबत पुढाकार घेत होता. कापडाच्या निर्यातीमध्ये त्याला तुलनात्मक लाभ मिळतो. मात्र या देशाला भारतामध्ये मर्यादित बाजार प्रवेश मिळालेला आहे. कोटा प्रशुल्क दराच्या अंतर्गत विशिष्ट वस्तूंवर प्राधान्याने प्रशुल्क कर आकारलेले आहेत. उदा., तयार कपडे इत्यादी.

सार्क संघटनेंतर्गत व्यापार करारांबाबत अनेक प्रश्न आहेत. द्विपक्षीय आणि प्रादेशिक व्यापार करार करण्याकरिता खर्च-लाभ दृष्टीकोनाच्या आधारावर भारताने उशिरा प्रवेश केलेला आहे. भारताने विविध व्यापार करार केल्यामुळे ते एकत्रितपणे कार्य करणार आहे. त्यामुळे विभाज्यता आणि गुंतागुंतीच्या नियमांमध्ये बेसुमार वाढ झालेली आहे. ज्यामुळे नियंत्रण आणि मान्यतेवरचा खर्च वाढत आहे. भारताचे

श्रीलंकेसोबत मुक्त व्यापार क्षेत्र सुमारे ३५ टक्के आहे. श्रीलंकेच्या सुमारे ४२९ वस्तू भारताच्या नकारात्मक सूचिमध्ये येतात भारत–भुतान मुक्त व्यापार क्षेत्र नकारात्मक यादीमध्ये येत नाही. सार्क देशांकडून होणाऱ्या निर्यातींना सार्कमध्येच आव्हाने आहेत. सार्कमधील देश न्यून प्रशुल्क दराबाबत पुढाकार घेतात. उदा., श्रीलंका वनस्पती तेल, तर बांगला देश लवंग उत्पादनाबाबत. या गुंतागुंतीच्या व्यापार नियमांचा अभ्यास होण्याची आवश्यकता आहे. तसेच मुक्त व्यापार क्षेत्राचा प्रभाव समजून घेण्याचीही आवश्यकता आहे.

सार्कच्या सभासद देशांनी मुक्त व्यापार कार्यक्रमाचा आरंभ जुलै २००६ पासून केला. ज्यामुळे दक्षिण आशियाई देशांच्या अपेक्षा वाढल्या होत्या. दक्षिण आशियाई देशांमधील परस्पर अंतर कमी झाले होते. हे अंतर कमी होण्याचा पिच्छा साफ्टा अंतर्गत पुरविला गेला होता. याकरिता सुरुवातीला दक्षिण आशिया पसंतीदर्शक व्यापार करार – साफ्टा (SAPTA - SAARC Preferential Trade Agreement) तयार करण्यात आला. यामध्ये वाटाघाटीचे निष्कर्ष आणि गाभा चाकोरीबाहेरील वादप्रश्न होते. याचा पुढचा टप्पा म्हणजे साफ्टा होता. साफ्टामध्ये प्रशुल्क उदारीरकण कार्यक्रम, मूळ नियम संवेदनशील सूचि, क्षतिपूर्ती यंत्रणा समाविष्ट होती. प्रदेशातील व्यापाराचे आकारमान उच्चतम पातळीवर नेणे आणि संबंधिताचे परीक्षण करणे याची तरतूद होती. तसेच प्रत्येक देशाला संवेदनशील सूचि करण्याची अनुमती होती. यावर भविष्यातील प्रशुल्क कपात आधारलेली होती. यामुळे भरीव प्रमाणात व्यापार होत असताना काही वस्तू व्यापारातून वगळल्या गेल्या. ज्यामुळे मुक्त व्यापार तत्त्वालाच धक्का लागला.

सार्कमधील सदस्यदेशांच्या आयात व्यापारामध्ये बिघाड निर्माण झाल्याचे अगदी स्पष्टपणे साफ्टाच्या आरंभापासून दिसून आले. प्रदेशांमध्ये व्यापार उदारीकरणाचा मर्यादित दृष्टीकोन दिसून आला. साफ्टा कराराच्या चौकटी अंतर्गत आरंभापासूनच वाटाघाटी घडून आल्या. चाकोरीबाहेरील वादप्रश्न म्हणजे प्रशुल्क उदारीकरण होय. ज्या संदर्भातील कार्यक्रम जानेवारी २००६ पासून अंमलात आणायचा होता, तो प्रत्यक्षात जुलै २००६ पासून अंमलात आणण्यात आला. सार्कमध्ये साफ्टा पूर्णपणे प्रभावी आहे. साफ्टाने स्वीकारलेला उदारीकरणाचा दृष्टीकोन २०१६ नंतर न्यून विकसित देशांनाही प्रशुल्क कपात २० टक्क्यांपर्यंत साफ्टा अंतर्गत करायची होती. त्यानंतरचा प्रशुल्क कपातीचा टप्पा म्हणजे, पुढील पाच वर्षांत प्रशुल्क कपात ०–५ टक्क्यांपर्यंत घडवून आणायची होती. त्यानंतर पुढील तीन वर्षांमध्ये न्यून विकसित देशांनी ३० टक्क्यांपर्यंत प्रशुल्क कपात करावी, तर पुढील आठ वर्षांमध्ये ती ०–५ टक्क्यांपर्यंत असावी.

सार्क सदस्य देशांकडून होणाऱ्या आयाती भारतामध्ये ३८ टक्क्यांपर्यंत वगळलेल्या आहेत. एकूण भारतीय निर्यातीचे प्रमाण साफ्टा सदस्य देशांना ५७ टक्के आहे. साफ्टामधील व्यापार सभासद देशांना नकारात्मक सूचिमधून वगळलेले आहे, तर श्रीलंकेने सार्क सदस्यदेशांकडून होणाऱ्या आयातीवर ५२ टक्क्यांपर्यंत निर्बंध लावलेले आहे. तुलनात्मक पातळीवर सार्क प्रदेशांमध्ये ४७ टक्के निर्यात विश्रामावस्थेत आहे. जो की हा विषय सदस्यदेशांच्या नकारात्मक सूचिचा आहे. यामुळे कोणत्याही प्रकाराची प्रशुल्क कपात घडून आलेली नाही.

**४.२.२.६ सार्कसमोरील आव्हाने–**

सार्क संघटनेसमोरील आव्हाने पुढीलप्रमाणे –

१. सदस्य राष्ट्रांच्या आर्थिक परीस्थीतीत प्रचंड विषमता आहे. त्यामुळे अर्थव्यवस्थेत सुधारणा करण्याचे आव्हान

२. संरक्षणावरचा खर्च कमी करण्याचे आव्हान आहे. सार्क संघटनेचे सदस्य असून सुद्धा भारत – पाकिस्तान – बांगलादेश यांच्यातील परस्पर अविश्वासाचे वातावरण संपले नाही. उलट भारत – पाकिस्तान संरक्षणावरचा खर्च वाढतच आहे.

३. दळणवळण आधुनिक करून सर्व देश एकमेकांशी जोडता येतील परंतु अजूनही हे साध्य झाले नाही.

४. सर्वच विकसनशील राष्ट्रे असल्यामुळे अर्थव्यवस्था पुरेशा प्रगत नाहीत. कृषी क्षेत्रांवर परावलंबन टिकून आहेच.

५. दहशतवादाने पाकिस्तान – अफगाणिस्तान ग्रासले आहेत तर भारतात पाक पुरस्कृत दहशतवाद चालु आहे. या व्यतिरिक्त इतर अंतर्गत संघर्ष चालू आहे.

६. लोकसंख्येचा अफाट विस्तार हे या उपखंडातील सर्वच देशांसमोरील आव्हान आहे. अजूनही त्याचा मुकाबला करता येत नाही. वाढत्या विकासाची फळे लोकसंख्या खाऊन टाकत आहे.

७. सार्क देशांमध्ये अजूनही १००% व्यापार सुरु झालेला नाही. हा व्यापार वाढण्याची गरज आहे.

८. सार्क देशांमधील राजवटी – लोकशाही, हुकुमशाही, राजेशाही, अध्यक्षीय पद्धती आशा मित्र राज्यव्यवस्था असल्यामुळे सार्क अंतर्गत विरोधी व्यवस्था आहेत. राज्यव्यवस्थेच्या जोडीलाच धार्मिक वैविध्य आहे. या राष्ट्राअंतर्गत विविध धर्म आहेत. त्यांच्या उपासना पद्धती विभिन्न आहेत. आचार – विचार भिन्न आहेत. भूतकाळ एकमेकांच्या विरुद्ध आहे.

**४.२.२.७ सार्कचे यश** – सार्कने विविध क्षेत्रात चांगली कामगिरी बजावली आहे. त्यात खालील गोष्टीचा समावेश आहे.

१. बांगलादेशाची राजधानी ढाक्का येथे सार्क कृषी माहिती केंद्राची (SAIC- SAARC Agricultural Information Centre) स्थापना करून बी–बियाणे, पशुधन, मत्स्योत्पादन या विषयांत संशोधन सुरु झाले.

२. सार्क देशांतर्गत डाकसेवा व दळवळण सुधारणेसाठी तांत्रिक समिती स्थापण्यात आली.

३. ढाक्का येथे सार्क हवामान संशोधन केंद्राची स्थापना झाली.

४. सार्क अस्थरोग निवारण केंद्र काठमांडूत सन १९९२ पासून सुरु करण्यात आले.

५. ग्रामीण विकास, विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रांसाठी एका तांत्रिक समितीची स्थापना करण्यात आली.

६. पर्यटनास चालना देण्यासाठी SAARC Scheme for Promotion of Organized Tourism योजना तयार करण्यात आली.

७. दहाव्या सार्क परिषदेत 'हिंसेच्या विरोधात महिला'(Violence Against Women) या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

८. दक्षिण आशियातील गरिबी कमी करण्यासाठी सार्कने सार्क व आशिया प्रशांत क्षेत्रीय आर्थिक व सामाजिक मंडळ (UNDP) यांच्या मदतीने प्रयत्न केले.

९. व्यापार वृद्धीसाठी उच्चस्तरिय आर्थिक सहकार्य मंडळाची स्थापना करण्यात आली.

१०. मंत्री पातळीवरील परिषदांमध्ये आंतरराष्ट्रीय आर्थिक प्रश्न, बालकल्याण, महिला, पर्यावरण, अपंग व्यक्ती, युवक, गरीब, कृषी, वाणिज्य, माहिती, दळणवळण हे विषय हाताळण्यात आले.

११. सार्क दस्तावेज केंद्राच्या माध्यमातून माहिती पुरविण्याची सोय करण्यात आली.

१२. इस्लामाबाद येथे सार्क मनुष्यबळ विकास केंद्र स्थापून मनुष्यबळ विकासाला चालना देण्यात आली.

१३. सार्क अंतर्गत दहशतवाद विरोधी प्रादेशिक करार करण्यात आले.

१४. अमलीपदार्थ व्यापार विरोधी करार, व्यापार अग्रहक्क करार, अन्नधान्य सुरक्षितता करार, युवावर्गाकरिता ठराव करण्यात आले.

**४.२.२.८ सार्क परिषदेत हाताळलेले विषय**

| अ.क्र. | वर्ष | विषय |
|---|---|---|
| १. | १९८९ | अमलीपदार्थ तस्करी व दुरुपयोग विरुद्ध लढा वर्ष |
| २. | १९९० | बालिका वर्ष |
| ३. | १९९१ | निवारा वर्ष |
| ४. | १९९२ | पर्यावरण वर्ष |
| ५. | १९९३ | विकलांग व्यक्तीसाठी वर्ष |
| ६. | १९९४ | युवा वर्ष |
| ७. | १९९५ | गरिबी निर्मूलन वर्ष |
| ८. | १९९६ | साक्षरता वर्ष |
| ९. | १९९७ | सहभागी शासन वर्ष |

**४.२.२.९ सार्क देशांचे परस्पर व्यापारी संबंध**

सार्कच्या उद्दिष्टांमध्ये दक्षिण आशियाई देशांत सामूहिक स्वावलंबन वाढविणे, आर्थिक सहकार्य वाढविणे यास विशेष महत्त्व आहे. सार्क परिषदेअंतर्गत असलेली सातही राष्ट्रे आर्थिकदृष्ट्या दुर्बल आहेत.

गरिबी, अज्ञान, परस्पर द्वेष, शत्रूत्व आदी अंगभूत दोष या देशांमध्ये असल्यामुळे व्यापारावरही त्याचा परिणाम होतो. उदाहरणार्थ, कमी किमतीत पाकिस्तानला भारतातून गहू सहज उपलब्ध होत असताना पाकिस्तान अमेरिका, ऑस्ट्रेलिया या देशांकडून गव्हाची आयात करतो. यावरून दक्षिण आशियातील व्यापाराचे स्वरूप लक्षात येते.

सार्क देशांमध्ये भारत हा सर्वात मोठा देश आहे. त्यामुळे अन्य सदस्य देशांच्या तुलनेत भारताचा व्यापारही मोठा आहे. सहाजिकच भारताच्या बाबतीत अन्य देशांची तक्रार अशी असते की, भारताकडून अधिकाधिक निर्यात झाल्यामुळे या व्यापाराचा लाभ भारतालाच अधिक होतो. व्यापारात असे संतुलन असायला हवे की, या लहान राष्ट्रांकडून भारतानेही अधिकाधिक वस्तूंची आयात करावी, प्रादेशिक विकास संतुलित होण्यासाठी व्यापारही संतुलित हवा.

सार्कच्या स्थापनेनंतर भारत व बांगलादेश यांच्यातील व्यापार एकतर्फी होता, बांगलादेशातून भारतात आयातीचे प्रमाण अगदीच नगण्य होते. याउलट १९८५-९१ या काळात भारताचा बांगलादेशातील व्यापार वाढतच आहे. यामुळे बांगलादेशाची अशी तक्रार आहे की, भारताने बांगलादेशाला अधिकाधिक मदत करून उदार दृष्टिकोन ठेवावा. दक्षिण आशियाई व्यापार अग्रहक्क (साप्टा) कराराच्या निर्मितीमुळे दोन्ही देशांना व्यापारात लाभ झाला आहे. बांगलादेशाचा सर्वाधिक व्यापार भारत व पाकिस्तानबरोबर आहे. भारत बांगलादेशाकडून त्यांच्या निर्यातीच्या ३/४ माल आयात करतो. श्रीलंकेबरोबर बांगलादेशाचा सागरी व्यापार चालतो, मात्र मालदीव, भूतान व नेपाळबरोबर बांगलादेशाचा व्यापार फारच कमी आहे. मालदीवचा आंतरराष्ट्रीय व्यापार अतिशय मर्यादित आहे. त्यामुळे बांगलादेश, नेपाळ, भूतान या देशांशीही व्यापार फार कमी आहे. मालदीवचा सर्वात मोठा व्यापार श्रीलंकेबरोबर चालतो, तसेच भारत-पाकिस्तानबरोबरही मालदीवचे व्यापारी संबंध आहेत.

नेपाळमधून कच्चा माल व कृषी उत्पादने मोठ्या प्रमाणावर निर्यात होतात. प्रारंभी नेपाळचा आयात-निर्यात व्यापार प्रामुख्याने भारताशी होता, परंतु आता अन्य सार्क देशांशीही नेपाळचे व्यापारी संबंध वाढले आहेत.

पाकिस्तानचा व्यापार भारत, श्रीलंका व बांगलादेश याच्याशी प्रामुख्याने चालतो. पाकिस्तान भारताकडून तांदूळ व औद्यागिक उत्पादनांची आयात करतो तर बांगलादेशातून ताग व श्रीलंकेतून रबर, चहा यांची आयात करतो.

राजकीय दृष्टीने व्यापाराकडे पाहिल्यास असे दिसते की, राजकीय शत्रुता, मतभेदांमुळे व्यापारावर अनिष्ट परिणाम होतो. भारत व पाकिस्तान हे परस्परांचे प्रतिस्पर्धी आहेत तर श्रीलंका, नेपाळ व पाकिस्तान हे देश परस्परांशी व्यापारीदृष्ट्या जवळीक साधून आहेत. कारण या तीनही देशांचे कोणत्या ना कोणत्या कारणाने भारताशी मतभेद आहेत. भारताच्या तुलनेत श्रीलंका व पाकिस्तान यांचा व्यापार अधिक आहे. श्रीलंकेतील अशांततेचा दुष्परिणामही भारत-श्रीलंका व्यापारावर झाला तर काश्मीर प्रश्नामुळे भारत-पाकिस्तान यांच्यातील व्यापारहीं कमी झाला.

आर्थिक व व्यापारी दृष्टीने सार्कला यशस्वी होण्यासाठी भारत व पाकिस्तान या मुख्य राष्ट्रांमध्ये सामंजस्य निर्माण होणे गरजेचे आहे. कारण राजकीय घडामोडींचा व्यापारावर परिणाम होतो. जागतिक व्यापारातही सार्क देशांची महत्त्वाची भूमिका आहे. भारत, पाकिस्तान, श्रीलंका देशांचा मोठ्या प्रमाणातील व्यापार हा सार्क देशांपेक्षा जगातील विकसित देशांबरोबरच अधिक आहे. तर नेपाळ, भूतान, बांगलादेश, मालदीव यांचा अधिकांश व्यापार हा प्रामुख्याने सार्क देशांतर्गत होतो.

सार्क देशांत व्यापारातील मोठा भागीदार हा भारत आहे. भारताचा ९५% व्यापार हा जगातील दहा मोठ्या, विकसित राष्ट्रांशी चालतो. म्हणजे सार्कच्या या मोठ्या भागीदाराचा बहुतांश व्यापार हा सार्क देशाबाहेरच अधिक आहे. भारताप्रमाणेच बांगलादेश, पाकिस्तान, श्रीलंका, नेपाळ या देशांच्या व्यापाराची स्थिती आहे. सार्क देशांचा परस्पर व्यापार जागतिक व्यापाराच्या तुलनेत अत्यंत कमी आहे. खरे म्हणजे सार्क देशांनी परस्पर व्यापारास चालना दिली तर त्याचा फायदा सर्वच सदस्य देशांना होईल.

सार्क देशांतील सर्वच देश कृषिप्रधान आहेत. यांपैकी भारत, पाकिस्तान वा देशांमध्ये औद्योगिकीकरण मोठ्या प्रमाणावर झाले आहे. भारत वगळता अन्य देशांतील उद्योग हे कृषीवर आधारित आहेत. त्यामुळे या देशांमधून भारताच्या तुलनेत औद्योगिक उत्पादनांची निर्यात अन्य देशांहून कमी होते. भारत, पाकिस्तान, बांगलादेशामध्ये नैसर्गिक साधनसंपत्ती विपूल आहे. अंतर्गत बाजारपेठही मोठी आहे. त्यामुळे या देशांची उत्पादने मोठ्या प्रमाणावर याच अंतर्गत बाजारपेठेत खपतात व निर्यात कमी झाल्यास त्याचा फारसा फरक अर्थव्यवस्थेवर पडत नाही. परंतु श्रीलंका, नेपाळ, मालदीव, भूतान या देशांना ही बाब लागू होत नाही. जागतिक व्यापारात सार्कचे स्थान अतिशय खालच्या क्रमांकावर आहे. मुख्य म्हणजे औद्योगिक तंत्रज्ञान व माहिती या क्षेत्रांत सार्क देश हे विकसित देशांवर अवलंबून आहेत. त्यामुळे या देशांमध्ये प्रादेशिक व्यापार कमी आहे. सार्कच्या स्थापनेपासून सार्क देश हे परस्परांशी व्यापार अथवा व्यापारी करार करण्यास अनुत्सूक होते. सार्क देशांमधून होणारी निर्यात ही मोठ्या प्रमाणात विकसित देशांमध्ये होत असल्यामुळे सार्क अंतर्गत व्यापाराचे प्रमाण कमी होते.

**(अ) सार्क देशांतर्गत व्यापारातील अडथळे**

दक्षिण आशियातील अर्थव्यवस्था संकटग्रस्त स्थितीत असल्यामुळे सार्क देशांत विकासाकरिता समन्वय साधणारे सहकार्य अत्यावश्यक असून त्याचबरोबर उपलब्ध असलेल्या साधनसामग्रीचा पुरेपूर उपयोग करण्याची आवश्यकता सार्क देशांना पटली आहे.

**१) प्रशुल्क**

सार्क देशांत व्यापार विस्तारात व विकासात येणारा सर्वात मोठा अडथळा म्हणजे प्रशुल्क व गैर प्रशुल्क यांचे उच्च दर होय.

**२) विभेदात्मक भूमिका**

सार्कमधील काही देशांची पक्षपाती व विभेदात्मक वर्तणूक हा दुसरा अडथळा होय. काही सभासद देशांकडून भारताला सर्वाधिक पसंत राष्ट्र म्हणून वागणूक मिळते पण पाकिस्तानकडून नाही.

### ३) माहितीचा अभाव

पूर्ण व विश्वसनीय माहिती नसणे हा तिसरा अडथळा होय. परस्परांच्या शेजारी असून सुद्धा सभासद देशांची निर्यातक्षमता, आयात गरजा, आर्थिक धोरण, व्यापार संधी, प्रशुल्क व गैर प्रशुल्क अडथळे, मालाचा पुरवठा व तांत्रिकता, इत्यादींबाबत पुरेशी माहिती नसते. या ज्ञानाअभावी परस्परांमधील व्यापाराचा पुरेसा विकास विस्तार होत नाही.

### ४) अपुरे भांडवल

भांडवलाचा व प्रत्ययाचा अभाव हा चौथा अडथळा होय. प्रदेशाच्या वित्तीय संस्था व व्यापाए विकास मंडळे यांच्यात समन्वयाचा अभाव असल्यामुळे आंतरप्रादेशिक व्यापारात अडथळे येतात. तसेच मोठे देश हे गरीब देशांना पुरेशा प्रत्ययाचा पुरवठा करत नाहीत.

### ५) असंतुलित व्यापार

असंतुलित व्यापार हा आणखी एक अडथळा होय. सार्कमध्ये भारताचा पाकिस्तान सोडून, इतर सर्व देशांशी सतत अधिक्याचा व्यापार आहे. भारताकडून अधिकाधिक आयात करण्याची पाकिस्तानची इच्छा नाही. सध्या अस्तित्वात असलेल्या व्यापार निर्बंधामुळे सभासद देशांचे व्यापार असंतुलन अधिक वाढले आहे. या असंतुलनामुळे सार्कमधील देशांत व्यापार विकासाला उत्तेजन मिळणार नाही.

### ६) वस्तूंचा निम्न दर्जा

निर्यातीच्या दर्जाच्या वस्तुंची कमतरता हे व्यापार विकासातील अडचणीचे कारण होय. निम्न प्रत्तीच्या वस्तुंमुळे बाहेरील जगाशी सार्क देशांचा व्यापार वाढत नाही.

### ७) जादा उत्पादन खर्च

अकार्यक्षमता व उपलब्ध वित्तीय आणि श्रम साधनांचा योग्य उपयोग होत नसल्यामुळे या देशांतील उत्पादन व्यय अधिक असतो. परिणामतः सर्वत्र निर्यात करण्यात अडथळे येतात.

### ८) बिघडलेले संबंध

आपसांतील संबंध सतत चांगले ठेवण्यातील अपयशामुळे सार्क प्रदेशांत व्यापार अपेक्षेप्रमाणे चालत नाही.

### ९) अद्ययावत वाहतूक सेवेचा अभाव

अद्ययावत वाहतूक व्यवस्थेचा अभाव असल्यामुळे सार्क देशांत परस्पर व्यापार मर्यादित आहे.

### १०) बँक व वित्तीय व्यवस्था

अधिकोषण व्यवस्थेची अपर्याप्तता ही सार्क देशांमध्ये व्यापार विकासातील अडचण आहे. म्हणून सार्क देशांमध्ये सुदृढ अधिकोषण व्यवस्था असणे आवश्यक आहे.

**११) भारताच्या प्रभुत्वाचे भय**

भारताच्या प्रभुत्वाचे भय हा आणखी एक अडबळा होय. सार्क प्रदेशाच्या एकूण क्षेत्रफळापैकी ७३% क्षेत्रफळाची जमीन व ७३% लोकसंख्या एकट्या भारताकडे आहे. तसेच तुलनेने भारताजवळील सर्व प्रकारची साधनसामग्री व सुविधा इतरांपेक्षा बऱ्याच अधिक आहेत. त्यामुळे उत्पादनात भारताला तुलनात्मक लाभ आहे. सौदा शक्तीही जास्त आहे. त्यामुळे भारत आपल्या देशात राशीपातन (Dumping) करेल अशी भीती अन्य दुसऱ्या राष्ट्रांना वाटते.

**१२) किचकट पद्धत**

व्हिसा पद्धती, पोलीस तपासणी, विदेश विनिमयाची कमतरता, इत्यादी कारणांमुळे आंतर प्रादेशिय प्रवास व पर्यटन यांत अडचणी येतात. परिणामतः व्यापार विकासात अडथळे निर्माण होतात.

**१३) औद्योगिक संरक्षण**

औद्योगिक संरक्षण हा व्यापारातील अडथळा आहे. काही सार्क देश स्वदेशी उद्योगांना संरक्षण देण्याकरिता आयात प्रतिस्थापन धोरणाचा अवलंब करतात. परंतु असे संरक्षण देण्याबाबत ते अतिशय चिकित्सक असतात. सार्क बाहेरील अन्य देश स्पर्धात्मक उत्पादनांचे राशीपतन करत असल्यामुळे सार्क देशातील संयुक्त प्रकल्पांचे नुकसान होते.

**१४) गुणवत्ता नियंत्रणाचा अभाव**

सार्क देशांतून निर्यात होणाऱ्या मालाच्या बाबतीत सुयोग्य अशा गुणवत्ता नियंत्रणाचा (Quality Control) अभाव असल्यामुळे प्रदेशातील व्यापार मर्यादित होतो.

**१५) कुशल कामगार व कार्यक्षम संघटकांचा अभाव**

सार्क देशांतील काही देशांत कुशल कामगार व कार्यक्षम संघटक यांची कमतरता असल्यामुळे सार्क प्रदेशातील प्रादेशिक व्यापार सिमित होतो.

**(आ) सार्क देशांतर्गत व्यापार वाढीसाठी काही उपाययोजना**

सार्क देशांच्या व्यापारात येणारे अडथळे दूर करून व्यापार विस्तार व विकास व्हावा म्हणून काही उपाय करता येण्यासारखे आहेत. ते पुढीलप्रमाणे -

**१) उदारीकरण**

सर्वच सार्क सदस्य राष्ट्रांनी उदारीकरणाचा धोरणात्मक अवलंब करावा. व्यापारात खुली स्पर्धा ठेवावी. तसेच या खुल्या स्पर्धेत लहान राष्ट्रांच्या हिताची काळजी मोठ्या राष्ट्रांनी घ्यावी. मोठ्या राष्ट्रांनी लहान राष्ट्रांकरिता आयात-निर्यातीचे प्रशुल्क दर कमी करावेत.

## २) पसंतीचे राष्ट्र

सार्क देशांनी आपल्या प्रदेशांतर्गत होणाऱ्या उत्पादित वस्तूंवर विशेष सूट द्यावी. सार्क अंतर्गत राष्ट्रांना सर्वाधिक पसंतीच्या राष्ट्रांचा दर्जा द्यावा, 'साप्दा' कराराअंतर्गत असलेली व्यवस्था या अर्थाने महत्त्वाची आहे.

## ३) परस्परपूरकता

सार्क देशांनी आपला व्यापार परस्परांना पूरक ठेवावा.

## ४) दुर्बल राष्ट्रांना मदत

सार्क देशांतर्गत एका मुद्राकोषाची निर्मिती व्हावी. भारत, पाकिस्तानसारख्या भक्कम अर्थव्यवस्था असणाऱ्या राष्ट्रांनी अन्य दुर्बल राष्ट्रांना मदत करावी. सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

## ५) निर्यात प्रक्रिया विभाग

दक्षिण आशियात निर्यात प्रक्रिया विभाग (Regional Export Processing Zones) निर्माण करावेत. यात एखाद्या राष्ट्राकडे तंत्रज्ञान आहे व ते राष्ट्र दुसऱ्या सार्क देशात गुंतवणूक करण्यास तयार असेल तर दुसऱ्या राष्ट्राने त्यास सहकार्य करावे. कर्तृत्ववान व ज्यांच्याजवळ आवश्यक तंत्र- विज्ञान व यंत्रसामग्री आहे त्यांना प्राधान्य देण्यात यावे.

## ६) माहितीचे संकलन व वितरण

व्यापारासंदर्भात माहितीचे संकलन व वितरणाची सोय करावी, परस्परांविषयी माहितीचे संकलन करावे, अभ्यास करावा. यासाठी प्रत्येक सार्क देशाने आपल्या वाणिज्य मंत्रालयात एक विशेष कक्ष सुरू करावा.

## ७) व्यापार आयोग

व्यापार वृद्धिसाठी संयुक्त व्यापारी परिषदा, व्यापारी आयोग यांची स्थापना व्हावी. या संस्था व्यापार वाढीच्या दृष्टीने विचार करून सूचना करतील.

## ८) व्यापारविषयक नियम, माहिती

सार्क सचिवालयातून व्यापारविषयक नियतकालीके प्रकाशित व्हावीत. यात सार्क देशांदरम्यान आकडेवारी व माहिती वेळोवेळी प्रकाशित व्हावी,

## ९) पायाभूत सुविधांचा विकास

सार्क देशांनी आपल्या पायाभूत सोयीसुविधा (Infra-structure) अधिक सुदृढ केल्या पाहिजेत. सार्क प्रदेशांतर्गत दळणवळण साधनांचा विकास करावा. यामुळे व्यापारात अडचणी निर्माण होणार नाहीत.

**१०) वाहतूक साधने, संपर्क सुविधांचा विकास**

सार्क देशांनी आपले आयात-निर्याताचे प्रशुल्क कमी करावे, श्रीलंका व मालदीव वगळता अन्य सर्व सदस्य राष्ट्रांना रस्ते व रेल्वेच्या माध्यमातून जोडले जावे. यामुळे सार्क राष्ट्रांदरम्यान व्यापारात वाढ होईल.

सार्क देशांदरम्यान दूरध्वनी, तार आदी दूरसंचार सुविधांचा अधिक विस्तार आवश्यक आहे. यामुळे माहितीची देवाणघेवाण वाढेल.

**११) वित्तसाहाय्य**

आर्थिकदृष्ट्या दुर्बल राष्ट्रांना व्यापाराकरिता कर्जाची आवश्यकता असते. सुलभ अटींवर हे कर्ज अशा राष्ट्रांना मिळाले पाहिजे. तसेच सार्क अंतर्गत सार्क बँकेची स्थापना करावी. यामुळे सातही सदस्य राष्ट्रांना परदेशी व्यापारात बँकेची सुविधा मिळू शकेल व व्यवहारही सुलभ होतील. समान मुद्रेचीही व्यवस्था करता येईल.

**१२) प्रमाणीकरण**

सार्क क्षेत्रातील व्यापारासाठी समान, सुलभ व प्रामाणिक प्रमाणीकरणाची आवश्यकता आहे. व्यापार व्यवस्थेतील क्लिष्ट प्रक्रियांना सुलभ करणे, जकात व्यवस्थेत सुधारणा, गुणवत्ता, प्रमाणीकरण, विक्रीनंतरच्या तक्रारींचे निवारण, इत्यादी करावी. सार्क देशांतर्गत व्यापाऱ्यांना जाण्यायेण्यासाठी मुक्त परवाना द्यावा.

सार्क प्रदेशातील व्यापार विस्तार व विकास यामुळे दक्षिण आशियातील प्रादेशिक सहकार्याच्या कल्पनेला एक नवीन आयाम प्राप्त होईल. यामुळे सार्कला सामर्थ्य मिळून सार्कची उद्दिष्टे साध्य करण्याच्या दृष्टीने वाटचाल सुरू होईल व लवकरच देशांचा आर्थिक व सामाजिक विकास जलद गतीने होऊ शकेल. थोडक्यात, जागतिक व्यापाराची दिशा ओळखून सार्क देशांनी त्याचे अनुकरण करून उदारीकरण व स्वतंत्र बाजाराच्या धोरणांचा स्वीकार करणे आवश्यक आहे. सार्क देश आपापसांतील व्यापार ज्या प्रमाणात वाढवतील तेवढाच आंतर प्रादेशिक व्यापार वाढून त्याचा लाभ सार्क देशांना मिळेल.

**४.२.२.१० मूल्यमापन**

दक्षिण आशियाई देशांमध्ये प्रादेशिक सहयोगासाठी सार्कची स्थापना करण्यात आली. सार्कच्या स्थापनेपासून आजपर्यंतचा आढावा घेतल्यास सार्कची प्रादेशिक, भौगोलिक व सांस्कृतिक व्यवस्था पाहिल्यास एकात्मता आढळून येते. त्याचप्रमाणे प्राचीन भारतातील भारतवर्ष, आर्यावर्त यांचा विचार करता सांस्कृतिक एकता असलेला हा प्रदेश आहे. सार्क सभासद देशांत नैसर्गिक व मानवी साधनसामग्री विपुल प्रमाणात उपलब्ध असूनही मोठ्या प्रमाणावर बेरोजगारी, निरक्षरता, रोगराई आणि दारिद्र्य आढळते. सार्कच्या सभासद राष्ट्रांना औद्योगिक, व्यापारी आणि वाहतूक या क्षेत्रांत मोठ्या प्रमाणात सहकार्य करण्याची संधी उपलब्ध असूनही त्या मार्गाने पाहिजे त्या प्रमाणात प्रगती झालेली आढळून येत नाही. सार्क ऐवजी सभासद देश द्विपक्षीय करारामार्फतच कार्य करीत असल्याचे दिसून येते.

शैक्षणिक, तांत्रिक आणि शेतीसंबंधीच्या प्रक्रिया उद्योगांत भारत भरीव सहकार्य करू शकतो पण दुर्दैवाने या बाबतीत सार्कची प्रगती झाली नसल्याचे दिसून येते.

दहशतवादाचा बीमोड करण्यासाठी परस्परांना सहकार्य करावे याची गरज सार्क परिषदांमध्ये प्रतिपादन करण्यात आली. मात्र परस्परांचा सहयोग प्रत्यक्षात बाजूलाच राहिला. शेजारी राष्ट्रांतील प्रशिक्षित अतिरेकी सरकारी मदतीवर तयार करून घुसखोरीसाठी पाठवले जातात ही बाब शासनमान्य समजली जाते. यावरून सार्कचा जाहीरनामा किंवा घोषणा फोल ठरल्याचे दिसून येते. सार्कच्या तत्वांचे पूर्णपणे पालन होत नाही असे म्हणावे लागते. १९८९ हे वर्ष अमली पदार्थांचा व्यापार रोखण्याचे वर्ष म्हणून जाहीर करण्यात आले. मात्र तसा व्यापार हे देश रोखू शकले नाहीत.

श्रीमती बेनझीर भुट्टो व भारताचे पंतप्रधान राजीव गांधी यांनी सहकार्याचे नवे पर्व सुरू केले होते. मात्र राजीव गांधींच्या मृत्यूनंतर ते संपुष्टात आले.

जगातील सर्वांत दाट लोकसंख्या असलेले देश 'सार्क' मध्ये आहेत. दारिद्र्यरेषेखाली जीवन जगणाऱ्या लोकांचे प्रमाण भारतात ४८%, पाकिस्तानात ३०% बांगलादेशात ८६% असून जगात सर्वाधिक आहे. साधारणतः शंभर कोटींहून अधिक लोकसंख्या असलेल्या या संघटनेचे दरडोई उत्पन्न ३०० डॉलर पेक्षा कमी आहे. कोलंबोतील मार्ग इन्स्टिट्यूटने व लंडनमधील 'थर्ड वर्ल्ड फौंडेशन फॉर सोशल ॲण्ड इकॉनॉमिक स्टडीज' या संस्थेच्या सहकार्याने दक्षिण आशियातील म्हणजे 'सार्क' सदस्य देशांतील सहकार्य आणि विकासविषयक आढावा घेतला आहे. तो मोठा धक्कादायक आहे. त्यावरून जगात आपण कुठे आहोत याची कल्पना येते. इथल्या सर्व देशांत आयात-निर्यात व्यापारात मोठी तूट आहे. ते कर्जबाजारी आहेत. बेसुमार लोकसंख्या, भूक, रोगराई, बेरोजगारी, बालमृत्यू यांसारख्या मूलभूत समस्यांशी निगडित अनेक प्रश्न आहेत. पण त्यावर लक्ष केंद्रित करून या समस्या सोडविण्याच्या दृष्टीने फारसे प्रयत्न दिसून येत नाहीत. मध्ययुगीन 'अंधकारमय' युगाप्रमाणे दिसून येणाऱ्या परिस्थितीत सार्क देश गुरफटून गेले आहेत. सत्ता, संपत्ती व प्रतिष्ठा यांत सार्क देशांचे राजकारण अडकलेले दिसून येते.

सार्क देशांचा परस्परांवर विश्वास राहिलेला नाही. मूलतत्त्ववाद, वर्णभेद, संप्रदायवाद, जातिभेद, वाढती लोकसंख्या आणि दारिद्र्य यांमुळे सार्क देश दुर्बल व मागासलेले आहेत. भारत आणि पाकिस्तान या दोन्ही राष्ट्रांना 'काश्मीर प्रश्न' हा जनहितापेक्षा जास्त महत्त्वाचा वाटतो. त्यामुळे सार्क व्यासपीठावर या दोन्ही राष्ट्रांचे परस्परांविषयी असलेल्या सूड, द्वेष इत्यादी भावनांचे प्रतिबिंब दिसून येते. जगातील देशांमध्ये नेपाळ हे एकमेव हिंदू राष्ट्र आहे. परंतु भारत-नेपाळ या साधर्म्य असणाऱ्या देशांमधील संबंधही सलोख्याचे, प्रेमाचे, विश्वासाचे दिसून येत नाहीत. त्यामुळे सार्क संमेलने म्हणजे केवळ देखावेच ठरतील की काय अशी शंका वाटते.

सार्क, एक संघटना म्हणून, ऐतिहासिक आणि समकालीन देशांची दक्षिण आशियाई ओळख प्रतिबिंबित करते. ही नैसर्गिकरित्या निर्माण केलेली भौगोलिक ओळख आहे. तितकेच, दक्षिण आशियाची व्याख्या करणारी सांस्कृतिक, भाषिक, धार्मिक आणि पाककृती आहे. सदस्य देशांनी या प्रदेशात शांतता आणि स्थैर्य

राखण्यासाठी सार्कची क्षमता तपासली पाहिजे. सार्कला नैसर्गिकरित्या प्रगती करण्याची परवानगी दिली पाहिजे आणि जगाच्या लोकसंख्येच्या एक चतुर्थांश भाग असलेल्या दक्षिण आशियातील लोकांना अधिक लोकसंपर्क प्रदान केला पाहिजे.

**स्वयं अध्ययन – २**

आ. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा .

१. भारतात दारिद्र्यरेषेखाली जीवन जगणाऱ्या लोकांचे प्रमाण .......... इतके आहे.

अ. ४८% ब. ५०% क. ५५% ड. ४५%

२. शंभर कोटींहून अधिक लोकसंख्या असलेल्या या सार्क संघटनचे दरडोई उत्पन्न .......... पेक्षा कमी आहे.

अ. ३०० डॉलर ब. ४०० डॉलर क. ५०० डॉलर ड. ६०० डॉलर

३. मार्ग इन्स्टिट्यूट ही संस्था .......... येथे आहे.

अ. बांगलादेश ब. पाकिस्तान क. कोलंबो ड. अफगाणिस्तान

४. .......... हे वर्ष अमली पदार्थांचा व्यापार रोखण्याचे वर्ष म्हणून जाहीर करण्यात आले.

अ. १९८९ ब. १९९० क. १९९१ ड. १९९२

५. .......... हे वर्ष युवा वर्ष म्हणून ओळखले जाते.

अ. १९९४ ब. १९९५ क. १९९६ ड. १९९७

### ४.२.३ जागतिक व्यापार संघटना (WTO)

**४.२.३.१ प्रस्तावना :–** जागतिक व्यापार संघटना ही एक आंतरराष्ट्रीय संघटना जगामधील देशांदरम्यान होणाऱ्या आंतरराष्ट्रीय व्यापारावर देखरेखीचे काम करते. सदस्य राष्ट्रांमधील वाणिज्याला चालना देणे, तंट्यांचे निवारण करणे इत्यादी जागतिक व्यापार संघटनेची प्रमुख कामे आहेत. जकाती व व्यापारासंबंधीचा सर्वसाधारण करार विकसित देशांचे हितसंबंध टिकविणारा असल्यामुळे विकसनशील देशानी अनेकवेळा आंतरराष्ट्रीय व्यापारी संघटना स्थापन करण्याचा प्रयत्न केला, मात्र विकसित देशानी ते सर्व प्रयत्न हाणून पाडले. संयुक्त राष्ट्रसंघाने सन १९६३ मध्ये संस्थात्मक रचना उभारण्यासाठी एक समिती स्थापन केली होती .या समितीच्या सल्लयानुसार सन १९६४ मध्ये UNC, TAD (United Nation Conference On Trade and Development) संस्था उभारण्यात आली उरुग्वे राउंडच्या मर्राकेश करारानुसार १ जानेवारी १९९५ला जागतिक व्यापार संघटनेची स्थापना करण्यात आली. २९ जुलै, २०१६ अखेर भारतासह जगातील १६४ देश ह्या संघटनेचे सदस्य होते. तर २५ देशांनी सदस्यत्व मिळवण्यासाठी उत्सुकता दाखवली आहे. सध्या १४ देश WTO चे सदस्य किंवा निरिक्षक नाहीत.

आंतरराष्ट्रीय व्यापराच्या वाटाघाटींसाठी व्यासपीठ उपलब्ध करणे, आंतरराष्टीय व्यापार वृद्धीगंत करणे, व्यापार विषयक मतभेद हाताळणे, राष्ट्रांच्या व्यापार धोरणांवर देखरेख ठेवणे, विकसनशील देशांसाठी तांत्रिक सहाय्य व प्रशिक्षण उपलब्ध करून देणे. अशी अनेक कार्ये या संघटनेद्वारे केली जातात. जकाती व व्यापारासंबंधीचा सर्वसाधारण करार हा तात्पुरत्या स्वरूपाचा होता. जागतिक व्यापार संघटना मात्र सदस्य देशानी मान्य केलेली कायमस्वरूपी संघटना आहे. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक या संयुक्त राष्ट्रसंघाच्या संलग्न संस्था आहेत. जागतिक व्यापार संघटना मात्र एक स्वतंत्र संस्था आहे .

### ४.२.३.२ WTO **चा इतिहास**

WTO ने १ जानेवारी, १९९५ रोजी काम करण्यास सुरुवात केली. परंतु तिची व्यापार प्रणाली अर्धा शतक जुनी आहे. सन १९४८ पासून, दर आणि व्यापारावरील सामान्य कराराने (GATT) प्रणालीसाठी नियम दिले होते. (मे १९९८ मध्ये जिनिव्हा येथे झालेल्या दुसऱ्या WTO मंत्रिस्तरीय बैठकीत या प्रणालीच्या ५० व्या वर्धापन दिनाच्या उत्सवाचा समावेश होता.)

सामान्य कराराला अनौपचारिकपणे GATT म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अनौपचारिक, विद्यमान आंतरराष्ट्रीय संस्थेला जन्म देण्यास वेळ लागला नाही. वर्षानुवर्षे, GATT वाटाघाटीच्या अनेक फेऱ्यांतून विकसित झाला. दर आणि व्यापारावरील सामान्य करार (GATT) ची शेवटची फेरी सन १९८६ मध्ये झाली आणि ती १९९४ पर्यंत टिकली. ही उरुग्वे फेरी म्हणून ओळखली जात होती आणि त्यामुळे जागतिक व्यापार संघटना (WTO) तयार झाली.

GATT मुख्यतः वस्तूंच्या व्यापाराशी संबंधित असताना, WTO आणि त्याचे करार केवळ वस्तूच कव्हर करू शकत नाहीत तर सेवा आणि इतर बौद्धिक गुणधर्म जसे की व्यापार निर्मिती, डिझाइन आणि शोध यांचाही व्यापार करू शकतात.

WTO मध्ये १६४ सदस्य आणि २३ निरीक्षक सरकारे आहेत. अफगाणिस्तान जुलै २०१६ मध्ये १६४ वा सदस्य झाला. राज्यांव्यतिरिक्त, युरोपियन युनियन आणि प्रत्येक देश स्वतःच्या अधिकारात सदस्य आहे.

### ४.२.३.३ WTO **ची रचना**

जागतिक व्यापार संघटनेअंतर्गत एक साधारण परिषद कार्यरत असते. या परिषदेत प्रत्येक सदस्य देशाचा एक प्रतिनिधी असतो. साधारणतः दर महिन्याला परिषदेची एक बैठक भरते. जागतिक व्यापार संघटनेची मंत्रीस्तरीय परिषद ही अंतिम निर्णय घेणारी परिषद असते. ती साधारणतः दर २ वर्षांनी भरत असते.

WTO **मंत्रीस्तरीय परिषदा :–**

**१) सिंगापूर परिषद –** ९ ते १३ डिसेंबर, १९९६ दरम्यान जागतिक व्यापार संघटनेची पहिली मंत्रीस्तरीय परिषद सिंगापूर येथे पार पडली. सिंगापूर परिषदेत विकसित आणि विकसनशील देशांमध्ये जोरदार वाद निर्माण झाले. वादाचे प्रमुख दोन मुद्दे होते, एक म्हणजे सामाजिक परिच्छेद आणि दुसरा म्हणजे सिंगापूर मुद्दे

**२) जिनीव्हा परिषद –** १८ ते २० मे १९९८ दरम्यान जिनिव्हा येथे दुसरी मंत्रीस्तरीय परिषद पार पडली गॅट कराराला ५० वर्षे झाल्याबद्दल विशेष सभा घेण्यात आली उरुग्वे राउंडमधील करार तसेच सिंगापूर मुद्‌द्यावर चर्चा करण्यात आली.

**३) सिएटल परिषद –** सन १९९९ मध्ये प्रचंड निर्दशने आणि विरोधामुळे जागतिक व्यापार संघटनेची सिएटल परिषद गाजली. जागतिक व्यापार संघटनेमुळे मानव विकास व पर्यावरणावर गंभीर परिणाम होणार असल्याचे या निदर्शकांचे म्हणणे होते.

**४) दोहा परिषद** - ९ ते १४ नोव्हेंबर, २००१ दरम्यान दोहा येथे चौथी मंत्रीस्तरीय परिषद भरली. जागतिक व्यापार उदारीकरणासाठी आगामी करारांचा २१ विषयांचा व्दितीय संच तयार करण्यासाठी परिषदेत महत्त्वाची पाऊले उचलली गेली.

### ४.२.३.४ WTO **ची उद्दिष्टे**

१) आंतरराष्ट्रीय व्यापार वृद्धिंगत करणे.

२) रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे.

३) लोकांचे राहणीमान उंचावणे.

४) विकसनशील देशांना विकासासाठी साहाय्य करणे.

५) पर्यावरण संवर्धन करणे.

६) देशा-देशांमधील व्यापार खुला करणे.

७) जगभरातील व्यापाराचे रीतसर बहुपक्षीय यंत्रणेच्या माध्यमातून नियमन करणे.

८) राष्ट्रीय व्यापार धोरणावर देखरेख ठेवणे.

९) आंतरराष्ट्रीय व्यापारातील जकाती/प्रशुल्क आणि इतर निर्बंध कमी करणे, त्यासाठी आचारसंहिता तयार करणे

### ४.२.३.५. WTO **ची वैशिष्ट्ये**

- WTO ची व्याप्ती पूर्वीच्या व्यापार आणि शुल्कावरील सामान्य करारापेक्षा कितीतरी जास्त महाग आहे. उदाहरणार्थ, GATT ने कापड आणि शेती वगळून केवळ वस्तूंवर लक्ष केंद्रित केले. दुसरीकडे, WTO बौद्धिक संपत्तीसह सर्व वस्तु, सेवा आणि गुंतवणूक धोरणे समाविष्ट करते.
- WTO सचिवालयाने धोरणांच्या पुनरावलोकनासाठी तसेच विवादांचे निराकरण करण्यासाठी यंत्रणांना औपचारिक बळ दिले आहे. सदस्य देशांच्या प्रसारामुळे आणि WTO द्वारे अधिक वस्तू आणि सेवा

समाविष्ट झाल्यामुळे हा पैलू महत्त्वपूर्ण बनला आहे. या संदर्भात आणखी एक महत्त्वाचा विचार म्हणजे विविध आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये खुल्या प्रवेशात झालेली भरीव वाढ.

- विकसित देशांच्या भेदभावपूर्ण व्यापार पद्धतींपासून लहान आणि कमकुवत देशांच्या सरक्षणासाठी नियम लागू केले जातात.
- नॅशनल ट्रीटमेंट आर्टिकल (NTA) आणि मोस्ट फेव्हर्ड नेशन (MFN) क्लॉज देशी आणि परदेशी पुरवठादारांना न्याय्य वागणुकीसाठी बाजारात समान प्रवेशाची परवानगी देते.
- WTO च्या प्रत्येक सदस्य देशाला एकच मतदानाचा अधिकार आहे आणि सर्व सदस्यांना जागतिक स्तरावर विशेषाधिकार आहेत.
- WTO करारांमध्ये सर्व सदस्य राष्ट्रांचा समावेश होतो आणि सदस्यांसाठी विचारविनिमय करण्याचे एक सामायिक मंच म्हणून काम करतात.
- सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे हा एक मंच आहे जिथे गंभीर वाटाघाटीनंतर निकाल समोर येतो. मूलत: WTO ही एक अशी जागा आहे जिथे सदस्य असलेली सरकारे एकमेकांना भेडसावणाऱ्या व्यापार समस्या सोडवण्यासाठी जातात.
- आपण WTOकडे अनेक प्रकारे पाहू शकतो. WTO ही व्यापार उदारीकरणासाठी जबाबदार असलेली संस्था आहे. विविध सरकारांसाठी व्यापार करारांवर वाटाघाटी करण्याचा हा एक मंच आहे. हे असे ठिकाण आहे जेथे व्यापार विवादांचे निराकरण केले जाते. हे व्यापार नियमांची एक प्रणाली चालवते.
- वाटाघाटींनी व्यापार उदारीकरण करण्यास मदत केली आहे. जेथे देशांना व्यापार अडथळ्यांचा सामना करावा लागला आहे आणि ते कमी केले जावेत अशी इच्छा आहे. परंतु WTO केवळ व्यापार उदारीकरणासाठी नाही आणि काही प्रकरणांमध्ये, त्याचे नियम असे आहेत की व्यापारातील अडथळ्यांना आधार मिळतो उदाहरणार्थ, ग्राहकांचे संरक्षण करणे.

**४.२.३.६ WTO च्या भूमिका आणि कार्ये**

**१. व्यापार धोरणाच्या पुनरावलोकनासाठी नियमांची अंमलबजावणी:–** व्यापाराचे आंतरराष्ट्रीय नियम स्थैर्य आणि आश्वासन देतात आणि सदस्य देशांमध्ये सामान्य सहमती निर्माण करतात. सतत बदलणाऱ्या व्यापार परिस्थितींसह, बहुपक्षीय व्यापारप्रणालीची भरभराट होते हे सुनिश्चित करण्यासाठी धोरणांचे पुनरावलोकन केले जाते. हे व्यवसाय चालवण्यासाठी पारदर्शक आणि स्थिर फ्रेमवर्क सुलभ करण्यात देखील मदत करते.

**२. सदस्य देशांसाठी मंच, भविष्यातील धोरणांवर चर्चा करतो:** WTO, एक मंच म्हणून, बहुपक्षीय व्यापार प्रणालीमध्ये व्यापार वाटाघाटींना परवानगी देतो. व्यापार वाटाघाटीच्या अनुपस्थितीत, वाढ खुंटू

शकते आणि दर आणि डंपिंगशी संबंधित समस्यांचे निराकरण होऊ शकते. व्यापाराचे पुढील उदारीकरण देखील सातत्यपूर्ण व्यापार वाटाघाटींच्या अधीन आहे.

**३. द्विपक्षीय आणि बहुपक्षीय व्यापार करारांची अंमलबजावणी आणि प्रशासन:** द्विपक्षीय किंवा बहुपक्षीय व्यापार करारांना संबंधित सदस्य देशांच्या संसदेने मंजूर करणे आवश्यक आहे. जोपर्यंत अशी मान्यता मिळत नाही तोपर्यंत भेदभावरहित व्यापार प्रणाली व्यवहारात आणली जाऊ शकत नाही. अंमलात आणलेले करार हे सुनिश्चित करतील की प्रत्येक सदस्याला इतर सदस्यांच्या बाजारपेठेत न्याय्य वागणूक मिळण्याची हमी दिली जाईल.

**४. व्यापार विवाद निपटारा :** WTO द्वारे विवाद निपटारा व्यापार विवादांच्या निराकरणाशी संबंधित आहे. न्यायाधिकरणाचे स्वतंत्र तज्ज्ञ करारांचा अर्थ लावतात आणि संबंधित सदस्य देशांच्या देय वचनबद्धतेचा उल्लेख करून निर्णय देतात. तसेच सदस्यांमधील सल्लामसलत करून वाद मिटवण्यास प्रोत्साहन दिले जाते.

**५. जगातील संसाधनांचा इष्टतम वापर:** विकसनशील अर्थव्यवस्थांच्या व्यापार क्षमतांचा वापर करून जगभरातील संसाधनांचा अधिक चांगल्या प्रकारे वापर केला जाऊ शकतो. कमी-विकसित अर्थव्यवस्थांसाठी WTO करारामध्ये विशेष तरतुदी आवश्यक आहेत. अशा उपायांमध्ये मोठ्या व्यापाराच्या संधी उपलब्ध करून देणे, वचनबद्धतेची अंमलबजावणी करण्यासाठी दीर्घ कालावधी आणि पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी समर्थन यांचा समावेश असू शकतो.

### ४.२.३.७ WTO मध्ये गरीब देशांना सवलती

विकसनशील व अतिमागासलेल्या गरीब देशांसाठी WTO मध्ये, त्यांना त्यांच्या ठराविक गरजांना तोंड देता यावे यासाठी खास तरतुदी करण्यात आल्या आहेत :

- करारांन्वये पडणाऱ्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी या देशांना अधिक अवधी देण्यात आला आहे.

उदाहरणार्थ, विकसित देशांनी सर्व सरकारी अनुदानात १९९५ नंतर ६ वर्षांच्या कालावधीत २०% कपात करणे अपेक्षित होते; विकसनशील देशांनी १० वर्षात १३.३% कपात करणे अपेक्षित होते तर अविकसित देशांना अशा प्रकारे कोणतीही कपात करण्याची अपेक्षा नव्हती.

- विकसनशील आणि अतिमागास देशांना विकसित देशांतील व्यापारात अधिक प्रमाणात प्रवेशाची मुभा देऊन व्यापाराच्या संधी वाढविण्यासाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत.

उदाहरणार्थ, जी उत्पादने विकसित देशांत विकण्यास याआधी कडक बंधने होती ती शिथिल करून विकसित देशांनी किमान प्रवेशसंधीचे आश्वासन देणे अपेक्षित होते. अशा उत्पादनांवर विकसित देशांना त्यांच्या देशांतर्गत उपभोगाच्या ३% कर लावण्याचे व हा कर सन २००१ पर्यंत ५% वाढविण्याची मुभा देण्यात आली होती. विकसनशील देशांना असा कर ३% वरून ५% करण्यासाठी सन २००५ पर्यंत मुभा होती.

- WTO त समाविष्ट देशांनी त्यांचे देशांतर्गत आर्थिक धोरण ठरविताना विकसनशील व मागास देशांच्या आर्थिक हितसंबंधांना बाधा येणार नाही याची काळजी घेणे अपेक्षित आहे.

विकसित देशांनी शेतीउत्पादनावरील आयातनिर्यात करात ६ वर्षात ३६% तर विकसनशील देशांनी १० वर्षात २४% कपात करण्याचे मान्य केले आहे. या करारात अविकसित देशांना असे कोणतेही बंधन नाही.

- विकसनशील व मागास देशांना खास तांत्रिक सहाय्याची तरतूद करण्यात आली आहे. उदा. वस्तूंच्या दर्जाबाबत जबाबदारी निभावण्यासाठी सहाय्य करणे इ.

नोव्हेंबर २००१ पासून दोहा येथून सुरू झालेल्या चर्चेच्या फेरीत 'जागतिक विश्वस्त निधी' स्थापन करण्यात आला आहे. यासाठी ३० दशलक्ष डॉलरचा बीजनिधी जमविण्याचे उद्दिष्ट आहे. या निधीतून विकसनशील देशांना साधनसंपत्ती उपलब्ध करून देणे तसेच, तांत्रिक सहकार्य/मदत, क्षमता- निर्मितीबाबत अनेक प्रश्नांवर तातडीच्या व आवश्यक धोरणविषयक चर्चा सुरू करणे यांसाठी तरतूद करण्याचा उद्देश आहे.

आगामी जिनेव्हा बैठकीत मागास सदस्य व सदस्य नसलेल्या गरीब देशांच्या समस्यांवर अधिक भर देण्यात येईल.

### ४.२.३.८ भारताने WTO चे सदस्य राहण्याची आवश्यकता

भारताने WTO चे सभासद व्हावे की नाही यावर मोठे युक्तिवाद चालू आहेत. या प्रश्नाचे खरे उत्तर तर जागतिक व्यापार संघटनेत सामील झाल्यामुळे भारतीय लोकांना काय फायदा होणार व आपल्या देशाच्या या व्यापार संघटनेकडून काय अपेक्षा आहेत व त्या कितपत पूर्ण होतील या प्रश्नांच्या उत्तरातूनच मिळेल.

भारतीयांचे जीवनमान उंचावण्यासाठी आपल्याला दोन उद्दिष्टे गाठावी लागतील.

- शेती आणि उद्योगांच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करणे.
- गरीबीचे सार्वत्रिक निर्मूलन करणे.

भारतात WTO प्रमाणेच नियमाधारित काम करणारी एखादी समन्वयक समिती निर्माण करणे अत्यावश्यक आहे. त्याऐवजी सतत WTO च्या विरोधात मतप्रदर्शन करण्यात येत आहे व WTO तून बाहेर पडण्यासाठीच जास्त आग्रह धरला जात आहे. आपण WTO चे सदस्य नसलो तर आपण काय करू शकू हा कळीचा प्रश्न कोणीच कधीही विचारात घेत नाही. किंबहुना, WTO तून बाहेर पडणे आता आगीतून फुफाट्यात पडण्यासारखे होईल.

जर भारताला WTO तून बाहेर पडायचे झाले तर व्यापारी संबंध असलेल्या इतर सर्व देशांशी असलेले करार आपल्याला स्वतंत्रपणे तपासावे लागतील. पुन्हा बोलणी करावी लागतील. मेक्सिको व इतर छोटे युरोपियन देश NAFTA, युरोपियन युनियन, ASEAN इ. प्रादेशिक व्यापारी संघटनांशी निगडित आहे. भारत अशा प्रकारे कुठल्याही प्रादेशिक व्यापारी संघटनेशी जोडला गेलेला नाही. दक्षिण आशियासाठी अशी एखादी प्रादेशिक व्यापार संघटना स्थापन करण्याच्या भारताच्या प्रयत्नांचा अजून प्रारंभही झाला नाही.

याउलट, WTO च्या माध्यमातून कायदेशीर जागतिक करार होऊन भारत आर्थिक बळाची व मनुष्यबळाची मोठ्या प्रमाणावर बचत करू शकतो.

भारत जर WTO तून बाहेर पडला तर जागतिक राजकारणात एकाकी पडेल. भारताला जागतिक पातळीवर 'वाईट' नागरिक होणे झेपणार नाही. चीनसारख्या देशांनी WTO त प्रवेश मिळविला आहे. सन १९४७ साली केवळ २३ देशांच्या सहभागाने गॅटची सुरुवात झाली. ही संख्या वाढत वाढत १९९५ साली WTO ची स्थापना झाली त्यावेळी १२८ देश सभासद झाले. आज ही संख्या १४४ आहे.

यापलीकडे खालील देश WTO चे सभासदत्व मिळविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. त्यासाठी या देशांना एकेका सभासद देशांची मनधरणी करावी लागत आहे. आतापर्यंत, सभासद झालेल्या एकाही देशाने बाहेर पडण्याचा विचारही केलेला नाही. खाली दिलेला तक्ता देश व त्यांनी सर्वप्रथम WTO चा सभासद होण्यासाठी विनंती केली ती तारीख दर्शवितो. हे सर्व देश अद्याप प्रतीक्षेत आहेत.

### ४.२.३.९ WTO **भारतासाठी आपत्ती की संधी**

WTO ही एक सुनिश्चित नियमावली असलेली एक लोकशाही संघटना असून तिचे सर्व सभासद देश ते नियम पाळण्यास वचनबद्ध आहेत. त्यामुळे, ती कोणतीही छुपी बंधने भारतावर किंवा अन्य कोणत्याही देशांवर लादू शकत नाही.

तेव्हा, बाकी चर्वितचर्वण करण्यापेक्षा संयुक्तिक प्रश्न इतकाच उरतो की आपण अशा कायदेशीर संघटनेचे सभासद असावे की नसावे? या प्रश्नाचे केवळ होय किंवा नाही असे उत्तर देणेही शक्य नाही, कारण प्रश्न धमकीचा किंवा भीतीचा नव्हे तर फायदेतोटे काय असतील ते तपासण्याचा आहे.

WTO ची निर्मिती ही काळाची गरज होती हे नजरेआड करून चालणार नाही. WTO शिवाय आंतरराष्ट्रीय व्यापार करणे ही एक मोठी समस्या ठरली असती.

जेव्हा विकसित देश आर्थिक उदारीकरणाचा मार्ग अनुसरू लागले तेव्हा त्यांना अधिक चांगल्या निर्यातसंधीची गरज भासू लागली. महासत्तांनी WTO च्या स्थापनेला विरोध केला तरी त्याचवेळी द. कोरिया, सिंगापूर यांसारख्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत बऱ्यापैकी स्थान असलेल्या देशांनी, विशेषतः भारत व पाकिस्तानसारख्या विकसनशील देशांनी WTO च्या स्थापनेसाठी आग्रह धरला.

आपण हेही लक्षात घ्यायला हवे की मुक्त व्यापार किंवा स्पर्धा हे आर्थिक विकास प्रक्रियेला पर्याय नाहीत, तर ते आर्थिक विकास प्रक्रियेचे फलित आहे. देशांतर्गत आर्थिक धोरणे संयुक्तिक असतील तर सदस्य देशांना विकासाच्या आणि निर्यातीच्या संधी प्राप्त होण्यात WTO ची निश्चित मदत होते. कुठलाही अभ्यास न करता पारंपरिक दृष्टिकोनातून WTO ला आंधळा विरोध करणे आता थांबवायला हवे. त्याऐवजी प्राप्त परिस्थितीत व चौकटीत काम करणे अधिक योग्य आहे. WTO तील बोलणी आदानप्रदानाच्या (Give Take) तत्त्वावर चालतात. त्यामुळे अधिकाधिक लाभ कसा होईल अशी व्युहरचना भारताने करायला हवी.

**स्वयं अध्ययन प्रश्न–३**

इ. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

१. जागतिक व्यापार संघटनेचे मुख्यालय .......... येथे आहे.

अ. मेलबर्न ब. न्यूयॉर्क क. दोहा ड. जिनिव्हा

२. जागतिक व्यापार संघटनेचे .......... देश सदस्य आहेत.

अ. १६४ ब. १६० क. १४४ ड. १९४

३. .......... साली 'जागतिक विश्वस्त निधी' ची स्थापना करण्यात आली.

अ. २००१ ब. २००२ क. २००३ ड. २००४

४. जागतिक व्यापार संघटनेची पहिली मंत्रीस्तरीय परिषद .......... येथे पार पडली.

अ. दोहा ब. सिंगापूर क. भारत ड. बांगलादेश

५. WTO च्या प्रत्येक सदस्य देशाला .......... मतदानाचा अधिकार आहे.

अ. एकदा ब. दोनदा क. तीनदा ड. चारदा

## ४.३ सारांश

जगात महत्वाच्या संघटना आहेत, त्यामध्ये प्रामुख्याने ओपेक, सार्क, जागतिक व्यापार संघटना इ. या संघटनांनी आंतरराष्ट्रीय पातळीवरती आपला व्यापार कशा पद्धतीने केला हे पाहिले. यामध्ये खनिज तेलाचे उत्पादन आणि निर्यात करणारी ही एक बहुराष्ट्रीय संघटना ओपेक आहे. तेरा सभासद देश असलेल्या 'ऑर्गनायझेशन ऑफ द पेट्रोलियम एक्सपोर्टिंग कंट्रीज' (OPEC) या संस्थेची स्थापना सप्टेंबर १९६० मध्ये बगदाद येथे झाली. या माध्यमातून या संघटनेमधील देशांना नफा मिळवून देणे. तेल बाजाराचा आढावा घेवून सुरक्षित पावले उचलने इ. काम या संघटनेने केले. या तेल उत्पादन करणाऱ्या देशांमध्ये ६०% देश हे विखुरलेल्या अवस्थेत आहेत. त्यामुळे सौदी अरेबिया यांच्याकडे अलिखित नेतृत्व आहे.

दक्षिण आशियाई देशांमध्ये प्रादेशिक सहयोगासाठी सार्कची स्थापना करण्यात आली. सार्कच्या स्थापनेपासून आजपर्यंतचा आढावा घेतल्यास सार्कची प्रादेशिक, भौगोलिक व सांस्कृतिक व्यवस्था पाहिल्यास एकात्मता आढळून येते. सार्क देशांमध्ये असलेल्या राजकीय व व्यापारी संबंधांचा आढावा घेतला आहे. यात विशेषत्वाने भारत व अन्य राष्ट्रे अशा संदर्भात विचार केलेला आहे. सार्क संघटनेच्या दृष्टीने या देशांच्या संबंधांबाबत विचार केल्यास असे लक्षात येते की, सार्कच्या सदस्यांमध्ये द्विपक्षीय मतभेद असल्यामुळे राजकीय अथवा आर्थिक स्वरूपाचा निर्णय घेताना मतभेद मोठ्या प्रमाणावर उफाळून येतात. यामुळे सार्क संघटनेची गती अतिशय हळूवार आहे.

व्यापारी सहकार्याच्या बाबतीत असे म्हणता येईल की, ज्या मूळ आर्थिक सहकार्याच्या हेतूने सार्क संघटना स्थापन झाली आहे. तो हेतूच साध्य होत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे सार्कच्या सदस्यांत परस्पर व्यापाराचे प्रमाण अतिशय अल्प असणे होय. याउलट या सर्व सदस्यांचा सार्क राष्ट्र सोडून जगातील अन्य विकसित राष्ट्रांशीच अधिक व्यापार आहे. ही व्यापारातील विसंगती दूर होणे आवश्यक आहे, तरच सार्क ही एक प्रबळ आर्थिक संघटना म्हणून पुढे येऊ शकेल.

अशा प्रकारे सार्क देशांमध्ये राजकीय व व्यापारी संबंध आहेत. सार्क देशांमध्ये अंतर्गत मतभेदांमुळे, संघर्षांमुळे या देशांचा व पर्यायाने दक्षिण आशियाचा विकास होत नाही. त्यामुळे सार्कवर अशी टीका केली जाते की, 'सार्कचा जन्मच वाढ न होण्यासाठी झालेला आहे'. (SAARC is born for not to grow) ही टीका असत्य नाही असे दिसते.

जागतिक व्यापार संघटना (WTO) ही एक आंतरराष्ट्रीय संघटना जगामधील देशांदरम्यान होणाऱ्या आंतरराष्ट्रीय व्यापारावर देखरेखीचे काम करते. सदस्य राष्ट्रांमधील वाणिज्याला चालना देणे, तंट्यांचे निवारण करणे इत्यादी जागतिक व्यापार संघटनेची प्रमुख कामे आहेत. जकाती व व्यापारासंबंधीचा सर्वसाधारण करार विकसित देशांचे हितसंबंध टिकविणारा असल्यामुळे विकसनशील देशांनी अनेकवेळा आंतरराष्ट्रीय व्यापारी संघटना स्थापन करण्याचा प्रयत्न केला, मात्र विकसित देशांनी ते सर्व प्रयत्न हाणून पाडले. या जागतिक व्यापार संघटनेने काही चांगले कार्य केल्याचेही दिसून येते.

१. व्यापार धोरणाच्या पुनरावलोकनासाठी नियमांची अंमलबजावणी.

२. सदस्य देशांसाठी मंच म्हणून भविष्यातील धोरणांवर चर्चा करतो.

३. द्विपक्षीय आणि बहुपक्षीय व्यापार करारांची अंमलबजावणी आणि प्रशासन.

४. व्यापार विवाद निपटारा.

५. जगातील संसाधनांचा इष्टतम वापर.

अशा प्रकारे जगातील या संघटनांनी जागतिक व्यापारी संबंधाबरोबरच काही सामाजिक, सांस्कृतिक सलोखा राखण्याचेही काम केले आहे.

## ४.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

- **ओपेक** – पेट्रोल निर्यात करणाऱ्या राष्ट्राची संघटना (Organisation of Petroleum Exporting Countries)
- **सार्क** – दक्षिण आशियाई प्रादेशिक सहयोग संघटना (SAARC - South Asian Association for Regional Co-operation)
- **दहशतवाद** – अवैध मार्गाचा अवलंब करून, शस्त्रांचा आधार घेऊन प्रस्थापित व्यवस्था नाकारणारा व आपले इप्सित साध्य करणारा अविवेकी समाजगट

- WTO - आंतरराष्ट्रीय व्यापार संबंध सुरळीत चालविण्यासाठी निश्चित मापदंड ठरवून देणारी संस्था (World Trade Organisation)
- GATT - कर व व्यापारविषयक सर्वसाधारण करार (General Agreement on Tariffs and Trade)
- SAPTA - सार्कचा पसंती व्यापार करार (SAARC Preferential Trade Agreement)
- **संरक्षित राज्य (भूतान):** इ.स. १९४९ मध्ये भारत-भूतान यांच्यात झालेल्या करारानुसार - (१) भूतानच्या परराष्ट्रसंबंधांची व संरक्षणाची जबाबदारी भारताने स्वीकारली होती. (२) भूतान परराष्ट्रसंबंधात भारताशी सल्लामसलत करेल.
- **लिट्टे** (LTTE): (Liberation Tiger of Tamil Elam) श्रीलंकेतील तामीळ बंडखोरांची संघटना, ही संपटना स्वतंत्र तामीळ राष्ट्राची मागणी करते. श्रीलंकेचे दोन भागात विभाजन करावे व तामीळ भागाला स्वतंत्र राष्ट्राचा दर्जा प्राप्त व्हावा असे याचे म्हणणे आहे.
- **शांतीसेना :** दिनांक २९ व ३० जुलै, १९८७ रोजी झालेल्या भारत-श्रीलंका करारानुसार श्रीलंकेत तामीळ बंडखोरांचा बंदोबस्त करण्यासाठी, युद्धबंदीची देखभाल करण्यासाठी पाठविण्यात आलेले भारतीय सैन्य.

## ४.५ स्वयं – अध्ययन प्रश्नांची उत्तरे

स्वयं - अध्ययन- १

१. अ. २ २. अ. ७ कोटी ५० लाख

३. ड. ६०% ४. अ. १ सप्टेंबर १९६५

५. अ. सौदी अरेबिया

स्वयं - अध्ययन- २

१. अ. ४८% २. अ. ३०० ३. क. कोलंबो ४. अ. १९८९

५. अ. १९९४

स्वयं - अध्ययन- ३

१. ड. जिनिव्हा २. अ. १६४ ३. अ.२००१ ४. ब. सिंगापूर

५. अ. एकदा

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. ओपेक देशांचा इतिहास स्पष्ट करून त्याची वाटचाल विशद करा.

२. ओपेक देशांची रचना, उद्दिष्टे व भवितव्य स्पष्ट करा.

३. सार्कची रचना व त्याच्या कार्याची चर्चा करा.

४. सार्क देशांच्या व्यापारी संबंधाची चर्चा करा.

५. WTO चा इतिहास, त्याची भूमिका व कार्य स्पष्ट करा.

६. WTO चे भारतविषयक धोरण स्पष्ट करा.

७. WTO ची रचना, त्याची उद्दिष्टे व वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

**ब) टिपा लिहा.**

१. ओपेकचे योगदान

२. ओपेक देशांचे कार्य

३. सार्क मंत्रीपरिषदेचे कार्य

४. सार्क समोरील आव्हाने

५. सार्क देशांचे यश

६. WTO चा संक्षिप्त इतिहास

७. WTO ची वैशिष्ट्ये

८. WTO भारतासाठी आपत्ती की संधी

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. बाचल, वि.मा., आंतरराष्ट्रीय संबंध.

२. चौधरी, म. पि. व चौधरी अर्चना, राष्ट्रीय सुरक्षा

३. डॉ. रायपूरकर मनोहर, आंतरराष्ट्रीय संबंध.

४. पिंपळापुरे, मनोहर, आंतरराष्ट्रीय व्यापार

५. प्रा. कोलते, कृष्णराव, व इतर, भारताचा भूगोल

६. वेदांतु वेबसाईट

७. कोळी, सी. एम., प्रमुख देशोंकी विदेशी नितीया, जयपूर.

८. Sinha Rameshwar P., Dandekar, Surya (Editor), South Asian Politics - Ideological and Institutions, New Delhi.


❑❑❑